# भारतीय स्त्री दर्शन

म. ग्रं. सं. ठाणे
विषय — चरित्र
सं. नं. ६३८



REFBK-0007948

लेखिका : इन्दुतनया जी. ए.

# भारतीय स्त्री - दर्शन

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
सं. नं. ४५३८
स्थळ प्रत

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ७८४८

लेखिका : इन्दुतनया, जो. ए.

विवेक प्रकाशन १

प्रकाशकः—
ब. ना. जोग
शिवाजी प्रिं. प्रेस,
न. चिं. केळकर रस्ता,
दादर, मुंबई २८.

मूल्य
१ रुपया

पत्रव्यवहाराचा पत्ताः—
व्यवस्थापक, 'विवेक'
२६४सी, न. चिं केळकर रस्ता,
दादर, मुंबई २८.

# निवेदन

'**विवेक**'चें पहिलें प्रकाशन वाचकांच्या हातीं देतांना अत्यंत आनंद होत आहे. 'विवेक' सुरूं करतांनाच पुढें-मागें प्रकाशन संस्था हा 'विवेक'चा एक भाग व्हावा आणि वाचकांना सदभिरुचिपूर्ण वाङ्मय अल्प मोबदल्यांत द्यावें अशी कल्पना होती. गेल्या पांच वर्षांत अनेक अडचणी येत गेल्या आणि मनांत असूनहि ती कल्पना मूर्त स्वरूप धारण करूं शकली नाहीं. आज मकर संक्रमणाच्या शुभदिवशीं संक्रमण करण्याची ती संधि मिळत आहे.

'विवेक'ची गेल्या पांच वर्षांतील प्रगति वाचकांच्या सहकार्यावर अवलंबून होती. आज मंदीच्या काळांत पुस्तक प्रकाशनाचें धाडस करतांना आम्हांला वाचकांनीं दिलेल्या त्या सहकार्याची आठवण होणें साहजिक आहे. आमच्या ह्या पहिल्याच प्रकाशनांत कांहीं चुका व दोष वाचकांना आढळतील; परंतु आमचेवरील प्रेमामुळें ह्या चुका व दोष गिळून टाकून वाचक आपल्या प्रेमाची पुन्हां एकदां आम्हांला साक्ष देतील असा विश्वास आहे. वाचकांच्या सहकार्यानें यापुढें आणखी प्रगति करतां येईल अशी आशा आहे.

शुद्धिपत्र तयार करण्यासाठीं आमचे मित्र श्री. **केशवराव फडके** व श्री. **प्रभाकर जोशी** यांनीं दिलेलें सहकार्य आम्ही विसरूं शकणार नाहीं.

मकर संक्रमण }
शके १८७५ }

**प्रकाशक**

७८
१२९३

# प्रस्तावना

**इन्दुतनया** यांनीं भारतीय स्त्रियांच्या उच्च शीलसंबंधानें हा एक मोठा सुंदर प्रबंध लिहिला आहे. ऋग्वेदकालापासून तो तहत् सद्यःकालापर्यंत झालेल्या अनेक शीलवती स्त्रियांचें त्यांनीं यांत सूक्ष्म परीक्षण केलेलें आहे. पैकीं जैन व बौद्ध कालापर्यंत झालेल्या स्त्रियांची माहिती या पहिल्या भागांत आहे. ऋग्वेद, रामायण, महाभारत, भागवत व देवीभागवत हे ग्रंथ त्यांनीं स्वतःच वाचले आणि त्यांतून योग्य त्या त्या स्त्रियांचीं चरित्रें त्यांनीं उचललीं; पण हा उद्योग फार मोठा असल्यामुळें या पुढील स्त्री-चरित्रें त्यांनीं इतर लेखकांच्या ग्रंथावरून घेतलीं आहेत. शीलाविष्कार करून दाखविण्यापुरतींच हीं चरित्रें घेतलेलीं आहेत, आणि प्रत्येक स्त्रीच्या शीलाचा आविष्कार फार सहानुभूतीनें पण समर्पक केलेला आहे. या सर्व आविष्कारांवरून असें दिसून येईल कीं, भारतीय स्त्रियांचें जीवन विविध गुणांनीं चांगलें समृद्ध बनलेलें आहे, आणि हेंच दाखवून द्यावें असा इन्दुतनया यांचा हेतु आहे.

त्या त्या स्त्रीच्या इतर चारित्र्याचें वा गुणांचें परीक्षण करणें हें त्यांच्या योजनेंत बसणारें नाहीं, आणि म्हणून त्यांनीं तिकडे लक्षहि दिलेलें नाहीं. जेवढें गुणैश्वर्य दिसलें तेवढेंच त्यांनीं वेंचून घेतलें आहे; आणि त्याचा मोठा थोरला सुगंधित गेंद करून त्यांनीं तो वाचकांच्या हातीं दिलेला आहे. लेखिकेचा हेतु काय आहे हें ध्यानांत ठेवून या पुस्तकाचें वाचन केलें म्हणजे आक्षेप घेण्याची बुद्धीच वाचकाच्या ठिकाणीं उद्भवणार नाहीं. कैकयी चांगली कशी, तारा चांगली कशी, हे प्रश्न वाचकाच्या मनांत डोकावतील, नाहीं असें नाहीं; पण कैकयी किंवा तारा यांच्या चरित्रांत इतर कांहीं आक्षेप घेण्यासारखे भाग असले तरी स्त्री-जातीला भूषणभूत बनावे असे कांहीं कांहीं सद्गुणहि त्यांनीं प्रसंगविशेषीं दाखविलेले आहेत. लेखिकेनें तेवढे सद्गुणच उचलून घेतले आहेत आणि हेंच लेखनाच्या मूळ हेतूशीं सुसंगत आहे. एका स्त्रीच्या ठिकाणीं सर्व मृदु व कडक असे सद्गुण दिसावयास हवेत ही अपेक्षाच चुकीची आहे. कोणाच्या वांट्याला हा गुण तर दुसऱ्या कोणाच्या वांट्याला तो गुण आलेलें दिसतें. एकच माणूस सर्वगुणसंपन्न सहसा सांपडणार नाहीं. अर्थात् जो गुण ज्या ठिकाणीं दिसेल त्या ठिकाणीं तो होता हें अचूकपणें दाखवून देणें हेंहि रसिकतेचेंच काम आहे.

पुष्कळदां असें घडतें कीं कांहीं कांहीं नांवें सामान्य लोकांच्या दृष्टीनें सुध्दां कायमचीं बद्दु होऊन बसलेलीं असतात. इन्दुतनया यांनीं हा सामान्य लोकांचा धोपट न्याय मुळींच पत्करलेला नाहीं. एखाद्या स्त्रीच्या ठिकाणीं कांहीं दोष असतीलहि, पण तिच्या अंगीं जर दुसरे कांहीं ठळक गुणविशेष असले तर त्याकडे लोकांनीं दुर्लक्ष करावें हें त्यांना मुळींच संमत नाहीं. आणि म्हणून वर सांगितलेल्या स्त्रियांसारख्या अनेक स्त्रिया त्यांच्या या प्रबंधांत चांगलें मानाचें स्थान पावून बसल्या आहेत. आणि हें सारें त्यांच्या हेतूंशीं सुसंगतच आहे.

* * *

**इन्दुतनया** यांच्या प्रबंधाचा हा पहिला भाग आहे. दुसऱ्या भागांत कदाचित् कांहीं विवेचनात्मक आणि तुलनात्मक विचार त्या लिहिणार असतील. त्या ठिकाणीं भारतांतील स्त्रियांच्या स्वभावांत, आधुनिक काळाला अनुसरून कोणत्या गुणांचा प्रकर्ष व्हावयास हवा किंवा निदान सध्यांच त्यांच्या ठिकाणीं असलेल्या गुणांचा विकास व विलास मानवी जीविताच्या कोणत्या शाखेंत व्हावयास हवा, हें त्या दाखवून देणार असतील. पण आधुनिक जीवन जरी पूर्वीच्या मानानें फार बदललेलें असलें तरी त्यांच्या गुणांचा व्यापार या बदललेल्या परिस्थितीला अनुसरून व्हावा अशी गृहशिक्षणाची व शालेय शिक्षणाची व्यवस्था आपण ठेवली म्हणजे भारतीय स्त्री जगांतील कोणत्याहि देशांतील समर्थ स्त्रीच्या बरोबरीची आहे असें खासच दिसूं लागेल. मुख्य गोष्ट ही आहे कीं, तिच्या ठिकाणीं विविध प्रकारची गुणसंपदा आहे कीं नाहीं? ती आहे हें एकदां दिसलें म्हणजे मग तिला वळण कसें लावावें, आणि तिचा प्रकर्ष कोठें घडवावा हें नवीन कालाची रचना करणारांच्या हातीं राहील. इन्दुतनया यांनीं या प्रबंधांत असें दाखवून दिलें आहे कीं, अपेक्षित असे सर्व गुण भारतीय स्त्रीच्या ठिकाणीं आहेतच आहेत.

हें दाखवून देण्याच्या कामीं त्यांनीं पुष्कळच मेहनत केली आहे. त्यांना पुष्कळ वाचावें लागलें आहे, आणि गुणांची निवड करण्याच्या कामीं चौकसबुद्धि दाखवावी लागली आहे. त्यांच्या या प्रयत्नाचें मी मनःपूर्वक अभिनंदन करतों.

—श्रीपाद महादेव माटे

भारतमातेच्या सर्व ज्ञात व

अज्ञात सुकन्यांना

कृतज्ञतापूर्वक

समर्पण.

इन्दुतनया

वा. ८९४८

## : १ : प्रास्ताविक :

गेलीं बरींच वर्षे स्त्री-समाजावर वेळोवेळीं प्रतिकूल टीका करण्यांत येत असे. वस्तुस्थिति तशीच असल्यानें तीं खोडून काढणेंहि शक्य होत नसे, पण आतां मात्र ही स्थिति हळूंहळूं पालटत चालली आहे. गांवांतील लहान लहान रस्ते दुरुस्त करणें, साऱ्या गांवाला पुरेल इतका भाजीपाला फावल्या वेळीं पिकविणें, संकट-ग्रस्तांना साह्य करण्यासाठीं पुढें होणें हीं कार्यें ठिकठिकाणच्या महिलांनीं उत्साहानें आरंभिलीं आहेत व यशस्वीहि करून दाखविलीं आहेत. एवढेंच नव्हे तर आपली कार्यतत्परता सिद्ध करून अनेकांचे धन्यवादहि मिळविले आहेत. मुंबईत नुकत्याच गाजलेल्या "स्त्री-जीवन-विकास परिषदे"नें 'गृहिणी-विद्यालया'ची योजना पुढें आणणाऱ्या समस्यांकडेहि आपलें पूर्ण लक्ष आहे हेंच सिद्ध करून एका महत्त्वाच्या प्रश्नाला चालना दिली आहे. वाया जाणाऱ्या कचऱ्यांतून कलाकृति निर्मून उघडलेलें प्रदर्शनहि त्यांच्या उद्योगशीलतेचीच साक्ष पटवील.

शिक्षणाच्या विविध क्षेत्रांत उत्कृष्ट यश संपादन करणाऱ्या विदुषी, घरची जबाबदारी सांभाळून पित्याला वा पतीला अर्थार्जनांत साहाय्य करणाऱ्या कन्या वा गृहिणी आतां कितीतरी कुटुंबांतून दिसूं लागल्या आहेत. कलेच्या सेवेसाठीं जीवन व्यतीत करण्याची मनीषा धरणाऱ्या कलावंत स्त्रिया हलके हलके पुढें येत आहेत. "आमची जबाबदारी आम्ही ओळखतो." हें स्त्रियांनीं उत्कृष्टपणें सिद्ध करून दाखविलें आहे. हें सारें पाहिलें म्हणजे स्त्री–समाज जागृत नि कर्तव्यतत्पर होत चालला आहे याबद्दल खात्री पटते.

*           *           *

स्त्रियांची गेलीं कित्येक वर्षे चाललेली कुचंबणा, झालेला कोंडमारा संपल्याची आज साक्ष पटते. व त्यांच्या कार्तव्यशक्तीला वाव मिळत असलेला पाहून संतोष वाटूं लागतो. हें लोण घरोघरीं पोहोंचलें पाहिजे, अजूनहि निद्रिस्त नि निष्क्रीय असणाऱ्या भगिनींनाहि या कार्यांत ओढलें पाहिजे, असें तीव्रतेनें

वाटूं लागतें. आणि त्याचवेळीं–" काळच बदलला हो! पूर्वी का कुणी असं करीत होतं?" हे टीकेचे उद्गार कानीं पडतात. होय, स्वसामर्थ्याची जाणीव होऊन कार्योन्मुख झालेल्या स्त्रीला अजूनहि कित्येकदां अशी टीका ऐकावी लागते.

"चूल नि मूल एवढेंच स्त्रीचें कार्यक्षेत्र! स्त्रीची बुद्धि चुली पुरती" असेंच आमच्या संस्कृतीचें सांगणें असल्याची कित्येकांची भोळी पण भ्रामक श्रद्धा असते. आणि म्हणून स्त्रीनें सर्व क्षेत्रांत संचार करावा हें त्यांना योग्य वाटत नाहीं. उलट कित्येक सुशिक्षितांना स्त्रीनें सर्व क्षेत्रांत पुढें यावें यांतच तिचा विकास आहे असें वाटतें. समान–संधी, समान–हक्क, समान–दर्जा हेंच नव्या युगाचें चिन्ह आहे असें कांहीं समजतात.

* *

**खरेच** का हे विचार नवे आहेत? आम्ही समजतों त्याप्रमाणें भारतीय संस्कृतीला या तथाकथित नव विचारांचें वावडें का आहे? कित्येकांची तशी समजूत आहे, पण वस्तुस्थिति त्याहून फारच भिन्न आहे. **पुरुषाशीं स्पर्धा करीत स्त्रीनें पुरुषी बनावें या गोष्टीला भारतीय संस्कृतीचा विरोध असला तरी चूल नि मूल एवढ्यापुरतेंच स्त्रीचें कार्यक्षेत्र मर्यादित आहे असें तिनें कधींच मानलेलें नाहीं. उलट "व्यक्तीच्याच नव्हे तर राष्ट्राच्याहि संसारांत स्त्रीनें फार मोठा वांटा उचलला पाहिजे," असेंच विश्वविजयी भारतीय संस्कृतीचें सांगणें आहे.**

कालौघात हें सत्य-स्वरूप विसरलें गेलें. संस्कृतीपासून दूर गेलेल्या आम्हांला रूढींचीं जाचक बंधनें तेवढीं दिसूं शकलीं आणि त्यामुळेंच पाश्चात्यांचा दृष्टिकोन उदार वाटूं लागला. त्यांच्या स्त्री-विषयक चळवळी आम्ही उचलल्या, भारतीय संस्कृति संकुचित, अनुदार गणली जाऊं लागली. पण ही चूक आहे हें अनेकांच्या निदर्शनास आलें आहे. "आम्ही स्त्रियांना बरोबरीच्या मानीत नाही-" ही विवेकानंदांची कबुली ऐकतांच 'shame, shame' चा गलका करणारे पाश्चात्य–" आम्ही त्यांना स्वतःहून वंद्य नि श्रेष्ठ समजतो–" हा त्यांच्या वाक्याचा उत्तरार्ध ऐकतांच थिजले

म्हणतात. इतिहासाच्या प्रकाशांत भारतीय-स्त्री-जीवनाकडे पाहिलें तर आपली गत अशीच होईल.

नसतीं बंधनें तोडून धिटाईनें नि आत्मविश्वासानें प्रगति-पथावर निघालेल्या नव्या युगाच्या नव महिलेला आपल्या संस्कृतीचें, राष्ट्रपरंपरेचें यथार्थ ज्ञान होईल, स्वतःच्या ध्येयाची स्पष्ट कल्पना तिला येईल, तिचा उत्साह वाढीस लागेल आणि ' हाच सनातन धर्म ' हें विरोधकांना जाणवलें तर विरोधहि थंडावेल, तिचा मार्ग मोकळा होईल. विरोधकच साहाय्यक होतील. याचसाठीं स्वसामर्थ्याचें, यथार्थ दर्शन घडविणारें हें कार्य मी हातीं घेतलें आहे. इतिहासाच्या उज्वल प्रकाशांत स्त्री-जीवनाकडे पाहण्याचा प्रयत्न मी करणार आहे. यांतूनच भारतीय-स्त्री-जीवनाचें उज्वल दर्शन साऱ्यांना घडेल, संशयाचीं अभ्रें विरतील, अज्ञानाचा अंधःकार दूर होईल. आत्मप्रतीतीच्या प्रकाशांत कर्तव्याचा नि प्रगतीचा मार्गहि उजळून निघेल. हाच भारतीय-स्त्री-दर्शनाचा हेतु आहे.

१५३५८
८।२।५४

**भारतीय-स्त्री-दर्शनाला** आपण प्रारंभ करीत आहोंत. पहिला मान अर्थातच आपल्या वेदकालीन पूर्वजांचा! त्यासाठीं वेदांकडेच वळावें लागेल. वेद केवळ भारतीयांच्याच नव्हे तर जगाच्याहि वाङ्मयांत प्राचीनतम गणले जातात, तेव्हां तोच भारतीय–जीवनाचा पहिला–उपलब्ध पुरावा! **या वैदिक कालांतहि ५००० वर्षांपूर्वींसुद्धां-भारतीय स्त्री स्वतःला घराच्या चार भिंतींत कोंडून घेत नव्हती, केवळ चूल नि मूल एवढेंच स्वतःचें कार्यक्षेत्र मानीत नव्हती तर पतीला यज्ञ, दान, तप यांत सहकार्य देत होती. आपण स्वतः स्वतंत्रपणें हे मार्ग चोखाळीत होती, वस्त्रें विणीत होती, इतकेंच नव्हें, तर शस्त्रास्त्रांनीं सज्ज होऊन संग्रामालाहि सिद्ध होत होती.** असेंच तिचें चित्र या वेद–वाङ्मयांत उमटलेलें दिसतें. आपण प्रत्यक्षच तीं चित्रें पाहूंया.

* * *

**वेदांत** केवळ स्त्रियांसाठींच रचलेलीं कांहीं सूक्तें आढळतात. गर्भरक्षक, सुलभ प्रसूतिकारक अशीं हीं सूक्तें आहेत. या सूक्तांचें वाचन व पठण स्त्रियांनींच केलें पाहिजे. यज्ञयाग करीत अग्नीला हविर्भाग अर्पण करणाऱ्या स्त्रियांचीं वर्णनें वेदांत वारंवार आढळतात. कांहीं सूक्तांवर 'मंत्रद्रष्टी' म्हणून स्त्रियांचींच नांवें आढळतात. याप्रमाणें वेदांच्या रचनेंतसुद्धां स्त्रियांनीं भाग घेतलेला दिसतो, **तेव्हां तिला वेदाध्ययनाचा अधिकार असणार हें उघडच आहे.**

वैदिक संस्कृति ही यज्ञयागांची संस्कृति आहे. आणि यज्ञप्रसंगीं पत्नी उपस्थित असल्यावांचून यजमानाला यज्ञ करतांच येत नाहीं. यज्ञप्रसंगीं सहयोग प्रदान करणारी म्हणूनच स्त्रीला सहधर्मिणी, सहचारिणी नि अर्धांगिनी म्हणतात. "**अभार्योऽपि नरः तद्वत् अयोग्यः सर्व कर्मसु।**" पक्ष्याला ज्याप्रमाणें पंखांवांचून उडतां येत नाहीं; त्याप्रमाणेंच पुरुषाला पत्नीच्या सहकार्याशिवाय कोणतेंहि धर्मकृत्य करतां येत नाहीं." म्हणूनच यज्ञप्रसंगीं दंपति हजर असावी लागते.

"**वि त्वां ततस्रे मिथुना अवस्यवो**"– या ऋग्वेदाच्या पहिल्याच मंडलांतील १३१ व्या सूक्ताच्या ३ ऱ्या ऋचेंत-"**हे इंद्र त्वमुद्दीश्य पत्निसहितः यजमानाः यज्ञं वितन्वन्ते ।**" इंद्रा, तुझ्यासाठीं हे याज्ञिक सपत्निक यज्ञ करीत आहेत. असा या गोष्टीचा स्पष्ट उल्लेख आहे. नवव्या मंडलांत यज्ञासाठीं सोमरस पिळणाऱ्या स्त्रियांचीं वर्णनें आढळतात, यावरून या स्त्रिया यज्ञ, याग, तप यांत पतीशीं सदैव सहकार्य करीत, असें दिसतें.

पुत्रप्राप्तीसाठीं अश्विनौदेवांची प्रार्थना करणारी ही **वध्रिमति!** सूक्तें रचून तिनें अश्विनौकुमारांना आळविलें. तिचीं सूक्तें ऐकून प्रसन्न होऊन त्यांनीं तिला **हिरण्यहस्त** नांवाचा पुत्र दिला, अशी कथा वेदांत आहे. हे पहा तद्विषयक उल्लेख—

**अजोहविन्नासत्या करा वा महे यामन्पुरुभुजा पुरंधिः।**
**श्रुतं तच्छासुरिव वध्रिमत्याः हिरण्यहस्तमश्विनावदत्तम्॥**

(ऋग्वेद मंडल १ अष्टक १ अध्याय ८ वा सूक्त ११६ वें.)

"**हिरण्यहस्तमश्विना रराणा पुत्रं नरा वध्रिमत्या अदत्तम्**"

देवतांना आवाहन करण्याइतकें मंत्रसामर्थ्य, तेजस्विता, सूक्त रचण्याइतकी बुद्धिमत्ता व गानकुशलता तिच्याजवळ होती. पुरुकुत्साची पत्नी '**पुरुकुत्सानि**' हिनेंहि वध्रिमतीप्रमाणेंच सूक्तगायनानें इंद्रवरुणांना प्रसन्न करून त्यांच्याकडून '**त्रसदस्यु**' नांवाचा पुत्र मिळविला. स्वतः 'त्रसदस्यु'च ऋग्वेदाच्या चवथ्या मंडलांत ही कथा सांगतो.

**पुरुकुत्सानिहि वामदाशद्व्योभिरिंद्रावरुणा नमोभिः।**
**अथा राजानम त्रसदस्यूमस्या वृत्रहणं ददथुरर्धदेव॥**

(ऋग्वेद मंडल ४ सूक्त ४२ ऋचा ८)

याच मंडळांतील १८ व्या सूक्तांत वामदेवांच्या मातेनें, अदितीमातेचें स्मरण केल्याचा व त्यांच्या आगमनानेंच तिचें संकट निवारलें गेल्याचा उल्लेख आहे. स्त्रियांनीं सूक्तें-गाईल्याचे हे वेदांतील उल्लेख पाहिल्यानंतर स्त्रियांनीं स्वतः रचलेल्या सूक्तांकडे वळूं या.

बृहस्पतीची कन्या व भावभव्याची पत्नी '**रोमशा**' ही ब्रह्मवादिनी म्हणजे ब्रह्मज्ञान झालेली व त्याचा उपदेश करूं शकणारी विदुषी होती. अंगावर रोम असल्यानें ती पतीला अप्रिय होती. यामुळेंच तिचें नांव 'रोमशा' पडलें होतें. ऋग्वेदाच्या प्रथम मंडलांतील १२६ व्या सूक्तांतील सप्त ऋचांचें संकलन हिनें केलें आहे.

दीर्घतमा ऋषींची माता '**ममता**' हि अशीच ब्रह्मवादिनी असून मोठी विदुषी होती. ऋग्वेदाच्या प्रथम मंडलांतील दहाव्या सूक्तांत हिनेंच अग्नीची स्तुति केली आहे.

ब्रह्मवादिनी '**उशीज**' ही दीर्घतमा ऋषींची पत्नी. 'कक्षिवान्' हा हिचा पुत्र व 'घोषा' ही हिची नात. ही सारींच विद्वान् होतीं. उशिजेनें ऋग्वेदाच्या पहिल्या मंडलांतील ११६ ते १२१ मंत्रांचें संकलन केलें आहे.


अंगिरा ऋषींची कन्या, राजा आसंगाची पत्नी '**शश्वती**' ही देखील ब्रह्मवादिनी असून ऋग्वेदाच्या आठव्या मंडलांतील पहिल्या सूक्ताच्या चौतिसाव्या ऋचेचें संकलन तिनें केलेलें आहे.

अभृण ऋषींची कन्या '**वाक्**' ब्रह्मवादिनी असून दहाव्या मंडलांतील १२५ व्या सूक्तांतील देवीसूक्ताचे आठ श्लोक रचून अद्वैत सिद्धांताचें स्पष्ट प्रतिपादन तिनें केलेलें आहे.

विवाहप्रसंगीं म्हटले जाणारे मंत्र '**सूर्या सावित्रीनें**' स्वतःच्या विवाहविधीचें वर्णन करण्यासाठीं रचले आहेत. दहाव्या मंडलांतील ८५ व्या सूक्ताचें ऋषित्व हिनें भूषविलें आहे. कामगोत्रजा '**श्रद्धा**' हिनें याच मंडलांतील १८५ व्या सूक्तांत श्रद्धेचें वर्णन केलें आहे.

सहाव्या मंडलांतील ८० व्या सूक्तांत स्वतःचें चरित्र गुंफणारी '**अपाला**' ही अत्री ऋषींची कन्या, अंगावर कोड उठलें असल्यानें पतीनें तिचा त्याग केला असता तिनें तपस्या आरंभिली. सोमपानानें इंद्राला संतुष्ट करून तिनें वरदान मिळविलें. त्यामुळें तिचें कोड गेलें. पतीनें तिचा अंगिकार केला. सूक्त-रचनेचीं हीं विविध उदाहरणें म्हणजे वेदकालीन स्त्रियांच्या विद्वत्तेचीच साक्ष नव्हे का ?

**आपल्या पतीबरोबर समरांगणांत जाऊन लढणारी....**



**... वेदकालीन 'विश्पला'**

आपला पति 'खेल' याच्या बरोबर रणांगणांत जाऊन संग्रामांत भाग घेणारी पराक्रमी '**विश्पला**' शत्रूच्या प्रहारानें घायाळ झाली. तिचा जखमी पाय काढून टाकून अश्विनीकुमारांनीं तिला लोखंडाचा दुसरा पाय बसवून दिला असल्याचें वर्णन ऋग्वेदांत आलें आहे. पहा

**चरित्रं हि वेरिवाच्छेदि पर्णमाजा खेलस्य परितक्यायाम्।**
**सद्यो जंघामायसीं विश्पलायै धने हिते सर्तवे प्रत्यधत्तम् ॥"**

(ऋग्वेद मंडल १ अध्याय ८ सूक्त ११६ ऋचा १५)

**अमुञ्चत वर्तिकामंहसो निः प्रति जङ्घां विश्पलाया अधत्तम्**

राजा कक्षिवानाची कन्या '**घोषा**' श्वेतरोगानें पीडित होती. त्यामुळें दीर्घकाळ

पित्याच्या घरीं खितपत पडली होती. या श्रद्धाळू स्त्रीनें रोग-मुक्त होण्यासाठीं अश्विनी-कुमारांची आराधना आरंभिली. तिची तपस्या सफळ झाली. रोग बरा झाला. अश्विनीकुमारांनीं तिला नवतारुण्य दिलें. सामर्थ्य दिलें, भाग्य दिलें. दहाव्या मंडलांतील ३९ व ४० हीं सूक्तें हिनें रचलेलीं आहेत. ३९ व्या सूक्तांत ती म्हणते–

**वयं वा मह्रे श्रुणुत मे अश्विना पुत्रायैव पितरा मह्यम् शिक्षितम्।**
**अनापिरज्ञा असजात्यामति पुरा तस्या अभिशस्तेरव स्मृतम् ॥**

"घोषा तुमची स्तुति करीत आहे. अश्विनीकुमारांनो। माझें हें स्तवन ऐका, आईबाप मुलाला शिकवितात त्याप्रमाणें तुम्ही मला शिक्षण द्या."

यानंतर ४० व्या सूक्तांत ती पतिपुत्रांच्या प्राप्तीची इच्छा प्रगट करते. सांसारिक सौख्यासाठीं प्रार्थना करते, त्याचवेळीं

**युवां ह घोषा पर्यश्विना यति राज्ञा ऊचे दुहिता पृच्छे वा नरा।**
**भूतमक्तवेऽश्वावते रथिने शक्तमर्वते ...... ॥**

– घोड्यांच्या रथांत बसून शत्रूंशीं संग्राम करण्यासाठीं जाण्याचें सामर्थ्य तूं मला दे असेंहि ती सांगते. वैदिक स्त्रियांना संसारसुखाइतकीच विद्या, बल, शौर्य यांचीहि आवड होती, असेंच ही ऋचा सांगते.

पांचव्या मंडलांतील २८ वें सूक्त अत्रिगोत्रांतील '**विश्ववारा**' हिनें रचलें आहे. या सूक्ताची पहिलीच ऋचा अशी—

**समिद्धो अग्निर्दिवि शोचिरश्रेत्प्रत्यङ्ङुषे समुर्वियां विभाति।**
**एति प्राची विश्ववारा नमोभि देवाँ इळाना हविषा घृताची ॥**

स्तोत्रें म्हणून देवाची स्तुति करीत, हवी देत 'विश्ववारा' अग्नीला सामोरी होत आहे.

याच मंडलांतील ३०व्या सूक्तांत **नमुचीनें** स्त्री-सेना तयार केल्याचा उल्लेख आहे. ४७ व्या सूक्तांत

" वितन्वते धियो अस्मा अपांसि वस्त्रा पुत्राय मातरो वयंति "—माता, पुत्रांसाठीं वस्त्रें विणतात " असा उल्लेख आहे.

पहिल्या मंडलांतील ६ व्या अध्यायांतील ९२ व्या सूक्ताच्या ४थ्या ऋचेंत ' अधिपेशांसि वपते नृतूरिव " असे शब्द आहेत. नृतूरिव - नृत्यंति-योषिदिव-नाचणाऱ्या कुमारीप्रमाणें " असा या उपमेचा अर्थ. यावरून तत्कालीन स्त्रियांना नृत्यगायनादि कलांचें शिक्षण दिलें जात होतें असा अर्थ काढणेंच योग्य होईल.

वैदिक स्त्री–जीवनाचें यथार्थ दर्शन घडविण्यास हीं उदाहरणें पुरेशीं आहेत, असें मला वाटतें. फार दूरच्या काळांतील घटना म्हणून त्यांची विस्तृत माहिती मिळूं शकत नसली तरी उपलब्ध पुराव्यावरूनहि स्त्री–दर्शन खासच होऊं शकतें व वेदकालीन स्त्री-जीवनाचा बोध होतो.

मराठी ग्रंथ संग्रहालय
सं. नं. ५४५८३८
: ३ स्थल प्रत

# : उपनिषत्कालीन स्त्रिया

**वेदकालीन** स्त्री-जीवन आपण पाहिलें. आतां उपनिषदांकडे वळूंया.

उपनिषदें म्हणजे आर्यांच्या यज्ञयागादि क्रियांचें, व्रतवैकल्यांचें, नित्यकर्मांचें विधिपूर्वक स्पष्टीकरण करणारे नि अध्यात्मविद्येचा, आत्मतत्त्वांचा उपदेश करणारे ग्रंथ. साहाजिकच यांत व्यक्तिविषयक उल्लेख फारच थोडे आहेत. पण या थोड्या उल्लेखांतच **गार्गी** व **मैत्रेयी** यांच्यासारख्या स्त्री-रत्नांचा समावेश होतो. त्यांच्याच साहाय्यानें उपनिषत्कालीन स्त्रियांचें दर्शन घेतां येईल.

*           *           *

**ऐतरेय** ब्राह्मणांत अेक कथा आहे. ब्राह्मतत्त्वाच्या सामर्थ्यानें देवांनीं युद्धांत जय मिळविला. पण तें आपलेंच सामर्थ्य असें वाटून त्यांना फार गर्व झाला. हें समजतांच ब्रह्म त्यांच्याकडे गेले. अग्नि, वायु, जल क्रमाक्रमानें त्याला जाणण्याचा प्रयत्न करूं लागले पण कुणालाच तें शक्य झालें नाहीं. इंद्रहि त्याला जाणूं शकेना. अखेर गिरिकन्या **उमा** हिनेंच त्याला ब्रह्मतत्त्वाचा उपदेश केला. असा त्या कथेचा सारांश आहे. पण उमा म्हणजे ब्रह्मविद्या. दैवी सामर्थ्यानें ब्रह्मज्ञान होणार नाहीं, तर त्यासाठीं ब्रह्मविद्येचीच कास धरली पाहिजे, असा या रूपकाचा अर्थ आहे. म्हणून हा उल्लेख आपण सोडून देऊं. मात्र या ऐतरेयानें सांगितलेलें तें ऐतरेय-ब्राह्मणोपनिषद् आणि ऐतरेय म्हणजे इतरेचा मुलगा हें ध्यानांत ठेवावयास प्रत्यवाय नाहीं.

*           *           *

**बृहदारण्यकोपनिषदा**कडे वळलें, म्हणजे मात्र आपल्याला हवा असणारा पुरावा मिळतो. यांतल्या दुसऱ्या अध्यायाचा हा आरंभ पहा—

**"अथ ह याज्ञवल्क्यस्य द्वे भार्ये बभूवतुर्मैत्रेयी च कात्यायनीच। तयोर्हि मैत्रेयी ब्रह्मवादिनी बभूव।"**

याज्ञवल्क्य ऋषींना **मैत्रेयी** व **कात्यायनी** अशा दोन स्त्रिया होता. कात्यायनी ही संसारप्रवण वृत्तीची, गृहकार्यतत्पर व संसारदक्ष स्त्री होती. मैत्रेयी ही ब्रह्मजिज्ञासेमुळें आत्मज्ञानी बनली होती. हें सामर्थ्य तिनें कसें मिळविलें हेंच यापुढें सांगितलें आहे.

चतुर्थाश्रमांत प्रवेश करणाऱ्या–संन्यास घेण्यास निघालेल्या–ऋषींनीं आपल्या पत्नीला सांगितलें, ' मी आतां संन्यास–दीक्षा घेणार आहे. तत्पूर्वीं माझी सारी संपत्ति मी तुम्हां दोघींत विभागून देणार आहे." तें ऐकून मैत्रेयी विचारते–" महाराज, या वांटणीमुळें मला पृथ्वींतील सारी धनदौलत मिळाली तरी त्यायोगें मी **अमर होऊं शकेन** काय ?"


ऋषींनीं उत्तर दिलें. " नाहीं. कोणत्याहि संपत्तींत मानवाला अमर करण्याचें सामर्थ्य नाहीं." यावर मैत्रेयी सांगते, "महाराज ! मग अमरत्वाची प्राप्ती करून घेणारा मार्ग कोणता हेंच आपण मला सांगावें. " यानंतर सुप्रसन्न झालेल्या या ऋषींनीं आपल्या प्रियतम भार्येला आत्मज्ञानाचा उपदेश केला व मैत्रेयी ब्रह्मवादिनी बनली. ' कात्यायनी 'सारख्या संसार-प्रवण स्त्री प्रमाणेंच ' मैत्रेयी'सारख्या आत्मरूप जाणण्यास उत्सुक होणाऱ्या ब्रह्मजिज्ञासु स्त्रियाहि त्याकाळीं समाजांत अस्तित्वांत होत्या. प्रपंचाप्रमाणेंच परमार्थांतहि त्या भाग घेत असत.

*　　*　　*　　*

**याच** उपनिषदांतील हा दुसरा प्रसंग पहा– **जनक** राजाचा दरबार भरलेला आहे. शाकल्यादि विद्वान् याज्ञवल्क्याशीं चर्चा करीत आहेत. त्यांच्या अग्रभागीं शोभणारी ही विदुषी हीच **वाचक्नवी गार्गी**. विवाह, संसार, गृहकृत्यें हा मार्ग सोडून तिनें आजन्म ब्रह्मचर्याचें पालन केलें होतें. दीर्घकालीन व्यासंगानें प्राप्त करून घेतलेल्या विद्वत्तेमुळें राजसभेंत तिला मानाचें स्थान होतें. दरबारांतील पंडितांमध्येंच तिची गणना केली जाई. आत्मज्ञानांत निमग्न असणाऱ्या या विदुषीनें **" शिकाऱ्याच्या भात्यांतील दोन लखलखीत बाणांप्रमाणें माझे हे दोन प्रश्न आहेत, यांचीं तूं उत्तरें दे "** असें सांगून दोन कूट प्रश्न याज्ञवल्क्यांना विचारले. त्यांतच तिची सूक्ष्म, तरल व मूलग्राही बुद्धिमत्ता प्रकट होते. या प्रश्नांचीं समाधानकारक उत्तरें मिळतांच " याच्याशीं व्यर्थ वाद करूं

नका. यानें मिळवावयाचें तेवढें सर्व ज्ञान मिळविलें आहे. " असा निर्णय तिनेंच दिला आहे. सर्व विद्वानांनीं तिच्या या निर्णयाला शिरोधार्य समजूनच ऋषींच्या विद्वत्तेला मान्यता दिली आहे.

**याज्ञवल्क्य ऋषींना देखील बाणासारखें प्रश्न विचारणारी....**



**.... उपनिषत्कालीन 'गार्गी'**

भर दरबारांत अेका स्त्रीनें दाखविलेला हा सभाधीटपणा, तिचें वादकौशल्य, तीव्र बुद्धिमत्ता नि त्यामुळें राजसभेंत तिला मिळणारा सन्मान पाहून मन थक्क होतें. अनेकदां स्त्रिया या मार्गानें गेल्या असतील तेव्हांच त्यांतील अेक इतक्या श्रेष्ठ स्थाना-

पर्यंत पोहोंचूं शकली. लहान लहान लाटांनीं निर्माण केलेल्या गर्तीतून व खळबळींतूनच प्रचंड, पर्वतप्राय लाटेची उत्तुंगता निर्माण होते. तेव्हां उपनिषत्कालींहि स्त्रीला विद्यार्जनाचीं सर्व द्वारें खुली होतीं. स्त्री म्हणून तिला कुठेंच अटकाव होत नव्हता व तीहि स्वतःच्या विकसनार्थ झटण्यांत कसूर न करतां सर्व उपलब्ध साधनांचा उपयोग करून परमश्रेष्ठपद मिळविण्याचा कसोशीनें प्रयत्न करीत होती. म्हणूनच समाजांत गार्गी व मैत्रेयी निर्माण झाल्या. गार्गीची योग्यता तर अद्वितीयच ठरेल. अेकाद्या महर्षींचाच मान तिनें मिळविला आहे. ऋषींप्रमाणेंच तिच्याहि नांवानें नित्य तर्पण केलें जातें तें यासाठींच !

: ४ : : रामायणकालीन स्त्रिया :

## कौसल्या कैकयी सुमित्रा

'**बंधु** असावे तर रामलक्ष्मणांसारखे 'असें आपण नेहमीं म्हणतों. भरताचें भव्य व्यक्तिमत्व आपल्याला स्तिमित करतें. बंधुप्रेमाचे हे उज्ज्वल आदर्श आपल्याला गुंगवून टाकतात. पण अशीं बालकें घडविणाऱ्या त्यांच्या माता, त्यांचें निर्दोष आचरण, विशाल अंतःकरण नि उदात्त शिकवणच या बालकांचें चारित्र्य घडविण्यास कारणीभूत झालीं हें आपण विसरतो. '**जातस्य परिपालनम्**–' जन्मलेल्यांचें संगोपन हा आपल्या कर्तव्यांतील एक महत्त्वाचा भाग आहे. आपल्याला तें विसरून चालणार नाहीं. म्हणून असे थोर पुत्र ज्यांच्या कुशींत जन्मले त्या दशरथाच्या तीनहि भार्यांचा आपण परिचय करून घेतला पाहिजे. प्रभु रामचंद्रांच्या या मातांचें मन जाणलें पाहिजे.

यांत पहिला मान अर्थातच **कौसल्येचा**! कारण ती ज्येष्ठाराणी. पट्टराणीचा मान आहे तिचा. शिवाय ती रामचंद्रांची जननी आहे. मानानें 'ज्येष्ठा'— मोठी असणारी – ही राणी मनानेंहि 'श्रेष्ठा'- आहे हें विशेष. कोसल देशाची ही राजकन्या, राजा दशरथाची पट्टराणी, अत्यंत प्रेमळ, सात्विक नि धार्मिक स्त्री आहे. अहंकाराचा, गर्वाचा लेशहि तिच्यांत नाहीं. **कैकयी** राजाची आवडती म्हणून कौसल्येला तिचा मत्सर वाटत नाहीं कीं **सुमित्रा** कनिष्ठा म्हणून तिला ही तुच्छ लेखीत नाहीं.

**" तथा ज्येष्ठाहि मे माता कौसल्या दीर्घदर्शिनी।**
**त्वयि धर्मं समाश्थाय भगिन्यामिव वर्तते॥"**

(अयोध्या सर्ग ७३ श्लोक १०)

हे भरतानें कैकयीजवळ काढलेले उद्गारच साक्ष देतात कीं, आपल्या दोघी सवतींशीं ही स्नेहभावानेंच वागत होती.

पुत्रवात्सल्यामुळें रामचंद्राबरोबर वनवासाला जाण्याचा हट्ट ती धरते खरी. पण–

**कैकय्या वंचितो राजा मयि चारण्यमाश्रिते।**
**भवत्या च परित्यक्तो नूनं न वर्तयिष्यति॥**

(अयोध्या सर्ग २४ श्लोक ११)

दुःखित मातेचें शांतवन..



....कौसल्या

" कैकयीनें वंचना केलेली, आणि मी अरण्यवासी अशा वेळीं तूंच जर राजाचा त्याग केलास तर त्यांना जगणेंहि अशक्य होईल–" या रामचंद्राच्या सांगण्यानें तिची समजूत पटली. **"भर्तुः पुन्हां परित्यागो नृशंसः केवलं स्त्रियाः।"** पत्नीनें पतीचा त्याग करणें दुष्टपणाचें असेंच तिला वाटलें. " भर्तुः शुश्रुषया नारी लभते स्वर्गमुत्तमम्– " पतीच्या सेवेनेंच स्त्रीला स्वर्गाची प्राप्ती होते हें तिला आठवलें. राजा दशरथाच्या दुःखी मनाचें सांत्वन करण्यासाठीं, त्याच्या सेवाशुश्रुषेसाठीं मागें राहण्यास ती तयार झाली. पुत्रशोकानें व्याकुल होऊन आरंभीं तिनें राजाची खूप निर्भत्सना केली असली, तरी " **रचितोऽयं मयांजलीः** " म्हणून हात जोडून राजानें " **नार्हसे विप्रियं वक्तुं दुःखिताऽपि सुदुःखितम्** " असें म्हणतांच ती ओशाळली आहे. " **याचितास्मि हतादेव क्षन्तव्याहं नहि त्वया** " या शब्दांत तिनें त्यांची क्षमाहि मागितली आहे.' पुत्रशोकामुळें व्याकुल होऊन मी कांहींतरीच बोललें ' अशीच कबुली तिनें दिली. पुत्रासाठीं व्याकुल झालेल्या मनाचा शोक व अन्यायामुळें आलेला संताप यामुळें तिच्या मनाचा झालेला गोंधळ कारुण्यपूर्ण असून पतिभक्ति व पुत्रवात्सल्य यांचा संघर्ष तीव्र आहे.

रामाइतकेंच त्याचे भरतादि भाऊहि तिला प्रिय आहेत. " **वत्सला चानृशंसा च त्वं हि नित्यं परेष्वपि** " असें दशरथ म्हणतो तें यामुळेंच. भरताच्या भूमिकेबद्दल साशंक झाल्यानें तो आजोळहून परततांच तिनें त्याच्यावर कटु शब्दांचा प्रहार केला असला तरी भयंकर शपथांनीं तो स्वतःला शापून घेऊं लागतांच तिचा क्षोभ पार वितळून ती विरघळून गेली. त्याला प्रेमभरानें हृदयाशीं धरून ती म्हणते " **शपथैः शपमानो हि प्राणानुपरुणत्सि मे** " ' स्वतःला शापून घेऊन तूं माझ्याच प्राणांना पीडा देत आहेस. असें बोलून मला दुःख देऊं नको. '

गृहभेटीनंतर शोकमूर्च्छित झालेल्या भरताला सांवरण्यासाठींहि तीच पुढें झाली आहे. " **वत्सला स्वं यथा वत्सं उपगुह्य तपस्विनी** " असें वाल्मिकी तिचें यावेळीं वर्णन करतात. पति मरण पावला, पुत्र वनवासी झाला, आतां तुला पाहूनच मी जगलें आहे— " **त्वां दृष्ट्वा वत्स जीवामि** " असें सांगून तिनेंच त्याला ताळ्यावर आणला.

सात्विक, प्रेमळ नि धार्मिक अशा संसारी स्त्रीचा कौसल्या हा उत्तम नमुना आहे. जप-तप, होम-हवन, यज्ञ-याग, उपासना नि आराधना यांतच ती रंगलेली आहे. पुत्राचें कल्याण व्हावें हीच तिची एकमेव इच्छा. मात्र त्यासाठीं दुसऱ्याला पीडा होऊं देण्याला मात्र ती मुळींच तयार नाहीं. "धर्मज्ञा, धर्मचारिणी" हेंच तिचें यथायोग्य वर्णन !

*　　　　*　　　　*

**रामचंद्रांची** सावत्र माता **कैकयी**. केकय देशची ही राजकन्या. राजा दशरथाची लाडकी राणी. भरताची जननी. हिच्यामुळेंच रामचंद्रांना वनवास घडला. सापत्न मातेच्या दुष्टतेचा नमुना म्हणूनच तिच्याकडे नेहमीं बोट दाखविलें जातें. पण नवल असें कीं तोंपर्यंत एकदांहि हा सापत्नभाव तिच्या वर्तनांत वा भाषणांत पुसटसुद्धां प्रकट होत नाहीं. रामाला यौवराज्याभिषेक होणार ही वार्ता मंथरेनें सांगतांच '**अतीव सा तु संतुष्टा**' ती अत्यंत संतुष्टच झाली. हर्षभरानें पायांतलें सुवर्णाचें नुपुर तिनें दासीला देऊन टाकलें.

"**रामे वा भरते वाहं विशेषं नोपलक्षते**" असेंच ती सांगते. इतकेंच नव्हे तर रामाचे गुण वर्णून "यौवराज्याला तोच लायक आहे. तूं उगीच कां संतापतेस ?" असेंच उलट विचारते. राजा दशरथाजवळहि "**कौसल्यां मां समं पश्यन् सदा शुश्रूषतेहि माम्**" 'कौसल्येला व मला समभावानें पाहून तो माझी-सुद्धां सेवा करतो.' असें साभिमान कौतुकानें सांगणाऱ्या कैकयीनेंच रामाला वनवास घडविला. '**भरतादधिके रामः प्रियकृन्मे प्रियंवदः**' म्हणणारी ही माताच त्याच्या वनवासाला कारण व्हावी हो 'कुब्जेची किमया' आहे.

मंथरेनेंच हें विष तिच्या मनांत भरविलें. नि एकदां हें वेड डोक्यांत शिरल्यावर मात्र ती कुणाचेंहि ऐकेना. तिचा हट्टी, दुराग्रही, अहंकारी स्वभाव तिथें स्पष्ट होतो. जेव्हां भरतच तिची निर्भत्सना करतो तेव्हांच ही तिची धुंदी खाडकन् उतरते. आणि मग मात्र पश्चात्तापानें तिचें हृदय जळूं लागतें. भारद्वाजांच्या आश्रमांत तिनें मुनींचे चरण घट्ट धरले ते ह्याच अपराधाच्या जाणिवेनें. परम लज्जित

होऊनच रामाला भेटून तिनें काढलेले उद्गार हृदयाला भिडतात. म्हणजे दुष्टता व सापत्नभाव हा तिचा स्थायीभाव नव्हे. म्हणूनच भारद्वाजांनीं व रामचंद्रांनीं भरताला बजाविलें होतें,

न दोषेणावगन्तव्यः कैकयी भरत त्वया ।
न तेऽम्बा मध्यमा तात गर्हितव्या कदाचन ।
न चापि जननीं बाल्यात्त्वं विगर्हितुमर्हसि ।

—कैकयीला तूं दूषणीय समजूं नकोस. तिचा अपमान करून तिला दुःख देऊं नकोस.

ही कैकयी दशरथाबरोबर युद्धासाठीं रणांगणावर गेल्याचा रामायणांत उल्लेख आहे. मंथरा म्हणते,

अपवाह्य त्वया देवी संग्रामान्नष्टचेतसः ।
तत्रापि विक्षतः शस्त्रैः पतिस्ते रक्षितस्त्वया ॥
(वा. रा. अयोध्या सर्ग ९ श्लोक १६)

' रणांगणांत शस्त्रांनीं जखमी झालेल्या राजाला सारथ्य करणाऱ्या तूं दूर नेऊन त्याचे प्राण वांचविलेस.' अध्यात्म रामायणांतील उल्लेख याहून जरा निराळा आहे. रथाच्या मोडलेल्या आंसाच्या जागीं आपला हात घालून ढांसळणारा रथ तिनें सांवरून धरल्याचें हें वर्णन आहे. क्षत्रिय स्त्रीला युद्धशास्त्र अवगत होतें. प्रसंगीं ती सारथ्यहि करीत असे नि संग्रामांतहि सहभागी होई. कैकयीचें चरित्र याच दृष्टीनें अभ्यसनीय व अनुकरणीयहि ठरेल.

* * *

**सुमित्रा** ही दशरथाची धाकटी राणी. आपलें स्थान दुय्यम आहे हें ओळखून ती आरंभापासून अखेरपर्यंत वागली आहे. कौसल्येसारखा पट्टराणीचा मान किंवा कैकयीसारखें पतीचें प्रेम लाभलें नाहीं म्हणून ती त्यांच्याशीं दुष्टतेनें वागली नाहीं. स्वतःचे दोन्ही पुत्र सवतींच्या मुलांचे अनुचर बनून राहिले याचा तिनें विषादहि मानला नाहीं, कीं त्यांना कधीं दुष्टतेचें वा दुजाभावाचें शिक्षणहि दिलें

नाहीं. उलट त्यांच्यांत बंधुभाव राहावा अशीच तिची इच्छा आहे. रामाबरोबर वनवासाला निघालेल्या लक्ष्मणाला ती सांगते,

**रामे प्रमादं मा कार्षीः** । तसेंच

**एष लोके सतां धर्मं यज्ज्येष्ठ वशगो भवेत्** ॥

( अयोध्या सर्ग ४० श्लोक ६ )

'रामाचा अपराध कधीहि करूं नकोस.',

'वडिलांच्या आज्ञेप्रमाणें वागणें हाच श्रेष्ठ धर्म'

**रामं दशरथं विद्धि मां विद्धि जनकात्मजाम्** ।

**अयोध्यां अटवीं विद्धि**............ ( अयोध्या सर्ग ४० श्लोक ९ )

'रामाला दशरथाच्या व सीतेला माझ्या जागीं मानून रहा.'

अशा मातेचीं मुलें बंधुप्रेमी न निघालीं तरच नवल ! किती उदार मनें, केवढी थोर शिकवणूक ! सुमित्रा खरीच ती ! सदा कौसल्येच्या सान्निध्यांत, सहवासांत नि संगतींत ! दोघींचें फारच सख्य आहे. कधीं तिच्या साधनेंत साह्य करील, कधीं प्रेमानें मोठी बोलेल तर कधीं शुश्रूषेंत दंग होऊन जाईल. शोकार्त कौसल्येचें सांत्वन करतांनाहि "**सीतेयानुगता लक्ष्मी तस्य कीं नाम दुर्लभम्**" वगैरे शब्दांत राम-सीतेचें गुणगान करूनच तिचें समाधान करण्याचा प्रयत्न तिनें केला आहे. "रामासारखा पुत्र जिला लाभला तिला शोकाचें कारणच नाहीं." असें ती म्हणते. सावत्र मुलांबद्दल केवढा अभिमान ! किती प्रेम ! कोण कौतुक ! सुमित्रा म्हणजे मातृत्वाचा महन्मंगल आदर्श वाटतो तो यामुळेंच ! किती सुमधुर स्वभावचित्र आहे हें ! सापत्नमातांसाठीं केवढा दिव्य आदर्श सुमित्रेनें आचरून दाखविला आहे !

नों. नं. ९५३५६
८।२५।५८

## : ५ :  रामायणकालीन स्त्रिया :

### सति सुलोचना

**दशरथाच्या** तीन स्त्रियांप्रमाणेंच त्याच्या चार सुनांचें चारित्र्यहि अभ्यासनीय आहे. राम-पत्नी सीता तर साध्वी म्हणून जगद्वंद्य ठरली आहे. तिच्या तिघी बहिणीहि सतित्व आणि सहनशीलतेंत तिच्यासारख्याच श्रेष्ठ ठरणाऱ्या आहेत.

रामचंद्राबरोबरच लक्ष्मणहि वनवासाला निघाला. सीतेनें वनवास पत्करला, त्यांत पतिसहवासाचें सौख्य होतें. राजवाड्यांत राहणाऱ्या **उर्मिलेला** मात्र चौदा वर्षे पतीची कसलीहि वार्ता समजल्यावांचून त्याचें विरहदुःखच सोशीत राहावें लागणार होतें. रामाच्या सेवेसाठींच वनांत निघालेल्या लक्ष्मणाबरोबर तिला जातां येणार नव्हतें. त्याच्या इच्छेच्या आड येऊं नये, त्याच्या कर्तव्यांत खंड पडूं नये म्हणून आपल्या दुःखाला वाचाहि न फोडतां स्वस्थ राहणेंच तिला भाग होतें आणि पतीच्या सुखांत सुख मानणाऱ्या, त्याच्या गौरवांत आनंद वाटणाऱ्या उर्मिलेनें मूकपणानेंच या साऱ्या यातना सहन केल्या आहेत.

भरतानें राज्याची व्यवस्था पाहण्याचें कबूल केलें खरें, पण राजोपचारांचा त्याग करून तोहि जटाधारी बनला. अयोध्या सोडून नंदिग्रामीं जाऊन राहिला, शत्रुघ्नानेंहि त्यालाच साथ दिली. **मांडवी** व **श्रुतकीर्ति** याहि उर्मिलेप्रमाणेंच पतिसहवासाला अंतरल्या. दुःखांत सुख इतकेंच कीं ऊर्मिलेप्रमाणें त्यांचे पति देशांतराला गेले नव्हते. त्यांचा क्षेम-समाचार त्यांना वरचेवर कळत होता.

पण तरीहि त्यांचें मूक दुःख मोठें होतें. ज्या शांतपणानें, आनंदानें त्यांनीं तें सहन केलें त्याबद्दल कुणीहि त्यांना धन्यवादच देत राहील. रावण-पुत्र इंद्रजिताची पत्नि **सुलोचना** हिनें उर्मिलेचें श्रेष्ठत्त्व मोकळ्या मनानें कबूल केलें आहे तें यामुळेंच !

सति सुलोचना राक्षस-स्त्री असली तरी महान्-पतिव्रता होती. तिचें सुंदर स्वभावचित्र एकनाथांनीं आपल्या भावार्थ-रामायणांत रंगविलें आहे. आनंद-रामायणांत तिची मूळ कथा आढळते तीहि अत्यद्भुत आहे.

रावणाचा महापराक्रमी पुत्र **इंद्रजित** तथा **मेघनाद** याला जिंकण्याची प्रतिज्ञा करून लक्ष्मण निघाला, तेव्हां रामचंद्र सांगतात,

**"आपल्या पराक्रमानें व रणकौशल्यानें तूं विजयीच होशील याबद्दल मला खात्री आहे. पण एक गोष्ट ध्यानांत ठेव कीं तो एकपत्निव्रता असून त्याची स्त्री ही श्रेष्ठ पतिव्रता आहे. अशा साध्वी स्त्रीच्या पतीचें मस्तक रणभूमीवर पडलें तर सारी सेना उध्वस्त होऊन युद्धांत जय मिळणेंच अशक्य होईल. म्हणून मेघनादाचें मस्तक भूमीवर पडणार नाहीं अशी खबरदारी घे"**

ही सूचना स्मरणांत ठेवून लक्ष्मणानें शत्रूचें शिर छेदतांच पराक्रमी हनुमंतानें तें वरच्यावर झेलून धरलें व रामाच्या हातीं आणून दिलें. मेघनाद मरण पावला आणि त्याचा तुटलेला उजवा हात आकाशांतून भ्रमण करीत सुलोचनेच्या समोर येऊन पडला.

**"सुलोचनाऽपि कांतस्य भुजं केयूरभूषितम् । २०५**
**दृष्ट्वा समांगणं स्वीय पुरतः पतितं भुवि ।**
**तदा विलापमकरोत् स्मृत्वा तत्पौरुषाणि सा ॥ २०६**

(आनंदरामायण. सारकांड. युद्धचरित्र. सर्ग ११)

महालांत बसलेल्या सुलोचनेला आकाशमार्गानें आलेला तो तुटका हात पहातांच विलक्षण विस्मय वाटला. आपल्या पतीचा तो हात तिनें ओळखला व ती त्याचा पराक्रम आठवून शोक करूं लागली. पण साशंकतेमुळें ती त्याला स्पर्श करीना. संशयाच्या निराकरणासाठीं ती म्हणाली "तूं माझ्या पतीचाच हात असशील तर माझ्या पातिव्रत्याच्या शक्तीनें समर्थ होऊन मला रणांगणावरील वृत्त लिहून दाखवशील" हें ऐकतांच त्या हातानें बाणानें भूमीवर लिहिण्यास प्रारंभ केला. आणि सांगितलें—

"मा खेदं भज भामिनी ! " प्रिये ! शोक करूं नकोस.

साक्षाच्छेष-शराघातैर्हतोऽहं मुक्तिमागतः ।

त्वंचापि गत्वा श्रीरामं नत्वा याचस्व मच्छिरः ॥ २०८

तत्त्वां दास्यति रामोऽपि तेनाग्निं विश्य याहि माम् ।

"साक्षात् शेषाचा अवतार जो लक्ष्मण त्याच्या बाणानें मरण पावल्यानें मी मुक्त झालों आहे. तूंहि रामाकडे जा, त्याजकडून माझें शिर मागून घे व तें घेऊन अग्निप्रवेश करून मला येऊन भेट."

सुलोचनेची खात्री पटली. पतीची आज्ञा प्रमाण मानून सासुसासऱ्यांच्या अनुज्ञेनें ती रामाकडे आली. रामानें तिचें आदरपूर्वक स्वागत केलें. मेघनादाच्या पराक्रमाची स्तुति केली. त्याच्या मृत्यूबद्दल खेद दर्शविला व तिची इच्छा विचारली. सुलोचनेनें रामाची स्तुति आरंभिली; पण राम तिचें निवारण करून म्हणतात, **"तूं परम पतिव्रता आहेस. तुझा महिमा अगाध आहे. माझी स्तुति करून मला लज्जित करूं नकोस. सांग मी तुझी कोणती सेवा करूं ?"** सुलोचनेने येण्याचा हेतु कळविला. तात्काळ मेघनादाचें मस्तक तिच्या हातीं देण्यांत आलें.

तें छिन्न मस्तक पहातांच तिला शोक अनावर झाला. रडतां रडतांच लक्ष्मणाला तिनें सांगितलें-" **मी मेघनादाचा वध केला असें वाटूं देऊं नका. त्यांना मारण्याला कुणीहि समर्थ झालें नसतें; पण हा लढा दोन वीरांमधील नसून दोन पतिव्रतांमधील आहे. माझ्याप्रमाणेंच आपली पत्नी उर्मिला एक श्रेष्ठ पतिव्रता आहे. तिच्या सामर्थ्याला साध्वी सीतेच्या सामर्थ्याची जोड मिळाली, माझी शक्ति त्यामुळें क्षीण ठरली. शिवाय माझे पति पर-स्त्रीचें हरण करणाऱ्या पित्याचें अन्न खात होते, त्याच्यासाठीं लढत होते, म्हणूनच त्यांचा पराजय झाला."** किती मार्मिक आहे हें विवेचन !

हें सारें ऐकणाऱ्यांना नि पाहणाऱ्यांना आश्चर्य वाटलें. सुलोचनेला पतीचें शिर रामाजवळ आहे हें कसें समजलें, हेंच त्यांना कळेना. "पतिव्रतेला कांहींच अशक्य नसतें." या राम-वाक्यानेंहि त्यांचें समाधान होईना. सुलोचनेनें सांगितलेली कथा ऐकून सुग्रीवानें संशय प्रगट केला. "निष्प्राण हात कां लिहूं शकतो ? कधीं मृत मस्तक हंसलें तरच मी यावर विश्वास ठेवीन."

## इंद्रजिताची आदर्श पत्नी...



## ....सति सुलोचना

रामचंद्रांनीं पुन्हां एकदां सतीच्या सामर्थ्याबद्दल निर्वाळा दिला. त्यांचा आशय सुलोचनेच्या ध्यानीं आला "मन, वाचा, कर्मद्वारां मी पतीला देवता मानून प्रेम केलें असेल तर माझ्या पतीचें हें छिन्न मुखमण्डल हंसूं लागेल." असें ती म्हणते तोंच तें तुटलेलें मस्तक जोरानें हंसूं लागलें. साऱ्यांचा संदेह नष्ट झाला.

यानंतर पतीच्या उत्तर-क्रियेसाठीं एक दिवस युद्ध बंद ठेवण्याची विनंति रामाला करून सुलोचना लंकेंत परतली. सागराच्या तीरावर चिता रचून तिनें पतिबरोबर सहगमन केलें.

मराठी ग्रंथ संग्रहालय
सं. क्र. ५६३९
स्थळ प्रत

## : ६ : : रामायणकालीन स्त्रिया :

### महान् साध्वी सीतादेवी

**जनकजा सीता** म्हणजे वाङ्मय निधींतील अमोल रत्न आहे. "**सुदुष्कर-मिदं पुत्रि तव चारित्र्य-लक्षणम्।**" या दशरथाच्या म्हणण्याप्रमाणें खरोखरीच तिचें सर्वच चरित्र अलौकिक, आचरण्याला कठीण आणि अथपासून इति-पर्यंत अति विलक्षण असेंच आहे. यामुळेंच घरींदारीं ती सर्वांना फारच प्रिय झाली. अशी स्त्री मानुषी आहे, हें सांगणें कवि-प्रतिभेलाहि कठीण वाटलें आणि म्हणूनच ती 'अयोनिजा' असल्याची कल्पना सुचली असावी.

सामान्य स्त्रीप्रमाणें मातेच्या उदरीं तिचा जन्म नाहीं. ती भूमींतून वर आली व जनकानें तिचा मुलीप्रमाणें सांभाळ केला. पृथ्वीतून निघालेली म्हणून **सीता**, जनककन्या म्हणून **जानकी**, मिथिलेची म्हणून **मैथिली** अशा विविध नांवांनीं जग तिला ओळखूं लागलें.

अत्यंत रूपवती असल्यानें सर्वांनाच तिच्या प्राप्तीची आंस होती. पण तिची अलौकिकता जाणून तिच्या प्राप्तीसाठीं शिवधनुष्य सज्ज करण्याचा 'पण' राजा जनकानें लावला होता. इतकें अतुल वीर्य दर्शविणाऱ्या पराक्रमी पुरुषालाच ती वरणार होती. म्हणूनच वाल्मिकी तिला **वीर्यशुल्का** म्हणतात. अशा वीरबालेला रामचंद्रांसारखा मर्यादा-पुरुषोत्तम पति लाभला, आणि यापुढील तिचें सारें जीवन राममय झालें. सतित्वाचा महान् आदर्श आचरणांत उतरला. एक असामान्य व्यक्तिचित्र रंगविलें गेलें.

रामाला यौवराज्याभिषेक होणार या आनंदांत ती असतांनाच वनवासांत निघालेल्या रामचंद्रांनीं तिला निरोप मागितला. तिनें बरोबर येण्याचा हट्ट धरतांच त्यांनीं वनवासांतील हाल, दुःख यांचें वर्णन करून '**बहु दोषंहि कान्तारं ततो दुःखमतो वनम्**" असें सांगून तिची समजूत घालण्याचा प्रयत्न केला. पण त्याचा तिच्या मनावर यत्किंचितूहि परिणाम झाला नाहीं. ती सांगते—

**कुशकाश शरेषीकाः ये च कण्टकिनो द्रुमाः ।**
**तुलाजिनसमस्पर्शो मार्गे मम त्वया सह ॥**

(अयोध्या. सर्ग ३० श्लोक १२)

**पत्रं पुष्पं फलं मूलं अल्पं वा बहु वा यदि ।**
**दास्यसे स्वयमाहृत्य तन्मेऽमृत फलोपमम् ॥**

(अयोध्या. सर्ग ३० श्लोक १५)

"तुमच्याबरोबर काट्यावरूच चालतांनाहि मला मऊ गालिच्यावरून चालण्यासारखें वाटेल. स्वतः खाऊन जीं फळेंपुळें तुम्ही द्याल तींच मला अमृतमधुर वाटतील."

"माझ्यामुळें वनवासांत आपल्याला त्रास होणार नाहीं. उलट आपलें कार्य साधण्यांत मी साह्यच करीन" असें ती सांगते. आणि अखेर "**मला न नेतां वनांत जाल तर मी प्राणत्याग करीन,**" हा निर्धार प्रगट करते. रामचंद्रांशीं याप्रसंगीं तिनें चांगलाच वाद घातला आहे व त्यांत ती विजयी ठरली आहे.

* * *

**अखेर** ही मृगशावाक्षी, मृदुशीला, मनस्विनी वनवासाला निघाली. वल्कल कसें वेढावें हें ठाऊक नसलेल्या या सुकुमारीला रामांनींच तें नेसविलें. वाहनांवाचून जी कधीं विहरली नव्हती ती अनवाणी चालूं लागली. पर्यंकावरील मऊ बिछान्यावर झोंपण्याची जिला संवय ती तृणशय्येवर निजूं लागली. पण प्रभु रामचंद्र सांगतीं होते, यांतच तिचें सारें सुख सांठवलेलें होतें.

वनवासाला निघतांनाहि राम-लक्ष्मणांनीं शस्त्रें परिधान केलीं होतीं. तापसी वेषाला व वृत्तीला हें शस्त्रधारण शोभणारें नव्हतें. सीतादेवीनें पुन्हां चर्चेला प्रारंभ केला.

**'कदर्यकलुषा बुद्धिर्जायते शस्त्रधारणात् ।'**
**'अपराधं विना हन्तुं लोके वीर न मंस्यते ।'**
**'अयोध्यायां पुनर्गत्वा क्षत्रधर्मं चरिष्यसि ।'**

"शस्त्रधारणानें बुद्धि कलुषित होते, अपराधावांचूनच एखाद्याला शासन घडतें. अशानें वीर म्हणून मान्यताहि मिळत नाहीं. तेव्हां शस्त्रें टाकून द्या. पुन्हां अयोध्येंत गेल्यावर त्यांचा स्वीकार करा." आणि इतकें सांगून ती म्हणते—

**स्त्री-चापलादेतदुपाहृतं मे। धर्मं च वक्तुं तव कः समर्थः ।**

" स्त्रीसुलभबुद्धीनें मी हें सांगतें आहे, एरवीं आपल्याला धर्मज्ञान शिकविण्यास कोण समर्थ असणार ?" केवढा हा विनय !

" वनवासांतहि आर्तांच्या रक्षणाचें कार्य मला केलेंच पाहिजे, म्हणून मी हीं शस्त्रें धारण केलीं आहेत." असें सांगून रामांनीं तिचें समाधान केलें आहे. योग्य वाटेल ती गोष्ट पतीला सुचविण्यास पतिव्रता चुकत नसते. मात्र विनीतवृत्तीमुळें तो उपदेशहि पतीला प्रियच वाटतो.

वनवासी सीतेचें वर्णन करतांना शूर्पणखा रावणाजवळ तिच्या गुणांचेंहि वर्णन करते. ' सुरूपा, वपुश्लाघ्या " याप्रमाणें " सुशीला यशस्विनी " असेहि शब्द ती वापरते. " **धर्मपत्नी प्रिया नित्यं भर्तुः प्रियहितेरता** " प्रिय पतीच्या हितासाठीं नित्य जागरूक असणारी धर्मपत्नी हें तिनें सीतेचें केलेलें वर्णन किती यथार्थ आहे ! शूर्पणखेप्रमाणेंच मारिच्यानेंहि तिच्या तेजस्वितेची, पातिव्रत्याची स्पष्ट कल्पना रावणाला दिली आहे. ' **रक्षिता स्वेन तेजसा** ' स्वतःच्या तेजस्वितेमुळेंच संरक्षिली जाणारी ही सीता ' **दीपस्येव हुताशस्य शिखा सीता तु मध्यमा** ' प्रज्वलीत अग्नीच्या ज्वालेप्रमाणें तो दीप्तिमान् आहे. तूं तिच्या वाटेस जाऊं नकोस, असेंच मारीच रावणाला सांगतो.

पण कुणाचेंहि न ऐकतां रावणानें कपटानें तिचें हरण केलें. या शोकाकुल अवस्थेंतहि स्वतःच्या सुटकेचा प्रयत्न केल्यावांचून ती राहिली नाहीं. मार्गावर गळून पडलेली अंगावरील फुलें व जटायु आणि रावण यांच्यांतील युद्धाचीं चिन्हें हीं रामाला मार्गदर्शक ठरणार होतींच. यानंतर मंत्र्यांसहित सरोवराच्या कांठीं बसलेल्या सुग्रीवाला पहातांच त्यांच्या मध्यभागीं तिनें आपल्या अंगावरील कांहीं अलंकार वस्त्रांत बांधून टाकून दिले आहेत. रावणानें आकाशमार्गानें पळवून नेलेली स्त्री हीच आपली सीता हें या चिन्हांवरुन रामांनीं अचूक ताडलें असतें याची तिला खात्री होती.

रावणानें तिला अशोकवनांत नेऊन ठेवली. आणि अनेक प्रलोभनें दाखविली. स्वतःच्या ऐश्वर्याचें , सामर्थ्याचें वर्णन केलें. रामाची धनहीन स्थिति दर्शविली. तिला नाशाची भीति घालून पाहिली. पण तें सारें व्यर्थ झालें. ' **शक्या लोभयितुं नाहं ऐश्वर्येण धनेन वा** ! ' ऐश्वर्याला लुब्ध होणारी मी नव्हे असें तिनें सांगि-

तलें. " **दीनो वा भाग्यहीनो वा यो मे भर्ता स मे गुरुः ।** " दीन असो कीं भाग्यहीन असो जो माझा पति आहे तोच मला प्रिय वाटतो. " **अनन्या राघवेणाहं** " " मी रामाशीं एकनिष्ठच राहणार " हा निर्धार ती व्यक्त करते आणि हें सारें '**राघवं पृष्ठतः कृत्वा** " रावणाकडे तिरस्कारानें पाठ फिरवून ! केवढी निस्पृहता, निर्भयता आणि पतिप्रेम तिनें दाखविलें आहे !

त्याची नाशाची धमकी ऐकूनहि न घाबरतां ती सांगते—

**" इदं शरीरं निःसंज्ञं बंध वा घातयस्व वा " या निःसंज्ञ देहाचें काय वाटेल तें कर. कारण " नेदं शरीरं रक्ष्यं मे जीवितम् वाऽपि राक्षस " हें शरीर व जीवित मला रक्षणीय वाटत नाहीं. पातिव्रत्याच्या रक्षणासाठीं मी त्याचा आनंदानें त्यागच करीन." आणि रामाबद्दल तुच्छतेनें बोलणाऱ्या रावणाला ती बजावते " स सीतां मोचयेदिह " मी इथें आहे हें कळण्याचाच अवकाश माझे पति तात्काल येऊन माझी सुटका केल्यावांचून राहणार नाहींत.**

अशी ही भर्तृवात्सल्यभूषिता सीता पतिदर्शनाची लालसा अनावर होऊन कदाचित् प्राणत्यागहि करील या भयानें इंद्र तिची भेट घेतो. त्यावेळीं मायावी राक्षसांच्या सान्निध्यांत आपण आहोंत हें जाणून अखल्यानें ती सांगते, " रामलक्ष्मणांच्या सांनिध्यांत मी देवांचीं लक्षणें पाहिलीं आहेत. तूं जर देवेंद्र असशील तर तीं दैवी चिन्हें मला दाखीव " व तीं पाहूनच सीता त्याचें सांगणें ऐकतें, त्याच्या दिव्याशाचा स्वीकार करते. हनुमंतालाहि " **यानि चिन्हानि रामस्य लक्ष्मणस्याहि वानर । तानि भूयः समाचक्ष्व** " रामलक्ष्मणांच्या खाणाखुणा मला सांग असें ती सांगते. त्यानें त्यांचें वर्णन केल्यानंतर रामनामांकित मुद्रिका पाहील्यावरच ती त्याच्यावर विश्वास ठेवते. '**अर्हसे च कपिश्रेष्ठ मया समभिभाषितुम् ।** ' ' माझ्याशीं बोलण्याला तूं पात्र आहेस ' म्हणून संभाषणाला आरंभ करते. ही सावधता, जागरुकताच तिला वेळोवेळीं उपयोगी पडते.

" पृष्ठमारोह मे देवी । " " माझ्या पाठीवर बसून तूं रामाकडे चल " या हनुमानाच्या विनंतीला तिनें दिलेलें उत्तरहि असेंच चातुर्ययुक्त व पतिप्रेम-निदर्शक आहे.–" **वायुवेगानें तूं समुद्रावरून जाशील तेव्हां भयानें मी समुद्रांत**

पडेल. राक्षसांनीं पाठलाग केला तर मी बरोबर असल्यानें तूं त्यांना प्रतिकार करण्याला असमर्थ ठरशील. शिवाय यांत रामांना भूषण नाहीं. रावणाला मारून त्यांनीं माझी सुटका करणें हेंच त्यांच्या कीर्तीला भूषण ठरेल. आणि रामावांचून अन्य पुरुषाचा स्वेच्छेनें माझ्या देहाला स्पर्श होऊं देणें हें माझ्या पतिभक्तीला रुचणार नाहीं."

'हनुमंता, मी तुझ्याबरोबर येणार नाहीं ! ....'



...महान् साध्वी सीतादेवी

असें ती सांगते. सतीच्या विनयशीलतेला साजणारें हें उत्तर ऐकून हनुमान परततो. त्याला पाहून त्यांची चौकशी करणाऱ्या राक्षसींना '**रक्षसां कामरूपाणां विज्ञाने का गतिर्मम**' मायावी राक्षसांची माया मला कुठून कळणार ? असें खुबीदार उत्तर देऊन ती मोकळी होते.

* * *

**यानंतर** राम-रावणाचें युद्ध होऊन रावण मारला गेला. दर्शनोत्सुक सीतेला रामाचें दर्शन घडलें. पण "**यथेष्टं गम्यताम्**" 'तुला वाटेल तिकडे तूं जा' असें रामांनीं सांगतांच तिला तें असह्य झालें. दीर्घ सहवासानंतरहि पतीनें आपल्या पातिव्रत्याबद्दल संशय घ्यावा हा तिला अपमान वाटला. संतप्त होऊन तिनें त्यांची खूप निर्भत्सना केली. '**मिथ्यावादोपहता नाहं जीवितुमुत्सहे**' मिथ्यापवाद सहन करून मी जगूंच शकत नाहीं असें ती म्हणते. आणि '**विश्वासार्थं हि रामस्य लोकानां प्रत्ययाय च**' रामाच्या विश्वासार्थं व लोकांची खात्री पटविण्यासाठींच अग्निदिव्याला ती सिद्ध होते. अग्निप्रवेश करतांना '**मदधीनं तु यत्तन्मे हृदयं त्वयि वर्तते**' "रावणानें बळेच उचलून मला आपल्या बंदिवासांत अडकविलें असलें तरी माझ्या अधीन असलेलें माझें हृदय मात्र आपल्यात चिंतनांत व्यग्र होतें" असें ती सांगते.

**"यथा मे हृदयं नित्यं नापसर्पति राघवात्**
**तथा लोकस्य साक्षी मां सर्वतः पातु पावकः।"**

(युद्धकाण्ड सर्ग ११७ श्लोक २६)

"माझें हृदय रामापासून कधींहि क्षणभरहि ढळलें नसेल तर सर्वसाक्षी अग्नी मला न जाळतां माझें रक्षणच करील" अशी प्रतिज्ञा उच्चारून ती खुशाल अग्नींत शिरते, इतकी तिची ओजस्विता लोकोत्तर आहे.

अशा रीतीनें तावून सुलाखून निघाल्यावर "तुझ्या शुद्धतेबद्दल मी निःशंक होतो, पण लोकांना संशय राहूं नये म्हणून मी तुला दूषण दिलें" असें तिचें समाधान करून रामचंद्रांनीं तिच्यासह अयोध्येंत प्रवेश केला, राज्यकारभार हातीं घेतला. व सुखानें काल-क्रमण आरंभिलें. तोंच पुन्हां एकदां लोकापवादानें उचल खाल्ली. सीतेच्या निष्कलंकतेबद्दल खात्री असूनहि सिंहासनाच्या इभ्रतीसाठीं रामांनीं प्रिय पत्नीचा त्याग केला.

यावेळीं ती अधिक असहाय होती. पण पतीचें हृद्गत ओळखत असल्यानें याबद्दल तिनें चुकूनहि त्यांना दोष दिला नाहीं. उलट "**प्राणादपि प्रियं तस्मात् भर्तुः कार्यं विशेषतः।**" "आपल्या प्राणाहूनहि पतीचें कार्य पत्नीला प्रिय

असतें " असा निरोप लक्ष्मणाबरोबर ती पाठवते. किती ही सहनशीलता ! किती उत्कट प्रीति ही ! रामाचा पवित्र वंश उदरीं अंकुरित होत होता म्हणूनच ती यानंतर जिवंत राहिली.

तिच्यावरील वृथा कलंक दूर व्हावा अशी वाल्मिकींनींच ईर्ष्या धरली. लवकुशांना पुढें घालून सीतेसह त्यांनीं रामाची गांठ घेतली. " इयं शुद्ध समाचारा अपापा मैथिली ।" असें सांगून तिचा स्वीकार करण्याला सुचविलें. लोकांच्या समाधानासाठीं तिजकडून पुन्हां दिव्य मागण्यांत आलें. लवकुशांचा स्वीकार केल्याखेरीज रामचंद्र राहाणार नाहींत या खात्रीनें जीवन संपविण्याचाच निर्धार करून तिनें सर्वांसमक्ष प्रतिज्ञा उच्चारली,

**" यथाहं राघवादन्यं मनसापि न चिंतये ।**
**तदा मे माधवी देवी विवरं दातुमर्हसि ।"**

( उत्तर कांड सर्ग ९८ श्लोक १४ )

आणि लाडक्या लेकीच्या हाकेला या निर्वाणीच्या क्षणी धरती माता खरीच धांवून आली. धरणी दुभंग झाली. सीतेसाठीं उत्तम आसन वर आलें. ती त्यावर बसतांच तिच्यासह तें भूमींत दिसेनासें झालें. पृथ्वी पुन्हां पूर्ववत् झाली.

संपलें सीतेचें चरित्र ! आरंभा इतकीच अखेरहि विस्मयजनक ! हें सारें पाहिलें कीं मन थक्क होतें. आणि म्हणावेसें वाटतें— " **साधु साध्विति वै सीते यस्यास्ते शीलमिदृशम् !** " सीते ! धन्य तूं ! आणि धन्य तुझा भारतदेश !

# : ७ : : रामायणकालीन कांहीं स्त्रिया :

रामायणांतील प्रमुख स्त्रियांचें जीवन गेल्या तीन लेखांकांत रेखाटण्याचा मी प्रयत्न केला आहे. प्रेमळ आणि उदार **कौसल्या**, शूर आणि हट्टी **कैकयी** शांत आणि सहनशील **सुमित्रा**, महान् पतिव्रता राक्षसपत्नी सति **सुलोचना** आणि प्रातःस्मरणीय श्रेष्ठ साध्वी अयोनिजा **सीतादेवी**, ह्या रामायणांतील प्रमुख स्त्रिया; परंतु या श्रेष्ठ स्त्रियांप्रमाणेंच रामायणकालीन इतर स्त्रियांचें जीवनहि आदर्श आणि अभ्यासनीय आहे.

रामायणकालीन स्त्री-पुरुषांचें वर्णन करतांना आदिकवि सांगतात,

**सर्वे नराश्च नारीश्च धर्मशीलाः सुसंयताः**
**मुदिताः शीलवृत्ताभ्यां महर्षय इवामलाः ॥**

(वाल्मिकी रामायण. बालकांड. सर्ग ६ श्लोक ९)

सर्व स्त्री-पुरुष धर्मशील, संयमी, सदाचरणांत संतोष मानणारे, शुद्धाचरणी होते, असें त्यांचें सांगणें आहे व त्याचीं अनेक उदाहरणें सर्व रामायणांत विखुरलेलीं आहेत.

पत्नी ही सहधर्मिणी असते हें आपण यापूर्वींच पाहिलें आहे.

राजा दशरथाचें हें वर्णन पहा—

"श्रीमांश्च सहपत्नीभिः राजा दीक्षामुपाविशत्।" पत्नीसह राजानें यज्ञदीक्षा स्वीकारली आणि यज्ञीय अश्वाची परिचर्या करणाऱ्या कौसल्येचें हें वर्णन पहा-

**कौसल्या तं हयं तत्र परिचर्य समन्ततः ।**
**कृपाणैर्विशशासैनं त्रिभिः परमया मुदा ॥**

(बालकांड. सर्ग १४ श्लोक ३३)

**पतत्रिणा तदा सार्धं सुस्थितेन च चेतसा ।**
**अवसद्रजनीमेकां कौसल्या धर्मकाम्यया ॥**

(बालकांड. सर्ग १४ श्लोक ३४)

यौवराज्याभिषेकापूर्वी करावयाचे विधि, आचरण्याचीं व्रतें सीतेसह आचरावयाचीं आहेत. कारण तीहि आतां युवराज्ञी होणार आहे. रामाप्रमाणेंच तिलाहि हा अभिषेक होणार आहे आणि हें साहजिकच आहे. आपलें कोणतेंहि धर्मकार्य पत्नीवांचून पुरें होत नाहीं. भारतीय संस्कृतींत स्त्रीचें स्थान पुरुषाइतकेंच महत्त्वाचें आहे.

वेदकालीन स्त्रियांप्रमाणेंच रामायणकालीन स्त्रियाहि यज्ञयाग करतांना दिसतात. स्वतः कौसल्याच श्रीरामाच्या कल्याणार्थ होमहवन करीत असे. " अग्नी जुहोति स्म तदा मंत्रवन्कृतमंगला " हें अशाच एका प्रसंगीं तिचें वर्णन केलेलें आहे.

मुलाप्रमाणेंच मुलीचीहि मुंज होई. तिला गायत्रीचा उपदेश मिळे. उपासनेचा अधिकार असे. सीता संध्या करीत असल्याचा स्पष्ट उल्लेख वाल्मिकी–रामायणांत आहे. सुंदरकांडातील सर्गांत श्रीहनुमानांनीं काढलेले हे उद्गार पहा,

**संध्याकालमनाः श्यामा ध्रुवमेष्यति जानकी ।**
**नदीं चेमां शुभजलां संध्यार्थे वरवर्णिनी ॥**

* * *

**अत्री** ऋषींची पत्नी **अनसूया** महातापसी होती. **शबरी**सारखी भिल्लीणी तपाचरणांत निमग्न होती. मयकन्या **स्वयंप्रभा** नि तिची सखी **हेमा** गुहेंत राहून तप करीत होत्या. संसाराप्रमाणेंच सत्यशोधनाकडेहि स्त्री वळली होती, प्रपंचा-इतकीच परमार्थांत रंगली होती, हेंच हीं दृश्यें पुनः पुनः सांगतात. " **सा सिद्धा सिद्धसंमता** " हें शबरीचें वर्णन किंवा " **अद्य प्राप्ता तपःसिद्धिः** " हे तिचे उद्गार व स्वतःच्या सिद्धीनें वानरांना मायामय गुहेंतून पार करण्याचें हेमाचें सिद्धिसामर्थ्य हीं संसारांतच स्त्रीजन्माचें सार्थक मानणारांना उत्कृष्ट उत्तरें आहेत. या स्त्रिया संसाराला असमर्थ नव्हत्या. रूपगुणशीलवती, सुदृढ, निरोगी व सामर्थ्य–संपन्न होत्या. नाईलाजानें नव्हे तर खुषीनें, हौस म्हणून त्यांनीं हें वेगळें क्षेत्र निवडलें नि त्यांत पारंगततादि मिळविली. संसार सोडून विशिष्ट ध्येयाच्या मागें लागलेल्या या भारतीय स्त्रियांनीं केवळ चूल नि मूल हेंच कांहीं स्त्रीचें कार्यक्षेत्र नव्हे हें स्वकृतीनेंच सिद्ध केलें आहे.

या स्त्रियांचीं खास भारतीय वैशिष्ट्यें नजरेंत भरणारीं आहेत. सतीत्व, पातिव्रत्य हा भारतीय स्त्रीचा सर्वश्रेष्ठ सद्गुण आहे. याच गुणविशेषानें पाश्चात्यांवर मोहिनी

घातली. हा विशेष अतिप्राचीन आहे. रामायणांत अत्री-पत्नी **अनसूया** व वसिष्ठ-पत्नी **अरुंधती** यांचा उल्लेख 'पतिव्रतासु अग्रगण्या' असाच केला जातो. पति हेंच आर्य स्त्रीचें दैवत असाच उपदेश अनसूया सीतेला करते.

"**जीवन्त्याहि स्त्रिया भर्ता दैवतं प्रभुरेवच** ।"-पति हाच देव.

"**पतिशुश्रुषया नारी लभते स्वर्गमुत्तमम्** !"-पतिसेवेनें स्त्रीला स्वर्ग-प्राप्ति होते.

"**भर्तारं नानुवर्तेत सा च पापगतिर्भवेत्** ।" पतीला न अनुसरणारी अधोगतीला जाते, हा आर्य-स्त्रियांचा दृढविश्वास. रामायणांतील सर्वच स्त्रिया थोड्याफार फरकानें हेच उद्गार काढतात. कुशवंशांत जन्म घेतलेली विश्वामित्राची भगिनी, ऋचिक-पत्नी **सत्यवती** याच भावनेनें पतिबरोबर सती गेली. देवी सीतेनें याचसाठीं प्रभु-रामचंद्रांबरोबर वनवास पत्करला. सतीत्व, शुचित्व, पतिपरायणता हा भारतीय स्त्रीचा सहज-स्वभाव हेंच येथें वारंवार प्रत्ययाला येतें.

* * *

**वडील** माणसांबद्दल आदरबुद्धि, विनय, आज्ञाधारकता हा भारतीय स्त्रीचा दुसरा विशेष. पातिव्रत्याइतकीच उत्कट पितृभक्तीहि तिच्यांत आढळते. केवळ स्त्रीच नव्हे तर पुरुषहि आज्ञा-पालन हें कर्तव्य समजत. प्रभु रामांनीं वनवास पत्करला तो पित्याचें वचन खरें करण्यासाठींच. याच कालांतील कुशनाभाचीं हीं कन्या-रत्नें पहा. स्वरूपसुंदर अशा या शंभर कन्यका पहातांच वायु काममोहित झाला व त्यानें त्यांचा अनुनय आरंभला. तो म्हणतो,

"मी तुमच्यावर अनुरक्त झालों आहे, माझ्या भार्या बना. मनुष्यत्व टाकून दीर्घायुषी व्हा. मानवांचें तारुण्य विशेषच विनाशी असतें हें जाणून मला अनुकूल व्हा. माझ्या कृपेनें अक्षय्य यौवनाची प्राप्ती करून घेऊन अमर व्हा."

पण त्याच्या या विविध प्रलोभनांना बळी न पडतां या कन्यका उत्तर देतात,

**पिता तु प्रभुरस्माकं दैवतं परमं च नः ।**
**यस्य नो दास्यति पिता स नो भर्ता भविष्यति ॥**

"पिता हाच कन्येचा परमेश्वर ! तो ज्याला देईल तोच आमचा पति होईल." स्वतः शंकराला वरणारी पार्वतीसुद्धां '**वपुषः पितरावेते**' असें सांगते तें यामुळेंच ! या उत्तरानें संतापलेल्या वायुनें त्यांना गलितगात्र बनविलें. त्यामुळें चिडलेल्या

या कन्यकांना कुशनाभ सांगतो,

"**अलंकारोहि नारीणां क्षमा तु पुरुषस्य वा**" क्षमा हाच स्त्री-पुरुषांचा खरा अलंकार. ही क्षमाशीलता, सहनशीलता हा भारतीय स्त्रीचा तिसरा विशेष. याच गुणांमुळें या कन्यका वायूला शाप देत नाहींत. कुशध्वजाची कन्या **वेदवती** अग्नींत प्रविष्ट होते पण शापवाणी उच्चारीत नाहीं. मात्र रावणाचा अक्षम्य अपराध जाणून त्याच्या नाशाची प्रतिज्ञा करते व सीता – जन्मांत ती पूर्णतेलाहि नेते.

पत्नी म्हणून पतीचें हित जसें आर्य स्त्री पाहील, तसेंच कुल–स्वामिनी, कुटुंबिनी, गृहिणी म्हणून घराचें, कुटुंबाचें, ज्ञातीचेंहि हित पाहील. त्याच्या परंपरेचें इभ्रतीचें, कीर्तीचें रक्षण व्हावें म्हणून डोळ्यांत तेल घालून जपत राहील. वालि–पत्नी **तारा** पतीला सांगते,

" हा तुमचा धाकटा भाऊ याचें पालन करणें हें तुमचें कर्तव्य आहे. त्याच्याशीं वैर धरूं नका. बंधुप्रेमाचा अवलम्ब करा " इतकेंच सांगून ती थांबत नाहीं. सुग्रीवाचे गुण वर्णून ती बजावते,

**नहि तेन समं बंधु भुवि पश्यामि कश्चन ।**
**वैरमेतत्समुत्सृज्य तव पार्श्वे स तिष्ठतु**... ॥

" त्याच्यासारखा बंधु मी त्रिभुवनांत पाहिला नाहीं. हें वैर सोडून दिलेंत तर तो तुमच्या पाठीशीं उभा राहील. " कुटुंबाच्या कल्याणासाठीं कुलांगना अशाच झटतात. भावाभावांमधील झगडे मिटवूं पहातात. चुकणाऱ्या पतीला मार्गावर आणण्याचा प्रयत्न करीत असतात.

राक्षस स्त्रियांतहि रावणाला सीतेच्या अभिलाषेपासून परावृत्त करूं पाहणारी **मंदोदरी**; इंद्रजीताचें यज्ञस्थान वानरांना दाखविणारी, सीतेच्या सुटकेचा पतीनें केलेला प्रयत्न तिच्या कानीं घालूं पाहणारी बिभीषणाची पत्नी **सरमा**; या कामीं तिला साह्य करणारी तिची कन्या **कला**; सीतेचा छळ करणाऱ्या राक्षसींचें निवारण करणारी **त्रिजटा**–अशीं अनेक उदाहरणें आढळतात. दुष्कर्माला शासन घडविण्याची, विरोध करण्याची, सत्कर्माला साह्य करण्याचीच प्रवृत्ति याच्या मुळाशीं आहे. पतीचें, ज्ञातीचें, कुटुंबाचें हित साधण्याचेच हे प्रयत्न आहेत. यथाशक्ति हेंहि कार्य आर्य-स्त्रिया करीत असत.

नों. नं. १५३५६ ८२५४



## तेजस्वी शकुन्तला

पति हेंच स्त्रीचें दैवत, पतिपरायणता हाच स्त्रीचा धर्म हें खरें असलें तरी पतीनें केलेला कोणताहि अन्याय पत्नीनें विनातक्रार सहन करावा, असा मात्र याचा अर्थ नाहीं. हवा तो अपमान गिळून कोणत्याहि अन्यायापुढें मान वांकवून राहण्याइतकें भारतीय स्त्रीचें पातिव्रत्य नेभळें नि दुबळें नाहीं. अन्यायाला प्रतिकार, अपराधाला शासन, चुकीला मार्गदर्शन–प्रत्यक्ष पतीलाहि–करून त्याला मार्गावर नि ताळ्यावर आणणें हेंच सतीचें खरें कर्तव्य! 'भर्तृ नाम परं नार्याः शोभनं भूषणादपि' पति हाच स्त्रीचा सर्वश्रेष्ठ अलंकार! म्हणूनच तो निर्दोष, निष्कलंक, तेजस्वी असावा अशी तिची उत्कट इच्छा असते. त्याचसाठीं डोळ्यांत तेल घालून तिनें सतत जागरुक राहिलें पाहिजे. कण्वमुनींची धर्मकन्या तेजस्विनि शकुंतला हिचें चरित्रापासून हाच अर्थ प्रतीत होतो.

* * *

'महाभारतां'तील शकुंतलेपेक्षां 'कालिदासा'ची शकुंतलाच आपल्याला अधिक परिचित आहे. पण त्यामुळेंच भारतीय शकुंतलेची खरी ओळख आपल्याला नाहीं. एक अव्याजमनोहर निसर्ग–कन्या हें तिचें स्वरूप कालिदासानें उत्कृष्टपणें रंगविलें असलें तरी एक तेजस्वी आर्यललना हें तिचें दुसरें स्वरूप लुप्त होऊन स्वतःवर होणारा अक्षम्य अन्याय मुकाट सहन करणाऱ्या दुबळ्या अभागिनींत तिचें रुपांतर झालें आहे. म्हणून तिचें खरें स्वरूप पाहूं इच्छिणारांना महाभारताकडेच वळावें लागेल.

ती वाचकांसमोर येते ती आश्रमांत आलेल्या राजाचें स्वागत करण्यासाठीं. कण्वमुनि फळें–मुळें आणण्यासाठीं बाहेर गेले असल्यानें ती आश्रमांत एकटीच आहे. अर्थात् अतिथि सत्काराची जबाबदारी तिच्यावरच आहे. तिला पाह-

तांच, 'तूं कोण?' असें राजा विचारतो. 'मी कण्वमुनींची कन्या!' या तिच्या उत्तरावर 'कण्वमुनी ब्रह्मचारी आहेत, तूं त्यांची कन्या कशी?' असें आश्चर्य त्यानें दर्शवितांच मोकळ्या मनानें ती त्याला आपला जन्मवृत्तांतहि सांगून टाकते. अशी ही साधी भोळी, धीट, निष्कपटी वनकन्या राजाला मोह घालते,

**भार्या मे भव सुश्रोणि ।**
**गांधर्वेणच भीरु मां विवाहेनैहि सुंदरी ।**

( आदि अध्याय ७३ श्लोक ४ )

'गांधर्व विवाहानें तूं माझी पत्नी हो' असें तो सांगतो. त्यावर,

**फलाहारेगतो राजन् पिता मे इत आश्रमात् ।**
**मुहूर्तं संप्रतीक्षस्व स मां तुभ्यं प्रदास्यति ॥**

( आदि. अ. ७३ श्लोक ५ )

"फळें आणण्यासाठीं गेलेले माझे वडील लवकरच परत येतील आणि तेच मला तुमच्या स्वाधीन करतील." असें उत्तर तिनें दिलें आहे.

पण राजाच्या उतावीळ मनाला हें कुठून मानवणार?

**त्वदर्थं मां स्थितां विद्धि त्वद्गतंहि मनो मम ॥६॥**
**आत्मेघात्मनो दानं कर्तुमर्हसि धर्मतः ॥७॥**
**सा त्वं मम सकामस्य सकामा वरवर्णिनी ।**
**गांधर्वेण विवाहेन भार्या भवितुमर्हसि ॥ १४ ॥**

( आदि. अध्याय ७३ )

"तुझ्यावर माझें चित्त जडलें आहे, तुझ्यासाठींच मी थांबलों आहे. आणि धर्मतःच आत्मदान करण्याचा तुलाहि अधिकार आहे. मग उगीच वेळ कशाला? माझ्यावर तुझें प्रेम असेल तर गांधर्वविधीनें विवाहबद्ध होणेंच तुलाहि योग्य आहे" अशा विविध गोष्टी सांगून त्यानें तिचा अनुनय आरंभिला.

अखेर ती कबूल झाली. 'मला जो पुत्र होईल तोच तुमच्यानंतर गादीवर बसावा,' ही तिची अटहि त्यानें कबूल केली.

'जग्राह विधिवत्पाणावुवास च तया सह!' मगच तिचें पाणि-

ग्रहण केल्यानंतर तिच्या सहवासाचें सुख त्याला अनुभवितां आलें.

**प्रेषयिष्ये तवार्थाहं वाहिनीं चतुरंगिणीम्।**
**तथा त्वाऽऽनयिष्यामि निवेशं स्वं शुचिस्मिते ॥ २१ ॥**
(आदि. अ. ७३)

तिचा विश्वास बसावा म्हणून "तुला आणण्यासाठीं मी चतुरंग-सेना पाठवीन." असें आश्वासन देऊन राजा निघून जातो.

* * *

**कण्वमुनि** परत येतात. पण लज्जित नि भयशंकित झालेली शकुंतला पुढें येत नाहीं. अंतर्ज्ञानानें सारें जाणून घेतलेला तो प्रेमळ पिता सांगतो, "तूं दुष्यंताशीं विवाह केलास हें मी जाणतो, पण बाळे "धर्मदृष्टयाहि हा अपराध नव्हे." हें ऐकतांच ती पुढें येते, व

**पतिवृतो मया राजा दुष्यंत पुरुषोत्तमः।**
**तस्मै ससचिवाय त्वं प्रसादं कर्तुमर्हसि ॥ ३२॥**
(आदि. अध्याय ७३)

"मी वरलेल्या माझ्या पतींवर–राजा दुष्यंतावर–आपली कृपा असावी." असा आशीर्वाद मागते.

* * *

**शकुंतला** राजसेनेचीं वाट पहात असते. पण वर्षामागून वर्षे जातात; तिचा पुत्र मोठा होऊन अवखळपणानें आश्रमवासीयांना त्रास देऊं लागतो. तरीहि राजाचें निमंत्रण येत नाहीं. अखेर कण्व मुनि शिष्यांना सांगतात,

**नारीणां चिरवासोहि बांधवेषु न रोचते।**
(आदि. अ. ७४ श्लोक १२)


"स्त्रियांनीं दीर्घकाल पितृगृहीं राहणें उचित नव्हे. शकुंतलेला तिच्या पुत्रासह पतिगृहीं पोंचवून या." आणि ते तिची पाठवणी करतात.

पण तिला पहातांच तिची ओळखच पटत नाहींसें दाखवून राजा विचारतो,

**कस्य त्वं दुष्ट तापसी ।**
**धर्म कामार्थसंबंधं न स्मरामि त्वयासह ॥**
(आदि. अ. ७४ श्लोक २० )

" कुणाची कोण तूं? तुझ्याशीं संबंध आल्याचें मला मुळींच आठवत नाहीं तुझी इच्छाच असेल तर राहिनास माझ्या अंतःपुरांत! " केवढी घोर वंचना ही!

**' दुष्यन्ता, तुला माझें स्मरण नाहीं काय ? '...**



**....तेजस्वी शकुंतला**

किती अक्षम्य अपमान! हा अनुभव शकुंतलेला सर्वस्वी नवा होता. क्षणभर ती स्तंभितच झाली. पण दुसऱ्याच क्षणीं,

**तपसासंभृतं तेजं धारयामास वै तदा ॥२३॥**
( आदि. अ. ७४ )

तपानें प्राप्त झालेलें सारें तेज एकवटून या अन्यायाच्या प्रतिकाराला ती सज्ज झाली. राजाची तिनें चांगलीच हजेरी घेतली. तिनें सांगितलेलें धर्मज्ञान, केलेला उपदेश खरोखरीच मुळांतूनच वाचला पाहिजे.

ती म्हणते, " **आपल्या या कृत्याला कुणीच साक्षी नाहीं असें समजूं नका. मानवाचें प्रत्येक कृत्य दिवस, रात्र, दोन्ही संध्या, चंद्र, सूर्य, पृथ्वी, जल, वायु, स्वर्ग, यम, वरूण आणि त्याच्या अंतर्यामी साक्षी असणारा त्याचा आत्मा इतके सर्वजण नित्य पाहत असतात. स्वतःला कुणीच फसवूं शकत नाहीं. तुमचा आत्माच तुम्हांला सत्यासत्याची ग्वाही देईल.**

" मी केवळ भार्या नव्हे, तुमच्या पुत्राला जन्म देणारी तुमची जाया आहे." यानंतर जाया, पुत्र, भार्या यांचें तिनें केलेलें वर्णन तिच्या तीव्र ज्ञानाचें द्योतक ठरेल.

**अर्धं भार्या मनुष्यस्य । भार्या श्रेष्ठतमः सखा ।**
**भार्या मूलं त्रिवर्गस्य । भार्या मूलं तरिष्यतः** ॥ ४१ ॥

( आदि. अ. ७४ )

असें सांगून पुत्रासह स्वतःचा स्वीकार करण्याची ती राजाला विनंति करते.

मात्र इतका शांतपणा धरून धर्माचें विवेचन करणारी ही धर्मज्ञा इतकेंच म्हणून थांबलेली नाहीं. तिच्या सात्त्विक संतापाचा तीव्र स्फोट,

**यदि मे याचमानाया: वचनं न करिष्यसि ।**
**दुष्यंत शतधा मूर्धा ततस्तेद्य स्फुटिष्यति** ॥ ३६ ॥

( आदि. अ. ७४. )

या शापवाणींत झाला आहे. " माझ्या सांगण्याप्रमाणें नच करशील तर तुझें मस्तक शतधा विदीर्ण होईल." असें म्हणण्यापर्यंत तिची मजल जाते. स्त्रीत्वाचा, सतीत्वाचा अपमान आर्य स्त्री कधींच सहन करणार नाहीं. तिच्या या तेजस्वितेमुळें दुष्यंतालाहि नमावें लागलें आहे. तिचें चरित्र वाचणारांचें मस्तकहि तिच्यासमोर नेहमींच आदरानें नम्र होत जाईल.

## : १ : : महाभारतांतील स्त्रिया :

### कर्तव्यकठोर गांधारी

**स्वतः**च्या आचरणांतून सतित्वाचा सहजसुंदर आविष्कार करणाऱ्या कुरुकुलभूषा **गांधारी**चें स्वभावचित्र आतां आपण पाहणार आहोंत. गांधार देशचा राजा **सुबल** याची ही कन्या म्हणून हिला **सौबली** असेंहि म्हणतात. 'हिला शंभर पुत्र होतील,' असा व्यासांचा आशीर्वाद होता, म्हणून कुरुकुलाच्या वृद्धीसाठीं पितामह भीष्मांनीं राजा धृतराष्ट्रासाठीं हिला मागणी घातली. राजा अंध असला तरी कुरुकुलाच्या कीर्तीकडे पाहून सुबलानें ही मागणी मान्य केली. ज्याच्याशीं आपला विवाह ठरला आहे तो अंध आहे असें गांधारीनें ऐकलें मात्र,

> **गांधारीत्वथ शुश्राव धृतराष्ट्रमचक्षुषम् ।**
> **आत्मानं दित्सितं चास्मै पित्रा मात्रा च भारत ॥१३॥**
> **ततः सा पट्टमादाय कृत्वा बहुगुणं तदा ।**
> **बबंध नेत्रे स्वे राजन् पतिव्रत-परायणा ॥ १४ ॥**
> (आदि. अ. ११० )

**कापडाचा एक तुकडा घेऊन त्याला घड्या घालून त्या जाड पट्ट्यानें तिनें स्वतःचे डोळे बांधून घेतले. एकदां बांधलेला हा पट्टा तिनें जन्मभर डोळ्यावरून दूर केला नाहीं. जें दृष्टिसुख माझ्या पतीला अनुभवतां येत नाहीं, तें मीहि अनुभवणार नाहीं, हाच तिचा निर्धार होता.** ध्येयाची अशी पराकाष्ठा भारतीय संस्कृतींतच फक्त सांपडूं शकते.

पावित्र्याच्या दीप्तीनें झळकणारा हा पहिलाच पदन्यास टाकून नववधू म्हणून कुरुकुलांत प्रवेश केलेल्या गांधारीनें ह्यानंतर अल्पावकाशांतच आपल्या आदर्श आचरणानें साऱ्यांचें चित्त आकृष्ट करून घेतलें.

यानंतर पांडूचे विवाह झाले. कुन्ती व माद्री यांच्यासह तो वनांत गेला व कांहीं कालानंतर कुंतीला पुत्र झाल्याची वार्ता तिनें ऐकली. यावेळीं ती गरोदर होती. पण दोन वर्षांचा काल जाऊनहि तिला अजून अपत्यलाभ झाला नव्हता. यामुळें तिला परम–विषाद वाटला. मातृत्वाच्या प्राप्तीसाठीं अधीर होऊन कुणालाहि न कळवितां तिनें आपल्या उदरावर प्रहार करून घेतला. याचा परिणाम भलताच झालेला पाहून मात्र ती भयभीत झाली व व्यासांना शरण गेली.

**ज्येष्ठं कुंतिसुतं जातं श्रुत्वा रविसमप्रभम् ॥१५॥**
**दुःखेन परमेणैव उदरं घातितं मया ॥१६॥**
( आदि. अ. ११४ )

अशी आपल्या अपराधाची कबुली देऊन "शंभर पुत्राची प्राप्ती होईल असा आपण दिलेला आशिर्वाद खरा करा." म्हणून तिनें त्यांची प्रार्थना केली. तिची यावेळची मनःस्थिति जाणून व्यासांनीं त्या मांसपेशीचे १०१ तुकडे घृतपूर्ण कुंभांत नीट जतन करून ठेवले. त्यापासून क्रमाक्रमानें दुर्योधनादि शंभर पुत्र व दुःशला नांवाची कन्या जन्माला आली. पुत्रप्राप्तीची गांधारीची इच्छा पुरी झाली. पण शतपुत्रा होतांच तिला धन्यता वाटली असेल कां ?

छेः ! तें भाग्य तिच्या भाळीं नव्हतें. दुर्योधन जन्मला तेव्हांच झालेलीं दुश्चिन्हें इतकीं भयंकर होतीं कीं, या कुलघ्न पुत्राचा त्याग करण्याचाच सल्ला सर्व्यांनीं राजाला दिला होता आणि वाढत्या वयांतले या बाळाचे एकेक चाळे पाहिल्यानंतर कुणालाहि उद्वेगच वाटणें साहजिक होतें. शंभरांतील एकहि पुत्र सुलक्षणी असूं नये, ही किती दुर्दैवाची गोष्ट आहे. पण हेंच दुर्भाग्य तिच्या वांट्याला आलें होतें.

*　　*　　*

**धृतराष्ट्र** आंधळा, आणि गांधारीनें डोळ्यांवर पट्टा बांधून डोळे असून आंधळेपणा पत्करलेला. यामुळेंच या मुलांना पुरतें फावलें असावें असें आपल्याला वाटतें. पतिपरायणतेच्या नादानें मातृकर्तव्याकडे गांधारीनें डोळेझाक केल्याचा अनेकांचा आरोप असतो. पण हें खरें नाहीं. निदान महाभारतांत तरी याला आधार नाहीं. डोळे बांधलेले असले तरी मुलांकडे तिनें कधींच डोळेझाक केली

नव्हती. त्यांच्या वर्तनावर तिचें पूर्ण लक्ष होतें. वेळोवेळीं दुर्योधनाचें निवारण करून त्याला मार्गावर आणण्याचा प्रयत्नहि तिनें केला होता. पण राजाचा पुत्रस्नेहच मातृशिक्षेहून प्रबळ ठरे आणि दुष्ट शकुनि मामाच्या शिकवणुकीनें त्यावर बोळाच फिरविला जाई. या गोष्टीला तिचा नाइलाज होता. तिच्या कर्तव्याला ती चुकली नव्हती. त्यांत तिनें काडीचीहि कसूर केली नव्हती. त्याचा उपयोग होणें वा न होणें ही कांहीं तिच्या हातची गोष्ट नव्हती.

"यतो धर्मस्ततो जयः"



कर्तव्यकठोर गांधारी

असें असूनहि मुलांवर तिचें चांगलेंच वजन होतें. त्यांना तिचा विलक्षण धाक व दरारा वाटत असावा. तिच्या शब्दाबाहेर सहजीं जाण्याचें सामर्थ्य दुर्योधनांतहि नव्हतें. तीच एकटी त्याला शासन करूं शके.

कृष्णशिष्टाईच्या वेळीं कुणाचीहि पर्वा न करतां उद्दामपणें सभेंतून निघून जाणाऱ्या दुर्योधनाला अडविण्याचें कार्य भीष्म, विदुर, धृतराष्ट्र – कुणालाहि साधलें नाहीं. तेव्हां,

**गच्छ तात महाप्राज्ञां गांधारीं दीर्घदर्शिनीम्**

( उद्योग. अ. १२८ श्लोक २ )

"जा ! महाबुद्धिमती व दूरदर्शी गांधारीकडे जाऊन तिलाच या सभेंत घेऊन ये. तीच फक्त याला ताळ्यावर आणूं शकेल," असें सांगून धृतराष्ट्रानें विदुराकडून तिला बोलावून आणलें. जिथें भीष्मादिकहि थकले तिथें गांधारीच मार्ग काढील असा धृतराष्ट्राचा विश्वास होता. म्हणूनच उन्मत्त दुर्योधनाला बोध करण्याची कामगिरी त्यानें तिच्यावर सोंपवली आणि आश्चर्य हें कीं, 'मला कुणाचीच पर्वा नाहीं,' म्हणून सभेंतून निघून गेलेला दुर्योधनहि तिचें भाषण ऐकण्यासाठीं आपल्या जागेवर येऊन बसला.

यावेळीं सभेंत येतांच प्रथम गांधारीनें सर्वांसमक्ष पुत्राचे भलते लाड करणाऱ्या राजा धृतराष्ट्रालाच दोष दिला आहे.

**त्वमेवात्र भृशं गर्ह्यः धृतराष्ट्र सुताप्रियः ॥**
**कथं हि स्वजने द्रोहो उपेक्षेत महीपतिः ॥१३॥**

"या गोष्टीला कारण झालेल्या तुमच्या पुत्रस्नेहालाच यांत अधिक दोष दिला पाहिजे. कुलांत उद्भवलेल्या दुफळीकडे आजवर इतकें दुर्लक्ष कसें होऊं दिलेंत !" असेंच तिनें विचारलें आहे. यानंतर 'धर्माचा लोप करणाऱ्या असभ्यांकडून राज्य चालविलें जाणें शक्य नाहीं; पांडवांना त्यांची न्याय्य वांटणी देऊन टाक' असें स्पष्ट मत देऊन ती दुर्योधनाला पुष्कळ हितोपदेश करते. पुत्राचा भलता अभिमान न धरतां, त्याच्या मोहांत न सांपडतां स्पष्टपणें त्याचे दोष त्याला दाखवून, पांडवांची बाजू न्याय्य म्हणून त्यांचा द्वेष न करतां ती उचलूनहि धरते. गांधारीचा हा निःपक्षपाती न्याय ध्यानांत ठेवण्याजोगा आहे.

वारंवार निवारण करूनहि दुर्योधन युद्धालाच प्रवृत्त झाला. पण "**जयमाचक्ष्व मे मातर्युध्यमानस्य शत्रुभिः**" युद्ध करणाऱ्या मला शत्रूंवर विजय मिळो असा आशिर्वाद दे असें म्हणून नित्य वंदन करणाऱ्या दुर्योधनाला "**यतो धर्मस्ततो जयः**" जिकडे धर्म तिकडेच जय असें उत्तर तिनें प्रत्येक वेळीं दिलें आहे. **सत्पक्षाचा विजय व्हावा म्हणून पुत्रनाशालाहि सिद्ध असणाऱ्या गांधारीचें**

**चारित्र्य कर्तव्यकठोर आहे हेंच खरें.** कर्तव्यापुढें दुसऱ्या कसल्याहि भावनेची कदर तिनें कधींच केलेली नाहीं.

**दुर्योधनाच्या** मृत्यूनंतर शंभर पुत्रांच्या निधनानें तिला झालेला शोक अति दारुण आहे. पुत्रघातकी म्हणून कांहीं काल तिला पांडवांचा तीव्र संताप येणें साहजिक होतें पण त्या घटनेंत पांडवांचा अपराध नाहीं, स्वतःच्याच दुष्कृत्यांनीं आपले पुत्र मरण पावले आहेत, ही जाणीव होतांच आपला सारा संताप ती आवरते. मात्र तिचें मन विलक्षण शोकाकुल होतें. अशा स्थितींतच द्रौपदीचें सांत्वन करण्याचें कर्तव्य ती बजावतें तेव्हां तिजबद्दल अधिकच आदर वाटतो.

कर्तव्य-कठोरतेची ही उग्र मूर्ति यानंतर धृतराष्ट्रासह वनांत जाते व तेथेंच वणव्यांत सांपडून दग्ध होते.

: १० : : महाभारतांतील स्त्रिया :

## कारुण्यमूर्ति कुंतिमाता

"**आमच्यावर** नेहमीं संकटेंच ओढवूं देत" (विपदः सन्तु नः शश्वत्) असा कृष्णाजवळ वर मागणाऱ्या **कुंतीचें** आरंभापासून अखेरपर्यंतचें सारें जीवन दुःखमयच आहे.

**वसुदेवा**ची ही बहिण, राजा **शूरसेना**ची कन्या. पण निपुत्रिक कुंतिभोजाला मित्रप्रेमामुळें पाळण्यासाठीं म्हणून ही कन्या त्यानें लहानपणींच देऊन टाकली होती. जन्मतःच हा त्याग झाला असता तर त्याचा कसलाहि परिणाम कुंतीच्या मनावर झाला नसता. पण आपपरभाव समजण्याइतकी समजूत आल्यानंतर कुंतीचा त्याग शूरसेनानें केल्यामुळें तो तिला चांगलाच जाणवला इतकेंच नव्हे तर एखादी वस्तु देऊन टाकावी इतक्या सहजतेनें पित्यानें आपल्याला मित्राच्या स्वाधीन करावें यांत तिच्या स्वाभिमानी वृत्तीला विलक्षण अपमानहि वाटला.

आपल्या दत्तक पित्याच्या गृहीं ब्राह्मणांच्या व अतिथींच्या पूजनाची कामगिरी तिच्याकडे देण्यांत आली होती. एकदां महाकोपिष्ट म्हणून प्रसिद्ध असणारे **दुर्वास** राजाकडे आले. अत्यंत काळजीपूर्वक व दक्षतेनें सेवा करुन कुंतीनें परोपरीनें त्यांचें मन राखण्याचा प्रयत्न केला. त्यामुळें संतुष्ट झालेल्या दुर्वासांनीं तिला **अभिचार मंत्र** शिकविला व पुढील भविष्य जाणून "ह्या मंत्राचा जप करून ज्या देवाला तूं बोलावशील तो येऊन तुला पुत्रप्राप्ती करून देईल," असें सांगून ते निघून गेले. कुंतीची अपरिपक्व बुद्धि बाल-सुलभ जिज्ञासेनें या मंत्राचा कुतुहलपूर्वक उपयोग करील हा संभवहि त्यांच्या ध्यानीं आला नाहीं.

मंत्राचा परिणाम काय होईल याची नीटशी कल्पना नसल्यानें अस्ताला जाणाऱ्या सूर्यबिंबाकडे पाहतां पाहतां कुंतीनें तो मंत्र म्हणून पाहिला. मात्र प्रत्यक्ष सूर्य येऊन समोर उभा राहतांच त्याचा प्रश्न ऐकून तिची धांदल उडाली. 'पाहूं तर

खरें काय होतें तें !' असल्या बालिश कुतूहलानें घडलेल्या अपराधाचें खरें स्वरुप समजतांच ती विलक्षण गोंधळली. "जसा आलास तसा कृपा करून परत जा" म्हणून ती प्रार्थना करूं लागली. पण सूर्य ऐकेना. **अमोघं दर्शनं मह्यम्** "माझें दर्शन फुकट जाणार नाहीं." असें सांगून त्यानें परोपरीनें तिची समजूत घातली. "माझ्या प्रभावानें पुत्रप्राप्तीनंतर तुझें कौमार्य तुला पुन्हां प्राप्त होईल." असें आश्वासन दिलें. हतबुद्ध होऊन कुंतीनें मान्यता दिली आणि सूर्यापासून तिला कर्णाची प्राप्ती झाली. कौमार्यावस्थेंत झालेला तो पुत्र पाहतांच स्वतःवर होणारे प्रहार जाणून लोकापवादाच्या भीतीनें कुंतीनें त्याला नदीच्या वाहत्या प्रवाहांत सोडून दिलें.

कुंतीच्या चरित्रांतील हाच पहिला आक्षेपकारक प्रसंग, पण स्वतः कुंतीलाच या अपराधाची जाणीव आहे. जन्मतः त्याग करून कर्णावर आपण मोठाच अन्याय केला असल्याचें शल्य अखेरपर्यंत तिच्या हृदयाला सलत असलेलें दिसतें. भारतीय युद्धापूर्वी कृष्णाकडून कर्णाला तिनें त्याचा जन्मवृत्तांत कळविला होता. कर्णाच्या मृत्यूनंतर पांडवांनाहि,

**सहि वः पूर्वजो भ्राता भास्करान्मय्यजायत।**
**कुरुध्वमुदकस्तस्य भ्रातुराक्लिष्ट कर्मणा।**

'सूर्यापासून माझ्या उदरीं जन्मलेला तो तुमचा मोठा भाऊ असल्यानें भावाप्रमाणें त्याची उत्तरक्रिया करा' असेंहि ती सांगते. त्याच्या नावानें पुष्कळ दानधर्म करते, पण कशानेंहि तिचें समाधान होत नाहीं. 'मम दोषोऽयं अत्यर्थः' अशी स्पष्ट कबुली तिनें दिली आहे. पुत्रांना प्राप्त झालेल्या राज्यवैभवाचा राजमाता म्हणून उपभोग घेण्याचें सोडून पापक्षालनार्थ अखेर तिनें धृतराष्ट्र आणि गांधारी यांच्याबरोबर वनवास पत्करला आहे.

या वनवासांतच धृतराष्ट्र आणि गांधारी यांच्या समक्ष महर्षी व्यासांना कर्णजन्माचा वृत्तान्त सांगून मनाची सारी तळमळ ती व्यक्त करते. हा सर्व वृत्तान्त ऐकल्यानंतर "**संकल्पाप्रमाणें देह धारण करणारे देव अशरीर असतात. त्यांच्याशीं कोणत्याहि तऱ्हेनें संबंध घडला तरीहि धर्मदृष्ट्यासुद्धां मनुष्यधर्म दूषित होत नाहीं.** शिवाय कर्णाचा जन्म झाल्यानंतर तुला तुझें कौमार्य परत मिळालें होतें. तेव्हां याबाबतींत तूं पूर्ण निर्दोष आहेस," असें सांगून

व्यासांनीं तिचें समाधान केलें आहे व तिच्यावरील आक्षेपाचेंहि निरसन केलें आहे.

*  *  *

यानंतर तिचा पंडूशीं विवाह झाला. माद्रीसारखी सवत तिला मिळाली. पण कुंतीनें कधींहि तिचा मत्सर केला नाहीं, कीं तिजबद्दल कधीं दुजाभावहि धरला नाहीं. दोघीहि सख्यत्वानेंच वागल्या. राजाबरोबर दोघीहि वनांत गेल्या. ऋषींच्या शापानें प्रजोत्पादनाला असमर्थ ठरलेल्या पंडुराजानें "निपुत्रिकाला सद्गति नाहीं" असें ऐकून नियोगानें पुत्रप्राप्ती करून घेण्याबद्दल कुंतीला आग्रह चालविला. यावेळचें कुंतीचें भाषण तिच्या उच्च मनोवृत्तीचेंच दर्शक ठरेल. पण या बुद्धिवादाचा कसलाहि उपयोग न होतां राजाचेंच सांगणें तिला ऐकावें लागलें. यावेळींहि कुणा मानवापेक्षां देवाचीच संगति बरी या विचारानें अभिचारमंत्राच्या प्राप्तीची हकीगत सांगून " आवाहयामि कं देवं " कोणत्या देवाला मी मंत्रपूर्वक पाचारण करूं ? " असें ती विचारते व त्याच्याच इच्छेवरून यम, वायु व इंद्र यांच्याकडून क्रमानें पुत्रप्राप्ती करून घेते. प्रतिकूल परिस्थितीनें कुंतीचा केलेला हा पाडाव किती कारुण्यपूर्ण आहे. स्वतःच्या उच्च कल्पना कर्तव्य म्हणून तिला वेळोवेळीं दूर साराव्या लागल्या आहेत.

आपल्या मंत्र-सामर्थ्याचा उपयोग करून माद्रीची पुत्रप्राप्तीची इच्छा पुरविण्यांत किंवा तिच्या सहगमनानंतर तिच्या पुत्रांचें स्वतःच्या पुत्रांइतक्याच मायेनें आणि वात्सल्यानें पालन करण्यांत तिनें दाखविलेलें औदार्य तिच्या विशाल अंत:करणाचीच साक्ष पटवितें. स्वतः माद्रीनेंच या बाबतींत तिचें श्रेष्ठत्व कबूल केलें आहे.

तिच्या मनाचें हेंच औदार्य बकासुरवधाच्या वेळींहि प्रगट झालें आहे. ब्राह्मणानें केलेल्या उपकारांची फेड करण्यासाठीं व एकचक्रा नगरीच्या मुक्ततेसाठीं ती भीमाला बकासुराकडे पाठविते- **ब्राह्मणार्थे महत्कृत्यं मोक्षाय नगरस्य च !** असें ती युधिष्ठिराला सांगते. पुत्राच्या सामर्थ्याची यथार्थ कल्पना व त्याच्या पराक्रमाबद्दल तिला वाटणारा विश्वासयुक्त अभिमानच तिच्या या भाषणांत पूर्णतेनें प्रगट झालेला आहे.

*  *  *

सर्वांशीं सख्य, विनीत प्रेमळ वृत्ति, संकटग्रस्तांबद्दल सहानुभूति, हे तिच्या व्यक्तित्वाचे ठळक विशेष आहेत. कौरवांच्या कुटिल कारस्थानांपासून बाल

पांडवांचें रक्षण करतांना तिला अत्यंत जागरूक राहावें लागलें. कुणालाहि न दुखवितां त्यांचें रक्षण करण्यांत तिचें चातुर्य, सावधता व बुद्धिकौशल्य चांगलेंच कसाला लागलें आहे. पांडवांच्या वनवासामुळें विदुराकडे राहावें लागलें तेव्हां ही पराधीनता तिला खूपच बोंचली आहे.' पराश्रया वासुदेव या जीवति धिगस्तु माम् !' किंवा " जीवितं किं फलं मम " या तिनें कृष्णाजवळ काढलेल्या उद्गारांवरून तिला याबद्दल वाटणारा उद्वेग स्पष्ट दिसतो.

स्वतःचें वैधव्य, राज्यहरण, द्यूतांतील पराभव किंवा पांडवांचा वनवास या साऱ्या गोष्टींपेक्षां भरसभेंत द्रौपदीची झालेली विटंबनाच तिला अधिक दुःखद वाटते, दुःसह होते. हा अपमान आपल्या पुत्रांनीं सहन करूं नये असें तिला वाटतें. अज्ञात-वास संपवलेल्या आपल्या पुत्रांना **यदर्थं क्षत्रिया सूते कालोऽयमागतः ।** " ज्यासाठीं तुम्हांला जन्म दिला तें कार्य करण्याचा काल आतां प्राप्त झाला आहे. " असें सांगून विदुला मातेचें चरित्र ती कृष्णाबरोबर सांगून पाठविते.

दुष्टांना शासन करून, अपमान धुवून काढून आपले पुत्र राज्यारूढ झालेले पाहूनच तिला संतोष होतो. मात्र या ऐश्वर्यांत राजमाता म्हणून मिरविण्याची इच्छा तिला होत नाहीं. त्यापेक्षां,

**श्वश्रूश्वशुरयोः पादान्शुश्रुषंती वनेत्वहम् ।**
**गांधारीसहितं वत्स्ये तापसी मलपंकिनी ॥ १६ ॥**

(आश्रमवासिक० अ. १६)

"ज्येष्ठत्वामुळें सासुसासऱ्यांच्या स्थानीं असलेल्या धृतराष्ट्र–गांधारींच्या सेवेसाठीं त्यांच्याबरोबर वनांत जाणें " तिला अधिक मानवतें. या वनवासांतच तिचा वणव्यांत सांपडून अंत होतो.

**उदार मनाच्या, उच्च विचाराच्या, श्रेष्ठ बुद्धीच्या या गुणवतीचें हें कारुण्यपूर्ण जीवन मनाला चटका लावणारें आहे. मातृवात्सल्याची मृदुता हाच तिच्या स्वभावाचा स्थायीभाव आहे. प्रतिकूल परिस्थितीनें लादलेल्या कर्तव्यांमुळें तिच्या सतित्वांत कुणाला उणेपणा आढळलाच तरी श्रेष्ठ मातांमध्यें मात्र तिचें स्थान श्रेष्ठतमच गणलें जाईल.**

ग्रंथ संग्रहालय
सं. नं. ५५३
स्थळ प्रत

# : ११ : : महाभारतांतील स्त्रिया :

## वीरपत्नी पांचाली

युधिष्ठिराच्या धर्मभीरुतेला बळी पडलेली द्रौपदी सीतेप्रमाणेंच अयोनिजा आहे. द्रुपदाच्या यज्ञप्रसंगीं ती वेदीमधून निर्माण झाली म्हणून तिला **याज्ञसेनी** असेंहि म्हणतात. पंचाल देशची राजकन्या म्हणून **पांचाली**, द्रुपद कन्या म्हणून **द्रौपदी**, कृष्णाची आवडती म्हणून **कृष्णा**, अशा विविध नांवानीं ती आपल्याला परिचित आहे. भावांभावांमधील प्रेमाचा राम-लक्ष्मण किंवा राम-भरत हा आदर्श मानला जातो, त्याप्रमाणेंच कृष्ण-द्रौपदी हा बंधुभगिनींच्या प्रेमाचा महान् आदर्श समजतात. 'द्रौपदीस बंधु शोभे नारायण' या सुप्रसिद्ध स्त्रीगीतांत या प्रेमाचें उत्कृष्ट वर्णन आढळतें. '**दर्शनीयाऽनवद्यांगी सुकुमारी मनस्विनी**' असें भारतकारांनीं तिच्या रूपाचें वर्णन केलें आहे.

'पांच पांडवांची पत्नी म्हणे पतिव्रता' असा एक हेटाळणीचा सूर तिच्याबद्दल अनेकदां ऐकूं येतो. पण भारताच्या कांहीं प्रदेशांत आजहि बहुपतित्वाची चाल रूढ आहे. विवेकानंदांच्या चरित्रांत त्यांनीं अशा एका कुटुंबाचा पाहुणचार घेतल्याचा उल्लेख आहे. या चालीबद्दल त्यांनीं प्रकट केलेलें आश्चर्य व घेतलेली शंका या कुटुंबियांच्या रोषाला कारण झाली होती. केवळ स्वतःच्या आचार-कल्पनांवरून इतरांना अनीतिमान् ठरविणें अयोग्य ठरेल. शिवाय एक अपवादभूत उदाहरण म्हणूनच भारतकारांनीं हें चित्र रंगविलेलें आहे. आजन्मांत असत्य भाषण न केलेल्या कुंतीनें "आई, ही बघ भिक्षा आणली आहे" या चेष्टेला अजाणतां - "मग पांचांनीं मिळून तिचा उपभोग घ्या" हें दिलेलें उत्तर खरें करण्यासाठींच पांचहि पांडवांनीं तिच्याशीं विवाह करण्याचें ठरविलें. या गोष्टीला प्रतिकूल असणाऱ्या द्रुपदाचें पूर्वजन्मीचा वृत्तांत सांगून समाधान करण्यांत आलें. पूर्वजन्मीं पतिप्राप्तीसाठीं तप करून प्रसन्न केलेल्या शंकराजवळ "**पति**

दे " असा पांच वेळां वर मागितल्यानें 'तुला पांच पति मिळतील' असें त्यांनीं सांगितलें. तो वर या जन्मांत सफल होऊन द्रौपदी पांच पांडवांची पत्नी झाली.

* * *

स्त्री आणि सवतिमत्सर यांचें साहचर्य कुणी व केव्हां सिद्ध केलें असेल तें असो, पण रामायणांतील स्त्रियांप्रमाणेंच महाभारतांतील स्त्रियाहि या भावनेपासून सर्वस्वीं अलिप्त आहेत. द्रौपदीचेंच पहा ना ! विवाहानंतर प्रथमच सुभद्रा तिच्या भेटीला येते तेव्हां तिला प्रेमभरानें आलिंगन देऊन '**निःसपत्नोऽस्तु ते पतिः**' या आनंददायक वाक्यांनीं ती तिचें सहर्ष स्वागत नि अभिनंदन करतें. इतकेंच नव्हे तर पतीला जें प्रिय तेंच पत्नीलाहि प्रिय असलें पाहिजे म्हणून पांडवांची सेवा करण्यास ती सदा सज्ज आहे.

राजसूय यज्ञांत यजमानीण म्हणून जी मिरवली तिलाच 'तूं कौरवांची दासी झाली आहेस' हे उद्गार ऐकावे लागले. वाराहि जिला स्पर्शूं शकत नव्हता, तिला भरसभेंत ओढून आणून दुष्टांनीं तिची विटंबना आरंभली. सूर्यसुद्धां जिला पाहूं शकत नव्हता, ती दुष्टांच्या दृष्टिविषय झाली. पांडवांसारख्या पराक्रमी पतींसमोर हें सारें घडावें नि त्यांनीं तें सहन करावें या घटनेनें तिला अधिकच चीड आली. तिनें वेळोवेळीं काढलेले जळजळीत उद्गार याचे निदर्शक आहेत. सात्विक संतापानें बेभान होऊन तिनें साऱ्यांची चांगलीच हजेरी घेतली आहे. आणि '**जितां वाप्यजितां वाऽपि मन्यध्वं मां यथा नृपाः**' हाच प्रश्न तिनें साऱ्यांना टाकला आहे. या तिच्या प्रश्नाला कुणींहि उत्तर देऊं शकलें नाहीं. साऱ्या आप्तजनांत कुणीहि आपली सुटका करूं शकत नाहीं, हें पाहतांच अनन्यगतिक होऊन तिनें पाठिराख्या कृष्णसख्याला हृदयभेदक साद घातली. लाडक्या बहिणीच्या या हांकेसरशीं 'अहा धावला सखा बंधुराणा'; आणि या निर्वाणीच्या प्रसंगीं येऊन त्यानेंच तिची लाज राखली. तिच्या उत्कट भक्तीचें हें सामर्थ्य, तिचा सभाजनांना कुंठित करणारा बुद्धिवाद आणि गांधारीच्या पुत्रांचें निवारण करण्याची वारंवार मिळणारी सूचना या साऱ्यांचा परिणाम होऊन धृतराष्ट्र तिला गौरवून म्हणतो, " माझ्या सर्व सुनांत तूंच वैशिष्ट्यानें शोभणारी परम धार्मिक सति आहेस. तेव्हां तुला हवा तो वर मागून घे. "

दा. क्र. ७८४



पतिपरायणा साध्वी दुसरें काय मागणार ? " माझ्या पुत्रांना कुणी दासपुत्र म्हणून ओळखूं नये म्हणून माझे पति रथ व शस्त्रास्त्रांसहित दास्यमुक्त व्हावेत " अशी इच्छा ती प्रदर्शित करते व तिसरा वर मागण्याचें नाकारते, कारण क्षत्रीय स्त्रीला फक्त दोनच वर मागण्याचा अधिकार आहे. धर्माचें किती हें सूक्ष्म ज्ञान ! संतुष्ट होऊन धृतराष्ट्र सर्व पांडवांना दास्यमुक्त करतो.

वनवासांत असतांना आपल्या अपमानाची आठवण देऊन पतींची क्षात्रवृत्ति चेतविण्याचाच प्रयत्न ती वारंवार करते. पतीला कर्तव्यप्रवृत्त करणें हें पतिव्रतेचें कर्तव्यच आहे.

*　　　*　　　*

**प**ण या साऱ्यापेक्षांहि तिचें खरें दर्शन घडतें तें सत्यभामेच्या प्रश्नाला तिनें दिलेल्या उत्तरांतच. हें उत्तर म्हणजे सतित्वाचें सार होय. भामा विचारते– " द्रौपदी तूं पांडवांना कशाच्या जोरावर इतकें वश करून ठेवलें आहेस ? कोणते मंत्र-तंत्र, जपजाप्य वा कोणत्या औषधींचा यासाठीं उपयोग केलास ? " द्रौपदी उत्तरते– " भामे ! किती वेड्यासारखा प्रश्न केलास हा ! मंत्र–तंत्रांनीं कां कधीं पति वश होतात ? औषधींच्या उपयोगानें कां कुठें पतिप्रेम मिळवितां येते. हें पतिव्रतेचे मार्ग नव्हेत. केवळ पातिव्रत्याच्या पालनानें मात्र पति वश होत असतात."

**" न जातु वशगो भर्ता स्त्रिया ऽ स्यान्मंत्रकर्मणा ! "**

( वन. अ. २३३ श्लोक १३. )

**अहंकार विहायाहं कामक्रोधौ च सर्वदा**
**सदारान्पांडवान्नित्यं प्रयतोपचराम्यहम् ॥ १९ ॥**
**प्रणय प्रतिसंहृत्य निधायात्मानमात्मनि**
**शुश्रुषुर्निरभीमाना पतीना चित्तरक्षिणी ॥ २० ॥**

(वन. अ. २३३)

" अहंकार सोडून, सपत्नींशींहि प्रेमानें वागून, कामक्रोधादि विकार विसरून मी पतींची शुश्रुषा करते. निरभिमान होऊन त्यांचें चित्त राखण्याचा प्रयत्न करते. " असें तिनें आपल्या यशाचें मर्म सांगितें आहे. तिच्या संसारी भगिनींनीं या चित्राशीं मनोमन आपलेंहि चित्र ताडून पाहण्याला कांहींच हरकत नाहीं. कदाचित् सुशिक्षितपणाच्या,

अर्थार्जनक्षमतेच्या वा आत्मसामर्थ्याच्या जाणिवेनें धारदार झालेला तुमचा अहंकार पतीच्या अहंकाराशीं घांसला जाऊन तुमच्या संसारसौख्यावर असंतोषाच्या ठिणग्या उडवीत असेल तर द्रौपदीनें त्यावर अचूक बोट ठेवलें आहे. मतस्वातंत्र्याच्या अभिनिवेशांत नकळत पतीचें मन दुखविण्याची चूक करीत असाल तर द्रौपदी तुमचें निवारण करीत आहे.

*　　　*　　　*

**द्रौपदीचें** कर्तृत्वहि असेंच फार मोठें आहे. घरांत चालणारे, स्वतःला माहीत असणारे सारे कुलाचार व्यवस्थित पार पडावे म्हणून ती रात्रंदिवस खपत असे.

याशिवाय पांचहि पतींच्या प्रत्येकीं शेंकडों दास-दासी असल्या तरी त्या सर्वांची गुण, रूप, नाम, वस्त्रें, भूषणें, कामें व संख्याक्रम यांसह सर्व माहिती तिला आहे. त्यांच्या खाण्यापिण्याच्या सर्व व्यवस्थेवर तिनेंच जातीनें लक्ष ठेवलें पाहिजे. पांडवांच्या अंतःपुरांतील हत्ती, घोडे, रथ त्यांची संख्या, स्वारींत निघण्याचा क्रमसुद्धां तिला माहीत आहे. व याचा तिला फार अभिमान वाटतो. पांडवांचा आयव्यय-जमाखर्चसुद्धां-ती जाणते. त्यांच्या भांडाराची-खजिन्याची-सर्व माहिती तिला आहे. अशा कुशल, दक्ष, कर्तृत्वशाली गृहिणींवर विश्वासानें व निश्चितपणें पांडवांनीं सारें घर सोपवून द्यावें, यांत कसलें आश्चर्य ? स्वतःच्या कर्तृत्वानें गृहराज्याचे सर्वाधिकार तिनें मिळविलें आहेत.

हीच आदर्श गृहिणी आणि हाच खरा संसार ! " मी संसार करते आहे " असें उत्तर तेव्हांच देतां येतें. अशा कर्तव्यदक्ष नि कर्तबगार गृहिणी कितीशा आढळतात ? हें साधत नसेल तर ' संसार करते ना ? ' या विचारण्याला कांहींच अर्थ नाहीं. " **कार्येषु मंत्री गृहिणी सचिवः** " होण्याइतका पतीचा विश्वास नि प्रेम जिंकून ती जबाबदारी उत्कृष्टपणें पार पाडील तीच खरी संसारी स्त्री ! तिचा संसार हाच खरा संसार ! गृहिणी जीवनाचें केवढें भव्य चित्रण द्रौपदीनें या उत्तरानें करून ठेवलें आहे.

## : १२ : : महाभारतांतील स्त्रिया :

# लोपामुद्रा, तपती, सुकन्या वगैरे

**वि**विध क्षेत्रांतील, विविध वृत्तींच्या स्त्रियांचें इतके अनेकविध नमुने महाभारतांत आढळतात कीं केवळ महाभारतांतील स्त्री-दर्शनानेंहि आपल्याला भारतीय स्त्रीचें संपूर्ण दर्शन होऊं शकेल. 'अनुशासनिक' पर्वातील 'स्त्री-प्रशंसा,' 'स्त्री धर्मकथन' ही प्रकरणें [ अध्याय ४६ व १४६ ] भारतीयांचा स्त्री-विषयक दृष्टिकोनहि आपल्याला स्पष्ट करून दाखवतील. त्यामुळें सारे संशय येथें फिटतात. सारे प्रश्न येथें सुटतात.

**पूज्या लालयितव्याश्च स्त्रियो नित्यं जनाधिप।**
**स्त्रियो रक्ष्याश्च पोष्याश्च।**

[ अनु० अ० ४६ श्लोक ५ ]

—असा उपदेश वारंवार केलेला आढळतो. स्त्री ही पूज्य आहे, रक्षणीय आहे, पोषणीय आहे, यामुळेंच कदाचित् ती कुणाला परतंत्रहि वाटेल ! हा असा दंडक कां ? '**स्त्रीषु दुष्टासु वार्ष्णेय जायते वर्णसंकरः**।' हें गीतेंतील सुप्रसिद्ध वचनहि याच ग्रंथांत आढळतें. यांतील '**दुष्टासु**' या शब्दाचा अर्थ अधिक स्पष्ट करावासा वाटतो. दुष्-दूषित होणें. दुष्ट-दूषित झालेलें. दुष्टा—जिचें पावित्र्य दूषित झालें आहे अशी स्त्री ! यामुळें वर्ण-संकर उद्भवेल हें उघड आहे. पण स्त्री स्वतःच्या इच्छेनें वा दोषानेंच केवळ दूषित होत नाहीं, इतरांच्या दुष्प्रवृत्तींनेंच ही आपत्ति तिजवर येण्याचा संभव अधिक ! स्वतःच्या भरण पोषणासाठीं बाहेर पडण्याचा प्रसंग आला तर या धोक्यांतहि तिला सांपडावें लागेल. असें होऊं नये म्हणूनच " स्त्री ही रक्षणीय अतएव पोषणीयहि असल्याचा " दंडक घालण्यांत आला. आजच्या वनिता-वाङ्मयांतून या तऱ्हेचे अनेक प्रसंग-अनुभव चित्रित झाले आहेत. सौ. **चन्द्रकला हाटे** यांनीं कांहीं कालापूर्वीं सुशिक्षित मिळवित्या स्त्रीलाहि या बाबतींत 'सावधान' ते चा इशारा

दिला आहे. हें पाहिलें म्हणजे हजारों वर्षांपूर्वीच्या या व्यवस्थेचें मर्म ध्यानीं येतें. शिवाय जीवनाच्या सातत्य-रक्षणासाठीं अपत्यांना जन्म देणें व त्यांचें परिपालन करणें ही जबाबदारी निसर्गानें स्त्रीवरच सोंपवून दिली आहे. लोकयात्रेसाठीं ही महनीय जबाबदारी जिनें पार पाडली तिचें रक्षण व पोषण करणें लोकांना-समाजालाहि कर्तव्यच वाटणें साहजिक असल्यानें हा दृष्टिकोन स्वाभाविक वाटतो.

**धर्मकामार्थ कार्याणि शुश्रुषा कुलसन्ततिः ।**
**दारेष्वधीनो धर्मश्च पितॄणां आत्मनस्तथा ॥**

हें भारताचें सांगणें आहे. घरांतील धर्मकृत्यें, व्रतें, वैकल्यें, अर्थव्यवहार, अतिथि-सत्कार, वडिलांची सेवा-शुश्रुषा, कुल संततीचें वर्धन, पालन व रक्षण हीं सर्व कार्यें भारतीय संस्कृतीनें स्त्रीकडेच सोपवलीं आहेत. ' धर्म हा स्त्रीच्याच हातीं असतो ' असें सांगतात. चूल नि मूल यावरोबरच राष्ट्रकुलाची थोर परंपरा राखण्याचेंहि कार्य तिनें केलें पाहिजे.

पैकीं '**जातस्य-परिपालनम्**' आणि '**कुल-संतति**' या दोन शब्दांकडे मी वाचकांचें विशेष लक्ष वेधूं इच्छिते. लग्न झालें, संसार झाला, मुलें-बाळें झालीं. आतां काय व्हावयाचें राहिलें आमचें ? असा प्रश्न अनेकजण विचारतात. मुलें होणें ही निसर्गसिद्ध गोष्ट आहे. माता-पितरांचें कर्तव्य नि कर्तृत्व यापुढेंच आहे. बालकाला जन्म दिल्यानें कर्तव्य संपत नाहीं. त्याच्या देहाची आणि मनाची, बुद्धीची आणि व्यक्तित्वाची यथायोग्य वाढ व्हावी म्हणून प्रयत्न करणें, त्याच्या जीवनाची, चारित्र्याची घडण घडविणें, जीवन संग्रामांत यशस्वी होण्याचें शिक्षण आणि सामर्थ्य त्याला मिळवून देणें ही मातेचीच जबाबदारी आहे. आजच्या अनेक मातांना त्याची असावी तितकी जाणीव नाहीं असें नाइलाजानें म्हणावें लागतें.

हें सारें केवळ स्वतःच्याच मुलांपुरतें मर्यादित नाहीं. तर आपल्या अपत्यांइतकीच माया-ममता, आपुलकी व आत्मीयता कुटुंबांतील सर्वच मुलांबद्दल वडिलधाऱ्यांनीं बाळगली पाहिजे. जावांची, सपत्नींची बालकें हीं कुलसंतति आहे हें जाणून त्यांचीहि जपणूक कुल-स्त्रीनें केली पाहिजे. कुटुंबांतील कर्त्या पुरुषानें आपल्या मुलांप्रमाणेंच भावांच्या मुलांकडे, धाकट्या भावंडांकडेहि लक्ष पुरविलें पाहिजे, खर्च सोसला पाहिजे.

आपल्या मुलांइतक्याच मायेनें कुंतीनें माद्रीच्याहि मुलांचा सांभाळ केला. द्रौपदीनें सौभद्राचाहि अभिमान धरला. गांधारीनें पांडवांचेंहि हीतच चिंतिलें. भारतीय युद्धांत कुरु-कुलाचा अपरिमित संहार झाला असतां एकुलता एक कुलदीप जो चिमणा **परिक्षिति** त्याच्यावरच साऱ्यांचें लक्ष केंद्रित झालें. सर्व परित्याग केला असूनहि भीष्मांनीं पंडु, धृतराष्ट्र, विदुर आणि कौरव पांडवांच्या शिक्षणाकडे, जागरूकतेनें लक्ष पुरविलें.

**सुस्वभावा सुवचना सुवृत्ता सुखदर्शना।**
**अनन्यचित्ता सुमुखी भर्तुः सा धर्मचारिणी ॥**

(अनु. अ. १४६ वा. श्लो. ३५)

असें आदर्श स्त्रीचें वर्णन महाभारतानें केलें आहे. चांगल्या स्वभावाची, मधुर भाषण करणारी, सुप्रसन्न, सदाचरणी, पतीशीं एकनिष्ठ असणारी जी स्त्री तीच धर्मचारिणी ! जिला पाहून संतोष होईल, जिचें बोलणें सुखदायक असेल, जिचें वर्तन समाधानकारक असेल तीच आदर्श स्त्री ! किती समर्पक आहे हें वर्णन !

हें वर्णन संपवून स्त्री-चरित्रांकडे दृष्टि टाकली कीं महासति गांधारी, महामाता कुंती, पतिव्रता पांचाली नि इतरहि अनेकानेक स्त्रिया आपल्या वैशिष्टयानें नजरेंत भरतील,

* * *

**ही** राजकन्या **लोपामुद्रा** ! अतिथी म्हणून राजाकडे आलेल्या अगस्ति ऋषींनीं "**लोपामुद्रां प्रयच्छ मे।**" लोपामुद्राच मला दे म्हणून मागणी घातली. आणि सुखांत वाढलेल्या राजकन्येला मुनींबरोबर वनांत कशी धाडावी हा राजाला पेंच पडला. कन्येवरील प्रेम नि ऋषींच्या रागाची भीति या कात्रींत तो सांपडला. अशावेळीं "माझ्यासाठीं ऋषींचा राग ओढवून घेऊं नका, त्यांची इच्छा पुरवा" असें सांगून लोपामुद्रेनें स्वखुषीनें ही मागणी मान्य केली व त्यांच्याशीं तिचा विवाह झाला.

"माझ्याबरोबर यायचें असेल तर ही विलासी वस्त्र-भूषणें टाकून वल्कलें परिधान केलीं पाहिजेत" ही विवाहानंतर पतीनें केलेली आज्ञा शिरसावंद्य मानून तिनें त्यांचा त्याग केला. अगस्तीबरोबर वनवासी झालेल्या या त्यांच्या भार्येनें पती-

बरोबर तपाचरणाला प्रारंभ केला. आरंभापासून अखेरपर्यंत या तपोधन ऋषीला संतुष्ट राखून त्याला अत्यंत प्रिय होणारी लोपामुद्रा म्हणजे भारतीय स्त्रीचा आदर्श नमुना आहे. "तुझी इच्छा असेल तितके पुत्र तुला होतील" या पतीच्या वचनावर "**सहस्रसंमितः पुत्रः एकोऽप्यास्ति तपोधन**" एकच तपोधन पुत्र हजारांच्या बरोबरीचा असतो, असें ती उत्तरते. बहुप्रसवा होण्यापेक्षां सुप्रसवा सुमाता होणेंच तिला अधिक मान्य होते.

* * *

**जरत्कारु** ऋषींपासून जनमेजयाच्या सर्पसत्रांतून नागकुलाचें रक्षण करणारा पुत्र लाभणार आहे असें कळतांच पुत्रप्राप्तिसाठींच विवाहाला तयार झालेल्या मुनींशीं विवाह करण्याला तयार होणारी **वासुकीची** भगिनी **जरत्कारी** हा निर्णय घेते तो नागकुलाच्या रक्षणासाठींच. पुत्रजन्मानंतर मुनी पत्नीचा त्याग केल्यावाचून राहणारा नाहीं हें माहित असूनहि संसारसुखावर पाणी सोडण्याचा तिनें घेतलेला हा निर्णय व कुलसंरक्षणासाठीं केलेलें बलिदान पाहून मन थक्क होतें.

"गांधर्व विवाहानें तूं मला वर" असें सांगणाऱ्या **बृहांतकर्ता** राजाला "तुझ माझ्यावर प्रेम असेल तर वडिलांजवळ मला मागणी घाल" असें उत्तर देणारी **तपती** "या देहाची स्वामिनी मी नाहीं. स्त्री स्वतंत्र नसते, म्हणून मी तुझ्या सन्निध येऊं शकत नाहीं." असें सांगते, तेव्हां-'न स्त्री स्वातंत्र्यमर्हति'चाच आशय स्पष्ट करते आहे.

"**समा द्वादश तस्येह वेदानभ्यसतो मुने।**" असें वसिष्ठांच्या प्रश्नाला उत्तर देणारी **शक्तिसुना अदृश्यंती** पित्याजवळ आपण बारा वर्षें वेदाभ्यास केला असल्याचें सांगते. स्त्रियांना वेदाधिकार असल्याचा हा प्रबळ पुरावा. व्यासंगी स्त्रीचा हा नमुना ध्यानांत ठेवण्याजोगा आहे.

मिथिल जनकाच्या मोक्ष-जिज्ञासेचें समाधान करण्यासाठीं **सुलभा** भिक्षुकी त्याच्या सभास्थानीं उपस्थित होते. प्रधान नांवाच्या राजर्षीची ही कन्या योगमार्गाचें आचरण करीत, एकटीच पृथ्वीपर्यटनाला निघालेली ही एक संन्यासिनी आहे. पुरुषां-

प्रमाणेंच स्त्रियाहि नैष्ठिक ब्रह्मचर्याचें—वाटल्यास कौमार्याचें म्हणूंया—पालन करून संन्यस्तवृत्तीनें मोक्षासाठीं साधना करीत असत.

**शर्याती** राजाची एकुलती एक नि म्हणूनच अत्यंत आवडती असणारी कन्या **सुकन्या** राजाबरोबरच स्वारीवर जात असे. एकदां मैत्रिणीबरोबर हिंडतां हिंडतां तिनें एक भलें मोठें वारूळ पाहिलें. कुतुहलानें पाहूं लागल्यावर त्यांत तिला जिवंत तेज दिसलें. छिद्रांतून काय चमकतें आहे हें तिला कळेना. कुतुहलानें तिनें त्यांत काडी खुपसली. अंगावर वारूळ वाढलें तरीहि तपाचरणांत गढून गेलेले ते–**च्यवनऋषी** होते त्यांचे तेजस्वी नेत्रच सुकन्येनें छिद्रांतून पाहिलें होतें. पण तें न कळल्यानें तिच्या हातून मोठीच चूक झाली. ऋषींचे डोळे फुटले. त्यांच्या क्रोधानें सैन्यांत एकच गोंधळ उडाला.

एकाएकीं सैनिक व्याधिग्रस्त झालेले पाहून गोंधळलेल्या राजानें, चौकशी केली तेव्हां सुकन्येनें आपला खेळ सांगितला. वारूळ काढून राजानें मुनींचे चरण धरले व त्यांची करुणा भाकली. “ जिनें माझा अपमान केला ती तुझी कन्याच शुश्रुषेसाठीं माझ्याजवळ ठेवून जा, म्हणजे सारें ठीक होईल.” च्यवन उत्तरले. आपल्याच अपराधानें ओढवलेलें हें अरिष्ट दूर करण्यासाठीं सुकन्येनें आनंदानें वृद्ध आणि अंध च्यवनाला माळ घातली.

राजकन्या वनवासिनी झाली. अंध व वृद्ध अशा पतीची मनोभावें सेवाशुश्रुषा करूं लागली. “ तुझ्यासारख्या राजकन्येला शोभणारें ऐश्वर्य येथें नाहीं. तुझा अन्ध पति तुझ्या भरण-पोषणालाहि समर्थ नाहीं. त्याला सोडून दे, आणि आमची भार्या हो ” असें अश्विनीकुमारांनीं म्हणतांच ती उत्तरते, “ रताऽहं च्यवने पत्यौ मैवं मा पर्यशंकृताम्” माझ्या पतीवरच मी अनुरक्त आहे. माझें मन वळविण्याचा प्रयत्न करूं नका. या उत्तरानें संतुष्ट झालेल्या अश्विनीकुमारांनीं च्यवनाला तरुण नि रूपसंपन्न बनविल्यानंतरहि ती त्याला बरोबर शोधून काढते, तेव्हां तिच्या चातुर्याचें कौतुक वाटतें.

गुरु आपल्या पित्याचा त्याग करून जाऊं नयेत म्हणून **देवयानी** जी इच्छा करील ती मी पुरी करीन असें दैत्यराज वृषपर्वा याची कन्या **शर्मिष्ठा** सांगतें.

हजारो दासींसह शर्मिष्ठेनें माझें दास्यत्व पत्करावें अशी देवयानीची इच्छा होती ती प्रमाण मानून ती सांगतें, “ कोणत्याहि उपायानें माझ्या संकटग्रस्त ज्ञातीचें कल्याण

व्हावें म्हणून मी तुझें दास्यत्व पत्करून तुझा पिता तुला जेथें देईल तेथें तुझ्या मागून येण्याला तयार झालें आहे," असें उत्तर तिनें दिलें आहे.

लोकपालांचें दूतत्व पत्करून येणाऱ्या **नलराजाला**, "तुझ्यावरच माझें प्रेम असल्यानें लोकपालांच्या साक्षीनें मी तुलाच माळ घालीन." असें सांगणारी **दमयंती**, यमाला संतुष्ट करून पतीचे प्राण परत मिळविणारी **सावित्री**, सत्त्व-रक्षणासाठीं पति पुत्रांसह दुर्धर क्लेश सहन करणारी हरिश्चंद्राची सत्वधीरा **तारामती**; महाभारतांतच या साऱ्यांचें दर्शन घडतें. तेजस्विता, सहनशीलता, सामर्थ्य, सेवातत्परता, विद्वत्ता, व्यासंग-स्त्रीचे सारे गुण येथें आढळतात. स्त्री-जीवनाचे सारे पैलू येथें सुंदर स्वरूपांत पहावयास मिळतात.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नों. नं. १५३५८
६।२।५८

: १३ : : पौराणिक स्त्रिया :

## मनोरमा आणि लीलावती

रामायण आणि महाभारत या आपल्या सांस्कृतिक इतिहासानंतर आतां आपण पुराणांकडे वळणार आहोंत. प्रथम देवी-भागवताकडे वळूं या. 'स्त्री ही शिवाची शक्ति, पुरुषाची प्रकृति ' हें सूत्र माझ्या विवेचनांत पुष्कळदां येऊन गेलेलें आहे. त्या विधानाला येथें आधार सांपडतो, दुजोरा मिळतो.

**सर्वाः प्रकृतिसंभूताः**
**सत्वांशाच्चोत्तमाज्ञेयाः सुशीलाश्च पतिव्रता ।**

( नवमस्कंध, अध्याय १ )

सर्व स्त्रिया प्रकृतिपासून उत्पन्न झाल्या असून सत्वांशापासून निर्माण झालेल्या स्त्रिया सुशील व पतिव्रता असल्यानें त्या उत्तम म्हणून ओळखल्या जातात. त्यांचें वर्णन करतांना भगवान सांगतात,

" सच्छील, पातिव्रत्य, सत्वशीलता, श्रद्धा, धर्माचरण, शांत व विनीतवृत्ति यांनीं युक्त असेल तीच उत्तम स्त्री ! अशा सुशील नि सहनशील स्त्रियाच जगांत पूजनीय ठरतात. बहुपत्नीत्व हें भारतीय संस्कृतीला संमत आहे खरें पण तरीहि एकपत्नी पुरुषच सुखी असतो, बहुपत्नित्वांत सुख नाहीं. " असाहि इशारा येथें दिलेला दिसतो.

" ज्याची पत्नी पतिव्रता असेल तोच पवित्र, मुक्त व सुखी असतो. ज्याला सुशील नि पतिव्रता पत्नी लाभते त्यालाच भूलोकीं व स्वर्लोकींहि सुखाची प्राप्ती होऊन अखेर तो मोक्षाला जातो अशी आपली दृढ श्रद्धा आहे, " या खात्रीमुळेंच—

" स्त्रीचा अपमान करणें म्हणजे प्रकृतीचाच अपमान करणें, जो सच्छील अशा सौभाग्यसंपन्न मातेची पूजा करतो तो प्रकृतीचीच पूजा करतो, " असें यांत सांगितलेलें आहे. स्त्रीचें स्थान किती सन्माननीय आहे पहा. जी संस्कृति

स्त्री-जातीबद्दल इतके गौरवास्पद उद्गार काढते, तिचा स्त्री-विषयक दृष्टिकोन अनुदार कसा म्हणतां येईल ?

* * *

**स्त्री-विषयक** दृष्टिकोनाचा इतका विचार केल्यावर स्त्री जीवनाकडें वळल्यास सुकन्या, सावित्री, तारामती यांच्या कथा यांत अत्यंत विस्तारानें सांपडतील. त्यांची ओळख यापूर्वींच झाली आहे तेव्हां इतर स्त्रियांचाच विचार करूं.

कोसलदेशाचा राजा पुण्यपुत्र ध्रुवसंधि याला दोन राण्या होत्या. एक **मनोरमा** व दुसरी **लीलावती.** सुदर्शन व शत्रुजित् हे या दोघींचे दोन पुत्र. शिकारीला गेलेला राजा ध्रुवसंधि स्वतःच सिंहाची शिकार झाला, व दोघींचें सौभाग्य हरपलें. जावयाच्या मृत्यूची वार्ता ऐकतांच दोघींचे वडील तेथें आले व आपल्या नातवालाच गादी मिळावी म्हणूनच त्यांचे प्रयत्न सुरूं झाले.

सुदर्शन मोठा मुलगा. राजाचा आवडता नि राज्याचा अधिकारीहि, त्यालाच गादीवर बसविण्याचा मंत्र्याचा विचार होता, पण लीलावतीचा पिता, उज्जयिनीचा राजा युधाजित् याला हें मान्य नव्हतें. शत्रुजितच राजा व्हावा हा त्याचा आग्रह होता. त्यासाठीं त्यानें मनोरमेचा पिता, कलिंगाधिपति वीरसेन याच्याशीं युद्ध आरंभिलें. हा अन्याय आहे हें कळत असूनहि विरोध करण्याचें सामर्थ्य नसल्यानें लीलावतीला स्वस्थ राहणें भाग पडलें. वीरसेन मारला गेला. राणी मनोरमा व तिचा पुत्र सुदर्शन असहाय होऊन शत्रुजित् राजा झाला.

पति गेला. पिता गेला. प्रजा व मंत्री युधाजितापुढें निर्बल ठरले. आपल्याला साहाय्य करूं शकेल असा कुणीहि बलवान आता राज्यांत उरला नाहीं, हें मनोरमेला कळून चुकलें. पित्याच्या तंत्राप्रमाणेंच वागणें भाग असल्यानें आपली सवत आपल्या मुलाबद्दल दुजाभावानेंच वागेल अशी तिला भीति वाटूं लागली. सागराच्या सावत्र आईनें सवतीच्या गर्भाचा नाश करण्यासाठीं तिला गरोदरपणीं विष घातलें होतें, हें तिला आठवलें. स्वतःचा पुत्र राज्यावर बसावा म्हणून कैकयीनें रामाला वनवासांत धाडल्याचें तिला स्मरण झालें. येथें राहण्यांत सुदर्शनाचे प्राण धोक्यांत आहेत अशी तिची खात्री पटली व जीवनाचा एकमेव आधार असणाऱ्या बालसुदर्शनाच्या रक्षणासाठीं नगर

सोडण्याचा तिनें निर्धार केला. " पित्याच्या उत्तर क्रियेसाठीं मी नगराबाहेर जाते " असें लीलावतीला सांगून ती बाहेर पडली. वरो वर विश्वासू मंत्री विदल्ल होताच. त्याच्या सोबतीनें सुदर्शनासह ती भारद्वाजांच्या आश्रमांत येऊन पोहोचली.

## सावत्र मुलाला देखील आशिर्वाद देणारी



निर्मत्सर आणि निःस्वार्थी माता 'लीलावती'

विदल्लानें सांगितलेली हकिकत ऐकतांच—

**निर्भया वस कल्याणि पुत्रं पालय सुव्रते ।**
**न ते भयं विशालाक्षी कर्तव्यं शत्रुसंभवम् ॥ ५७**

( अध्याय १६ )

"निर्भय होऊन इथें रहा. पुत्राचें पालन कर. शत्रूचें भय धरूं नकोस," या ऋषींच्या आश्वासनानें आनंदीत होऊन ती तेथें राहूं लागली. विदल्ल निघून गेला. साध्वी मनोरमा मुलाला घेऊन कुठें गेली असेल हा साऱ्यांना प्रश्न पडला. सुदर्शनाचा शोध काढीत त्याचा नाश करण्यासाठीं युधाजितहि आश्रमांत येऊन थडकला.

शत्रूनें येथेंहि पाठ पुरविलेली पाहतांच मनोरमा भयभीत होऊन मुनींकडे आली. यावेळीं--"पुरा श्रुतं मया स्वामिन्'—म्हणत तिनें जयद्रथानें केलेल्या द्रौपदीहरणाचा व बलीवामनांचा इतिहास कथन केला असून, "मधुर बोलून राजा सुदर्शनाची मागणी करील व तो हातीं लागतांच त्याला ठार करील. त्याला तसाच परत पाठवा म्हणजे जानकीसारखी मीहि पुत्रासह आपल्या आश्रमांत राहीन" अशी प्रार्थना केली आहे. यावेळचें तिचें भाषण तिच्या बहुश्रुततेची साक्ष देते.

ऋषी राजाला विन्मुख परत पाठवितात. तपोवनाच्या पवित्र वातावरणांत, मनोरमेच्या तालमींत, भारद्वाजांच्या देखरेखीखालीं सुदर्शन मोठा होऊं लागतो. श्रद्धा, सेवा, सच्छील या गुणांबरोबर शौर्य, बल, धाडसहि त्याच्या अंगीं येतें. या बलशीलविद्यासंपन्न कुमाराची कीर्ति काशी राजाची कन्या शशिकला हिच्या कानीं जाते. दोघांचा विवाह होतो.

यामुळें संतप्त झालेला युधाजित् युद्धाला प्रवृत्त होतो व शत्रुजितासह मारला जातो. विजयी सुदर्शन पत्नी व माता यांच्यासह राजधानींत प्रवेश करतो. सावत्र आईला लीलावतीला वंदन करतो व म्हणतो, "भक्ताच्या नाशाला उद्युक्त झालेल्या तुझ्या पित्याचा व पुत्राचा भक्तवत्सल जगदंबेनेंच वध केला, त्या बाबतींत मी पूर्ण निर्दोष आहे. मनोरमेप्रमाणेंच तूं माझी माता आहेस, मला वंदनीय आहेस." किती थोर मन हें ? ही उदात्त शिकवण मनोरमेचीच नव्हे का ? कन्यादानाच्या वेळी काशीराजानें तिचा सत्कार करतांच, "माझ्या राज्यहीन मुलाला मुलगी देऊन तूं आमचा अपूर्व सत्कार केला आहेस." असेंच गौरवाचे उद्गार तिनें काढले आहेत. प्रांजळ, प्रेमळ नि उदार वृत्तींची मनोरमा म्हणजे कर्तव्यदक्ष मातेची मनोरम मूर्तीच !

सुदर्शनाला पाहून लीलावतीनें काढलेले उद्गारहि असेच मनोरम आहेत. तिच्या पुत्राचा व पित्याचा वध होऊन सुदर्शन राजधानींत प्रवेश करतो आहे.

शशिकलेसारखी अनुरूप पत्नी त्याला प्राप्त झाली आहे. पण याबद्दल यत्किंचितहि दुष्टावा तिला वाटत नाहीं. उलट—

**सापराधास्मि पुत्राहं कृता पित्रा युधाजिता ॥ २१**
**न तु वारयितुं शक्ता तदाहं न सुतं मम ॥ २२**
**नाहं शोचामि तं पुत्रं सदा शोचामि तत्कृतम् ॥ २३**

( तृतीयस्कंध, अध्याय २५ )

" माझ्या पित्यानें तुजवर केलेल्या अन्यायामुळें मीच तुझी अपराधी आहे. त्याचें निवारण करण्याला मी असमर्थ ठरलें. पण आपल्या कृत्यानीं ते अखेर मरण पावले आहेत. त्यांत तुझा कांहींच दोष नाहीं. पुत्रासाठीं मला शोक होत नाहीं पण त्यानें केलेल्या दुष्कृत्यांचें मला फार दुःख होते. " असें ती म्हणते.

पुत्रवधापेक्षांहि त्याच्या अन्याय्य वर्तनानें कष्टी होणारी ही माता नंतर सुदर्शनाला सांगते,

**पुत्र त्वमसि कल्याण भगिनी मे मनोरमा ।**
**न क्रोधो न च शोको मे त्वयि पुत्र मनागपि ॥ २४ ॥**

" तूं माझा पुत्र व मनोरमा माझी भगिनी आहे. माझा तुझ्यावर मुळींच राग नाहीं. " व त्याचें प्रेमानें स्वागत करते.

विजयी होऊन आलेल्या सावत्र मुलाकडे मातृप्रेमानें नि सवतीकडे भगिनीप्रेमानें पाहणें निर्मत्सर निःस्वार्थ व निरभिमानी स्त्रीलाच फक्त शक्य आहे. म्हणूनच मनोरमेइतकीच लीलावतीहि मला श्रेष्ठ वाटते.

## शशिकला, जयंति, मंदोदरी वगैरे

**काशिराजाची** कन्या **शशिकला** म्हणजे ध्रुवसंधि राजाला मनोरमेपासून झालेला पुत्र जो सुदर्शन त्याची पत्नी. भारतीय पुराणांतील एक आदर्श व अद्भूत प्रणयकथाच हिच्या चरित्रांतून आपण वाचणार आहोंत.

**शुश्राव नृपपुत्रं तु वनस्थं च सुदर्शनं।**
**सर्वलक्षणसंपन्नं शूरं काममिवा परम्॥४८**
**बंदीजन मुखाच्छ्रुत्वा राजपुत्रं सुसंमतम्।**
**चकमे मनसा तं वै वरं वरयितुं धिया॥४९**

(देवी–भागवत, तृतीय स्कंध अध्याय १८ वा)

"स्तुतिपाठकांकडून सुदर्शनाच्या रूपगुणशीलाची कीर्ति ऐकून तिचें त्याच्यावर प्रेम जडलें. या शूर, सुंदर सद्गुणी राजपुत्राला वरण्याचे विचार तिच्या मनांत येऊं लागले. त्यांतच तिच्या आराध्य दैवतानें, देवी भगवतीनेंहि "माझा परम भक्त सुंदर यालाच तूं वर. माझ्या प्रसादानें तुझें सर्व मनोरथ पूर्ण होतील." असाच तिला स्वप्नांत येऊन आदेश दिला. आपल्या कल्पनेला अशा रीतीनें परमेश्वरी प्रसादाचें पाठबळ मिळालेलें पाहून शशिकलेला साहजिकच फार आनंद वाटला. तिच्या मनांत सुदर्शनाबद्दलची प्रेम–भावना चांगलीच खोलवर रुजली. तिचा निश्चय दृढ झाला. इतक्यांतच राजानें तिचें इच्छा स्वयंवर जाहीर केलें. सखीकडून आईला व आईकडून राजाला तिनें आपलें मनोगत कळविलें.

राजा–राणी चकित झाली. त्यांना हा विचार रुचणें शक्य नव्हतें. कारण सुदर्शन किती दुर्दैवी, भाग्यहीन! सावत्रभावानें राज्यभ्रष्ट करून हांकलून दिल्यानें वनवासी झालेला दरिद्री! ना राज्य, ना सैन्य, ना संपत्ति! काय होतें त्याच्याजवळ? असल्या दरिद्र्याशीं राजकन्येचा विवाह? छेः! किती वेडेपणा हा शशिकलेचा! त्यांनीं तिचें

मन वळविण्याचा प्रयत्न करून पाहिला. पण ती मुळींच ऐकेना.

**मच्चित्तभित्तौ लिखितो भगवत्या सुदर्शनः।**
**तं विहाय प्रियं कांतं करिष्येऽहं न चापरम् ॥१४॥**

" देवी भगवतीनेंच आपल्या आदेशानें माझ्या मनःपटलावर सुदर्शनाची मूर्ति उमटवली आहे. त्यांच्याशिवाय मी कुणालाहि वरणार नाहीं " हाच निर्धार तिनें पुन्हां एकदां ऐकवला.

पण हें ऐकतो कोण? राजानें स्वयंवर जाहीर केलें. राजे-रजवाड्यांना निमंत्रणें धाडलीं. वनवासी सुदर्शनाला हें निमंत्रण कुठलें मिळायला? त्याला ही हकिगत कशी कळणार? आणि त्याला तरी बोलावणार कोण? स्वतः शशिकलेनेंच हें साहस करण्याचें ठरविलें. एका ब्राह्मणाकडून सुदर्शनाला निरोप धाडला.

**वरये त्वं ऋतेनान्यं पितृभ्यां प्रेरिताऽपि वा।**
**मनसा कर्मणा वाचा संवृतयस्त्वं वरः मया ॥ २० ॥**
**आगंतव्यं त्वयात्रैवं दैवं कृत्वा परं बलम् ॥**

( तृतीय स्कंध, अध्याय १९ )

" तुमच्यावांचून दुसऱ्या कुणालाहि मी वरणार नाहीं. मनानें, वाचेनें आणि कृतीनेंहि तुम्हालाच वरण्याचा माझा निर्धार आहे. हेंच निमंत्रण समजून स्वयंवरासाठीं जरूर यावें. "

देवी भगवतीनें जें सांगितलें तें खोटें ठरणार नाहीं हा तिचा दृढ विश्वास होता. कोणाच्याहि विरोधाला, कसल्याहि संकटाला ती भीत नव्हती. सुदर्शनाला निरोप मिळाला. भगवतीवर श्रद्धा ठेवून त्याप्रमाणें वागण्यासाठीं तिचा परमभक्त तयार झाला. मनोरमाहि बरोबर निघाली.

स्वयंवर मंडप निमंत्रितांनीं भरून गेला. मंडपांत चलण्याबद्दल राजानें कन्येला सुचविलें पण शशिकलेनें तें साफ नाकारलें.

**नमे दृष्टिपथं राज्ञा गमिष्यामि पिता किल।**
**कामुकानां नरेशानां..........**

( तृ. स्कंध अध्याय २० श्लोक १३ )

" मनानें सुदर्शनांना वरलें असल्यानें मी त्यांची पत्नी आहे. मंडपांत जमलेल्या कामुक राजांच्या विषयी दृष्टिक्षेपांचा स्पर्शहि माझ्या देहाला होऊं नये म्हणून मी मंडपांत येणार नाहीं. माझें स्वयंवर यापूर्वींच झालेलें आहे. " हेंच तिचें उत्तर! तिचें न ऐकतां सभा भरवण्याची केलेली चूक राजाच्या चांगलीच गळयांत आली. राजकन्या मंडपांत येण्याला तयार नाहीं हें ऐकतांच संतप्त झालेला युधाजित् युद्धालाच

" मी स्वयंवराला येणार नाहीं.... "



....निग्रही शशिकला

प्रवृत्त झाला. भयसंत्रस्त राजागणींनीं पुन्हां एकदां शशिकलेला मंडपांत चलण्याबद्दल आग्रहानें सांगून पाहिलें. पण सारें ऐकूनहि ती दृढनिश्चयी कन्या शांतपणें उत्तरली, " माझ्यासाठींच ना हा इतका अनर्थ ? मग सुदर्शनांना माझें दान करा, नि दोघांनाहि नगराबाहेर पाठवून द्या. भक्तावरचें हें संकट भगवती स्वतःच दूर करील. पण मला असलें भलतेंच कांहींतरी सांगू नका. मन हेंच सर्व पापपुण्यांचें मूळ कारण. एकदां मनानें वरलेला पति सोडून दुसऱ्याला कशी वरूं ? " हाच प्रश्न तिनें पुन्हां विचारला.

राजाचा नाइलाज झाला. रात्रींच्या रात्रीं त्यानें कन्येचा सुदर्शनाशीं विधिपूर्वक विवाह लावून दिला व तिची पाठवणी केली. मार्गांतच युद्धाजितानें युद्ध आरंभलें. त्यांत तो व शत्रुजित् मारले जाऊन सुदर्शनाचा विजय झाला. त्याला त्याचें राज्य परत मिळालें.

भारतीय प्रीतीचा महान् आदर्श—जो गिरीजेनें गिरवला, सावित्रीनें सिद्ध केला, तोच शशिकलेनें पुन्हां एकदां आचरून दाखवला. "प्रीतिभक्ति आणि नीति । तेणें प्रभु होई सांगाती " हेंच तिनें स्वकृतीनें सिद्ध केलें.

* * *

ही पित्याचें कार्य साधून देणारी–पितृकार्यसाधिनी **जयंती** ! ही इंद्राची कन्या. दानवांना जिंकायचें असेल तर त्यांचे गुरु शुक्राचार्य त्यांच्यापासून दूर गेले पाहिजेत हें इंद्रानें ओळखलें व त्यांना संतुष्ट करून दूर नेण्याची कामगिरी त्यानें विश्वासानें आपल्या या तरुण सुंदर कन्येवर सोपवली.

**गच्छ पुत्रि मया दत्ता काव्याय त्वं तपस्विने ।**
**समाराधय तन्वंगी मत्कृते तं वशं कुरु ॥ २१ ॥**

( चतुर्थ स्कंध अ. १२ )

" मी तुला तपस्वी शुक्राचार्यांना देत आहे. जा. माझें कार्य साधण्यासाठीं आपल्या सेवेनें त्यांना वश करून घे. " ही पित्याची आज्ञा प्रमाण मानून ती शुक्राचार्यांकडे आली. व तिनें त्यांची सेवा आरंभली.

हा तपोधन ऋषि सौंदर्याला भुलून कामवश होणार नाहीं, याला सेवेनेच संतुष्ट केला पाहिजे हें तिनें ओळखलें. शिवाय इंद्रानें तिला शुक्राचार्यानाच दिल्याचें सांगितलें होतें म्हणजे ती त्यांची पत्नी ठरत होती. पतीची सेवा करणें हें तिचें कर्तव्यच होतें. साहजिकच ती " स्वयंधर्मेस्थिता सती " आपल्या कामाला लागली.

केळीच्या पानांनीं त्यांना वारा घालावा. पिण्यासाठीं स्वच्छ, शीतल, सुवासिक पाणी भरून ठेवावें. सूर्य डोक्यावर आला कीं त्यांच्या डोक्यावर सावली येईल अशी व्यवस्था करावी, खाण्यासाठीं मधुर पक फळें जमवून ठेवावीं, नित्यकर्मासाठीं फुलें, दर्भ, समिधा इत्यादि सामग्री सिद्ध करावी, झोपण्यासाठीं पानांचा बिछाना तयार करून ठेवावा, जागृत होतांच मुखप्रक्षालनार्थ पाणी पुढें करावें-हरतऱ्हेनें देवेंद्राची कन्या त्यांच्या मनाप्रमाणें वागत होती. त्यांना आवडणार नाहीं म्हणून कसलेहि विकारवश हावभाव करण्याचें तिनें कटाक्षानें टाळलें होतें. आपल्या यौवनाची नि सौंदर्याची जाणीवहि तिनें कधीं दर्शवली नाहीं.

तिच्या या आचरणानें नि सेवेनें शुक्राचार्य संतुष्ट झाले.

**प्रीतोऽस्मि त्वत्कृतेनाद्य वरं वरय सुव्रते ॥ ४० ॥**

" तुझ्या सेवेनें मी संतुष्ट झालो आहे. वर माग " हे शुक्राचार्यांचे उद्गार ऐकूनहि ती चतुर विनीतबाला उत्तरते " महाराज ! आपल्या तपः प्रभावानें माझें मनोगत जाणण्याला आपणच समर्थ आहां " तिच्या या स्तुतीनें अधिकच संतुष्ट होऊन शुक्राचार्य उत्तरले " तूंच तुझ्या तोंडून आपली इच्छा मला ऐकव." यावर " पित्यानें मला आपल्या हातीं सोपवलें आहे, आपल्या सहवासाचा लाभ घडावा हीच माझी इच्छा ! " ही तिची मागणी ऐकून " दहा वर्षें तूं माझ्या संगतींत राहशील" असें सांगून तिच्यासह ते निघून गेले. विलासांत मग्न झाले. इंद्राचें काम साधलें.

* * *

' **लग्न** म्हणजे गुलामगिरी ! ' असें म्हणणाऱ्या सफ्रेजेट प्रथम पाश्चात्य राष्ट्रांतच निघाल्या असें नाहीं देवी भागवतांतहि अशी स्त्री आढळते. सिंहल देशचा राजा चंद्रसेनाची कन्या **मंदोदरी** हीच ती स्त्री.

सं. क्र. — ५५३८



श्वश्रुदेवर वर्गाणां दासीत्वं श्वशुरालये।
पतिचित्तानुवर्तित्वं दुःखा द्दुःखतर स्मृतम् ॥ १९ ॥
[ पंचम स्कंध. अध्याय १७ ]

सासरीं सासुसासरे नि दीर–जावा यांची सेवा करावी लागेल, पतीच्या इच्छेनुसार वागावें लागेल म्हणून हिला संसार नको होता. "**नच वांछाति भर्तारम्**" "**नाहं पतिं करिष्यामि**" मला संसाराची इच्छा नाहीं, मी लग्न करणार नाहीं असें तिनें वडिलांना सांगितलें होतें. मुलीचा हा निश्चय कळतांच तिचा विवाह जमविण्याच्या खटपटींत असणारा राजा तो उद्योग सोडून देऊन स्वस्थ बसला. विवाहाची चालून आलेली पहिली सुसंधि मंदोदरीनें घालवली.

एकदां मैत्रिणींबरोबर ती उद्यानांत विहरत असतां तिला पाहून एका रुपगुण-संपन्न राजानेंहि, "मी अजून अविवाहित आहे. माझी पत्नी हो." म्हणून तिचा अनुनय करण्याचा प्रयत्न केला. पण स्वतःच्या मनाच्या तारुण्यसुलभ इच्छेकडे दुर्लक्ष करून ही मागणीहि तिनें खुशाल धुडकावून लावली. इतकेंच नव्हे तर लग्न करून एका पुरुषाच्या हातीं आपलें सुखदुःख सोपविण्याच्या कल्पनेचाच तिनें उपहास केला.

आणि स्वातंत्र्याचे गोडवे गाणारी हीच मंदोदरी धाकट्या बहिणीचा विवाह होतांच हें सारें विसरून "विवाहं कुरु मे पिता" "माझें लग्न करा." म्हणून पित्याच्या मागें लागली. मद्रदेशच्या राजावर अनुरक्त होऊन त्याच्याशीं विवाह करण्याला अत्यंत उत्सुक झाली. विवाहानंतर अनेक सुंदर स्त्रिया असूनहि दासींशीं रममाण होणाऱ्या राजाचें खरें स्वरूप कळतांच 'धिगस्तु मम जीवितम्' म्हणत स्वतःलाच दूषणें देऊं लागली.

* * *

'**गार्गी, सुलभा, शबरी, हेमा, स्वयंप्रभा** यांच्याप्रमाणें विशिष्ट ध्येय साधण्यासाठीं, संसारसुखाची इच्छाच नाहीं म्हणून, विरागी वृत्तीनें संसार सोडणें निराळें नि स्त्री–स्वातंत्र्याच्या चुकीच्या कल्पना डोक्यांत घेऊन संसाराची जबाबदारी टाळणें निराळें. स्वतःची फसवणूक करून घेणारांची कशी फसगत होते, केवढें अपयश पदरीं घ्यावें लागतें याचें हें चारित्र म्हणजे उत्तम उदाहरणच होय. कुशध्वज व मालावती यांची कन्या **वेदवती** हिनें जन्मतःच वेदांचा उच्चार केल्या-

मुळें हिचें नांव वेदवती पडलें. ग्रंथकार सांगतात—

**वेदध्वनीं सा चकार जातमात्रेण कन्यका।**

**तस्मात्तां च वेदवतीं प्रवदन्ति मनीषिणः ॥५॥**

(नवम स्कंध अध्याय १६ वा)

ही नारायण-परायणा कन्यका मनानें आदिपुरुषाला वरून त्याच्या प्राप्तीसाठीं तीव्र तप आचरतांना यांत दिसेल.

धर्मध्वज व माधवी यांची कन्या **तुलसी** कृष्ण-प्राप्तीसाठीं तीव्र तप करून कृष्णांश जो शंखचूड त्याची पत्नी झाली. ही परमसाध्वी व पतिव्रता होती. हिच्या पातिव्रत्यानेंच शंखचूड अवध्य व अजिंक्य होता. अखेर त्याच्या नाशासाठीं तुलसीच्या पातिव्रत्याचा भंग करण्याच्या निश्चयानें श्री विष्णूंनीं शंखचूडाचें रूप घेतलें. ग्रंथकार सांगतात,

**शंखचूडस्य कवचं गृहित्वा विष्णु मायया।**

**पुनर्निधाय तद्रूपं जगाम तत्सतीगृहम् ॥२३**

(नवम स्कंध अ. २४)

शंखचूडाचें कवच घेऊन विष्णूंनीं मायेनें त्याचें रूप धारण केलें व तें सती तुलसीकडे गेले. यामुळें देवांचें कार्य साधलें खरें, पण विष्णूंचें कपट ओळखून तुलसीनें त्यांना शाप दिला. सतीच्या सामर्थ्याचा प्रभाव इतका कीं विष्णूंनाहि हा शाप भोगावा लागला. शालिग्राम होऊन शिळा व्हावें लागलें.

'**नारी बलवती काऽस्ति या नौ नाशं करिष्यति**' आमचा नाश करूं शकेल अशी स्त्री कोण असणार? '**न भयं स्त्री-जनेभ्यःश्च स्वभावादबला हि सा**'–स्त्री पासून कसलें भय? ती तर स्वभावतःच अबला आहे असले उपेक्षणीय उद्गार काढणाऱ्या गर्वोद्धत महिषासुराला मारणारी स्त्री रूपधारिणी **दुर्गा** यांतच दिसते. (पंचम. अ. २१) 'युद्ध करणें हें स्त्रीचें काम नव्हे. म्हणणाऱ्या शुंभनिशुंभांचा निःपात करणारी '**निर्भयैकाकिनी बाला**' जी कालिका तीहि यांतच भेटेल व स्त्री-जातीच्या सामर्थ्याबद्दल, युद्धकौशल्याबद्दल, रणधुरंधरतेबद्दल साऱ्यांची खात्री पटवील.

: १५ :                    : पौराणिक स्त्रिया :

## शाण्डीली, भोगवती, सुकला वगैरे

आतापर्यंत पत्नीनें काढलेले पतीविषयींचे श्रेष्ठतादर्शक उद्गार आपण वाचले. आतां पुराणांनीं केलेलें हें पतिव्रतेचें वर्णन पहा

**स्वयं नारायणः शम्भुर्विधाता जगतामपि ।**
**सुराः सर्वे च मुनयो भीतास्ताभ्यश्च संततम् ॥**

" आदि पुरुष श्रीनारायण, श्रीशंकर व विधाता श्रीब्रह्मदेव यांच्यासह सारे देव व ऋषीमुनीसुद्धां सतीच्या सामर्थ्याचा सदैव धाक बाळगीत असतात. "

**नास्ति भार्या समं तीर्थं, नास्ति भार्या समं सुखम् ।**
**नास्ति भार्या समं पुण्यं, तारणाय हिताय च ॥**

" पतिव्रता पत्नी हेंच एक पवित्र तीर्थस्थान ! तिच्या दर्शनानेंच तीर्थयात्रा केल्याचें पुण्य घडेल. तेव्हां तीच सुख व पुण्यहि तीच. " हें वर्णन यथार्थ असल्याची साक्ष पुरविणाऱ्या कितीतरी स्त्रियांची चरित्रें पुराणांतून ठायीं ठायीं विखुरलेलीं आहेत. त्या सर्वांचा थोडक्यांत परिचय मी या लेखांत करून देणार आहे. प्रत्येकीचें चरित्र स्वतंत्रपणें सांगायचें तर आधींच विस्तृत झालेल्या या विषयाचा विस्तार मर्यादेबाहेर जाईल म्हणून त्यांचें वैशिष्ट्य पाहूं.

*                    *                    *

मार्कण्डेय पुराणांतील **शाण्डीली** ही प्रतिष्ठानपुराणांतील कौशिक ब्राह्मणाची पत्नी. सर्व प्रकारांनीं पतीची सेवा करून त्याला संतुष्ट राखणें हेंच हिचें जीवन-ध्येय. घृणास्पद रोगानें पछाडलेल्या पतीची सेवाशुश्रुषा ती स्वहस्ते करी. पण तो रागीट पती तिला निष्ठुरतेनें वागवी. हालचाल करण्याचेंहि सामर्थ्य नसणाऱ्या या माणसाला वेश्यागमनाची इच्छा झाली. ' मला सामर्थ्य नाहीं, तूंच मला

वेश्येकडे नेऊन पोहोंचव" ही त्याची आज्ञा प्रमाण मानून त्याला खांद्यावर घेऊन शाण्डीली निघाली.

अंधारांत सुळावर चढलेल्या मातंग ऋषींना त्याचा पाय लागला. वेदनांनीं विव्हल होऊन त्यांनीं शाप दिला—"सूर्योदय होतांच तुला मृत्यु प्राप्त होईल."

**तस्य भार्या ततः श्रुत्वा तं शापमति दारुणम् ।**
**प्रोवाच व्यथिता सूर्यो नैवोदयमुपैष्यति ॥**

शाप ऐकून शाण्डीली दुःखी झाली व निश्चयपूर्वक उत्तरली–असें असेल तर सूर्यच उगवूं शकणार नाहीं." सतीची वाणी खरी ठरली. सूर्यादर्शाच्या अभावीं सारीं धर्मकृत्यें बंद पडलीं. जगाचा व्यवहारच खुंटला तेव्हां देवांनीं सती अनसूयेला प्रसन्न करून तिजकडून शाण्डीलीची समजूत काढली. अनसूयेच्या आवाहनानें शाण्डीलीनें थोपवून धरलेला सूर्य उदयाचलावर येतांच शापानुसार कौशिक मरण पावला, पण आपल्या पातिव्रत्यप्रभावानें अनसूयेनें त्याला संजीवन दिलें. ब्राह्मण जिवंत तर झालाच पण तरुण व रोगमुक्तहि झाला.

देवांना संतुष्ट करून पतीचे प्राण परत मिळविणारी सती **बेहुला** ही सावित्रीची भगिनीच शोभेल. हिचा पति लक्षींद्र हा सर्प दंशानें मरण पावला. "साप चावून मेलेल्या माणसाचें प्रेत जाळीत नाहींत" असें सांगून ही तें शव घेऊन केळीच्या झाडापासून बनविलेल्या नावेवर चढली. "पतीला जिवंत करीन तेव्हांच परत येईन" असें साऱ्यांना सांगून ती निघाली.

सतत सहा महिने ती अन्नपाण्यावांचून तरंगत होती. निष्प्राण देहांत किडे पडले. मांस कुंजून झडून गेलें. उरलेला अस्थिपंजर हृदयाशीं धरून शांतपणें बेहुला तरंगत होती. मनसा देवीनें तिला दर्शन दिलें. "देवलोकीं येऊन नृत्यगायनानें देवांना संतुष्ट करशील तर तुझा पति पुन्हां जिवंत होईल." हें तिचें सांगणें ऐकतांच पतीचा अस्थिपंजर हृदयाशीं धरून बेहुला देवलोकीं गेली. नृत्यगायनानें देवांना संतुष्ट करून तिनें त्यांच्याकडून पतीचे प्राण परत मिळविले.

दुराचारी, व्यसनी पतीचीहि मनःपूर्वक सेवा करणारी **कान्तिमति** पतीला प्रिय म्हणून पतीबरोबर वेश्येचीहि सेवा करी. अखेर दुराचरणानें ब्राह्मण व्याधिग्रस्त

झाला. सारे आप्तेष्ट–वेश्यासुद्धां–त्याला सोडून गेल्यानंतर एकटी कांतिमतीच निर्धन स्थैंनी पतीला सुखविण्यासाठीं धडपडूं लागली. महर्षीं देवलांचा सत्कार करून त्यांचें पवित्र चरणोदक तिनें पतीच्या अंगावर शिंपडलें. पण पतीचा आजार कमी होण्या-ऐवजीं वाढतच चालला होता. हें पाहून ती औषध घेऊन आली. पण तोपर्यंत त्याची दांतखिळ बसली होती. दांतखीळ उघडून औषध तोंडांत घालण्याचा प्रयत्न तिनें करून पाहिला पण तिचें बोट तुटून त्याच्या तोंडांत जाण्यापलिकडे त्याचा कांहींच उपयोग झाला नाहीं. पति मरण पावला. कांतिमति सती गेली.

विजय राजाची कन्या **भोगवती** अत्यंत लावण्यवती होती. राजाचा मंत्री व पुरोहित नागराजाला वश झाला. त्याचा पुत्र शूरसेन याच्या कुरूपपणाची वार्ता गुप्त ठेऊन त्यांनीं त्याच्याशीं राजकन्येचा विवाह ठरविला. फसगत होऊन राजानें त्याला मान्यता दिली. ठरलेला विवाह मोडायचा कसा म्हणून तो पारहि पडला. सासूसासऱ्यांनीं सून पाहिली मात्र. आपल्या कृत्याची त्यांची त्यांनाच लाज वाटूं लागली. या लावण्यवतीला आपल्या कुरूप पुत्रापासून दूर दूर ठेवण्याचाच त्यांनीं निश्चय केला. भोगवतीला याचें ज्ञानहि नव्हतें.

पतीच्या दर्शनाची इच्छा अनावर होऊन तिनें त्याला निरोप धाडला, पण त्याची दखल घेतली गेली नाहीं, म्हणून ती स्वतःच त्याच्याकडे आली. पण आईच्या शिकवणुकीमुळें त्यानें तिचा धिःक्कार केला. तिकडे दुर्लक्ष करून तिनें त्याची चरणसेवा आरंभली आणि यानंतर रोजच असें घडूं लागलें. तिच्या सेवेनें आणि विनीत वृत्तीनें शूरसेन संतुष्ट झाला. " मी कुरूप, भेसूर आहे. मला पाहून तुला भीति वाटत नाहीं कां ? असें त्यानें भोगवतीला विचारलें. ती हंसून उत्तरली, "शाळीग्राम शिळेंत-केवळ काळ्या दगडांत–सुद्धां भक्ताला प्रभूची परमसुंदर प्रतिमा पाहतां येते. आपण माझे पतिदेव आहां. मला आपण कुरूप भासत नाहीं. मला आपणापासून कसलें भय ?" या उत्तरानें संतुष्ट झालेला शूरसेन पत्नीवर मनापासून प्रेम करूं लागला. पुढें गोदावरीच्या स्नानानें कुरूपपणा जाऊन तो सुंदर बनला.

काशीपुरांतील कुकल वैश्याची **सुकला** नांवाची पत्नी अशीच साध्वी होती. तिला बरोबर न घेतां वैश्य एकटाच तीर्थयात्रेला गेला होता. पतीच्या विरहानें व्याकुळ होऊन सुकलेनें तीव्र व्रत स्वीकारलें. परीक्षा घेण्यासाठीं आलेल्या इंद्रकाम, रति व

प्रीति यांनाहि तिनें दाद दिली नाहीं. अनुन करूं पहाणाऱ्या इंद्राला तिनें बजावलें–

**अहं रक्षापरा नित्यं दमशांतिपरायणा ।**

**न मां जेतुं समर्थश्च अपि साक्षाच्छचीपतिः ॥**

" शांति क्षमा आणि सत्य यांच्यामुळें मी सदा संरक्षित आहे. धर्म माझा रक्षक आहे. साक्षात् इंद्रहि मला जिंकण्यास समर्थ नाहीं."

तीर्थयात्रेहून आलेल्या कृकल वैश्याला देवदूतानें सांगितलें– " साध्वी पत्नीला कष्ट देऊन, तिच्या वांचून केलेलें पुण्यकृत्य सफल होत नाहीं. तूं निघून गेल्यानें एकटीच राहून तुझी पत्नी दुःखी झाल्यामुळें तुझी तीर्थयात्रा फुकट गेली आहे."

पार्वतीनें शंकरांच्या प्राप्तीसाठीं जसें तीव्र तप आचरलें, तसेंच तप भारद्वाजांची कन्या **श्रुतावती** हिनें इंद्राच्या प्राप्तीसाठीं आरंभिलें. हें तप पाहून संतुष्ट झालेला इंद्र तिची परीक्षा घेण्यासाठीं वसिष्ठांचें रूप घेऊन अतिथि म्हणून तिच्या आश्रमांत आला. " हीं बोरें मला शिजवून दे. हें त्याचें सांगणें ऐकून श्रुतावती त्या उद्योगाला लागली. सकाळपासून संध्याकाळपर्यंत सरपण जमवून तिनें सारखा जाळ लावला तरी बोरें जशींच्यातशींच. अंधार पडला. सरपण संपलें. विस्तवहि विझत आला. पण बोरें शिजेनात. अखेर विस्तव टिकविण्यासाठीं श्रुतावतीनें आपले पायच चुलींत घातले. या सरपणानें मात्र तीं विचित्र बोरें तावडतोब शिजलीं. पाय जळून गेल्यानें उठणें शक्य नसल्यामुळें श्रुतावतीनें अतिथीलाच हांक मारली. पहाते तो समोर साक्षात् इंद्र उभा. " तुझें तप पाहून मी संतुष्ट झालो आहे. मी तुझा स्वीकार करीन." असें त्यानें आश्वासन दिलें. श्रुतावतीनें पुलोम्याच्या पोटीं पुनर्जन्म घेतला.

ताम्रलिप्तीच्या मणिभद्राची पत्नी चतुर **देवस्मिता** हिनें आपल्या बुद्धिबलानें सतीत्वाचा नाश करूं पाहणाऱ्या दुष्टांना चांगलीच अद्दल घडवली. व्यापारानिमित्त कटाह नगरींत गेलेल्या मणिभद्राशीं दुर्जनांची गांठ पडली. त्यांनीं केलेली स्त्रीजातीची निंदा त्याला असह्य झाली. स्वतःच्या पत्नीबद्दल अभिमानदर्शक उद्गार काढून त्यानें त्यांना विरोध केला. तिचें सतीत्व नष्ट करण्याची पैज मारुन ते सर्वजण निघाले. बुद्ध मठांत उतरून एका वृद्ध बौद्ध संन्यासिनीला वश करून घेऊन त्यांनीं आपलें जाळें पसरलें.

धार्मिकतेचें सोंग करून देवस्मितेचा विश्वास संपादन केल्यानंतर एक दिवस कुंटिणीनें आपलें खरें स्वरूप प्रगट केलें. व विचारलें. "चार तरुण तुझ्या भेटीची इच्छा धरून आहेत त्यांना केव्हां आणूं सांग." देवस्मिता चमकली. पण तसें न दर्शवतां तिनें भेटीचा संकेत ठरविला.

रात्र झाली. रंगांत आलेले ते दुष्ट विजयी वृत्तीनें घरांत शिरले मात्र, अंधारांत लपलेल्या दासींनीं त्यांच्या डोक्यावर तप्त सळ्यांनीं डाग दिले. फजित होऊन त्यांनीं पळ काढताच पुरुष वेषधारी देवस्मितेनें त्यांचा पाठलाग आरंभिला. त्यांच्या मागोमाग तीहि नगरांत आली. पतीच्या शेजारी इतमामानें राहूं लागली. अल्पावधींत तिनें चांगलाच लौकिक मिळविला.

एक दिवस तिनें राजाकडे मागणी केली-'माझे चार गुलाम नाहींसे झाले आहेत ते मला शोधून द्या.' राजानें तशी परवानगी दिली. भर दरबारांत मानकरी म्हणून मिरवणाऱ्या दुष्टांची तिनें मागणी केली. चकीत होऊन राजानें विचारलें— 'हे तुझे गुलाम कसे?' शिरोभूषणें काढवून तिनें डोक्यावरील खुणा राजाला दाखविल्या. दुष्ट फजित झाले. मणिभद्राला पत्नीच्या सतीत्वाची नि चातुर्याचीहि खात्री पटली. तो पत्नीवर पूर्ववत् प्रेम करूं लागला. राजानें दुष्टांना शासन करून देवस्मितेची फारच प्रशंसा केली.

दधीची ऋषींची पत्नी **प्रातिथेयी,** जयदेव कवींची **पद्मावती,** 'अतुल संपत्तीवर थुंकेन पण माझ्या निर्धन पतीपासून दूर होणार नाहीं' असें पित्याला बजावणारी सती **अन्नपूर्णा,** भर्तृहरींची राणी **पिंगला,** आपल्या उपदेशानें पतीला परमहिताची प्राप्ती करून देणारी च्यवनऋषींची धर्मज्ञा विदुषी कन्या **सुमना,** अशा कितीतरी स्त्रियांचीं चारित्रें या वाङ्मयांत इतस्ततः विखुरली आहेत.

: १६ : : भागवतांतील स्त्रिया :

## देवहुति, सुनीति, रुक्मिणी वगैरे

**मा**गील दोन लेखांत आपण देवी भागवतांतील स्त्रियांची माहिती मिळवली. आतां **भागवता**कडे वळूं या. प्रारभींच कश्यपमुनींनीं आपल्या पत्नीला सांगितलेलें हें वचन पहा.

**सर्वाश्रमानुपादाय स्वाश्रमेण कलत्रवान् ।**
**व्यसनार्णवमत्येति जलयानैर्यथार्णवम् ॥**

( श्रीमन्महाभागवत स्कंध २ रा )

" एखादा खलाशी जसा नावेच्या साहाय्यानें समुद्र तरून जातो, त्याप्रमाणें गृहस्थाश्रमी पुरुष आपल्या पत्नीच्या साहाय्यानें हा संकटांनीं भरलेला संसारसागर तरून जातो. व इतरांनाहि तसें करण्यांत साह्य करतो."

अदितीच्या तपानें संतुष्ट झालेलें भगवान् विष्णू "मी तुझ्या उदरीं जन्म घेईन" असें सांगतात, तेव्हां ती विचारते—

**महापातक युक्तोऽपि यन्नामस्मृतिमात्रतः ।**
**प्रयाति मुक्तिं देवेश कथं त्वं धारयाम्यहम् ॥**

[ अष्टमस्कंध अध्याय १७ श्लोक २१ ]

" ज्याच्या केवळ स्मरणानें महापातकीसुद्धां मुक्त होतात, त्या तुला हे परम-समर्थ प्रभो ! मी कशी धारण करूं शकेन !" यावर भगवान उत्तरतात—

**पतिव्रताः पतिप्राणाः पतिभक्ति परायणाः ।**
**वहन्ति सततं बाले स्त्रियोऽपि त्यक्तमत्सरः ॥**

( अष्टम. अ. १७ श्लोक २२ )

"पतीची सेवा करणारी, पतीला प्रिय असणारी पतिव्रता स्त्री आपल्या पातिव्रत्याच्या प्रभावानें मला धारण करण्याला सदैव समर्थ असते."

स्त्रीचें सामर्थ्य, तिचा अधिकार, तिच्या पातिव्रत्याचा प्रभाव किती गौरवून सांगितला आहे इथें ! हें वर्णन यथार्थ असल्याची खात्री पटवून देणाऱ्या सीता, सुकन्या, शर्मिष्ठा, द्रौपदी येथेंहि पुन्हां भेटतील.

स्वायंभुव मनूला शतरूपेपासून झालेली कन्या **देवहुति** ही सुप्रसिद्ध षड्दर्शनांपैकीं सांख्यशास्त्र सांगणाऱ्या कपिल महामुनींची माता व महर्षी कर्दमांची पत्नी. 'अन्विच्छति पतिं युक्तं वयशीलगुणादिभि :।' असें राजा हिचें मुनींजवळ वर्णन करतो. आर्यकन्या शीलगुणांच्या चाहत्या असतात असेंच जणुं ती सांगते आहे. म्हणूनच तिनें महर्षि कर्दमांना वरलें.

पतीला परमेश्वर मानून तिनें त्यांची सेवा आरंभली. आपल्या सेवेनें सौजन्यानें, संयमानें, मधुर भाषणानें, पावित्र्यानें, विनीतवृत्तीनें व सुस्वभावानें तिनें त्या तपोधन ऋषींना परम संतुष्ट केलें. 'सिद्धासि भुंक्ष्व विभवान् निजधर्मदोहान्' म्हणून त्यांनीं तिला आपल्या तपःप्रभावानें दिव्य भोगांची प्राप्ती करून दिली. त्यांच्या संगतींत सुखभोग भोगीत असतां तिला नऊ कन्या झाल्या.

"मुलींचे विवाह होऊन त्या सासरीं जातील, तुम्ही पुन्हां तपस्येंत मग्न व्हाल. अशावेळीं मला तत्त्वज्ञानाचा बोध करून देणारें कुणी असेल कां ?" असें ती विचारते. यावर तिला पुत्रप्राप्तीचें आश्वासन देऊन ऋषी सांगतात, "हा पुत्रच तुझी तत्वजिज्ञासा पुरी करील." हें ऐकून तिला आनंद वाटतो. पुत्र ज्ञानी होतांच ती त्याच्याकडून ब्रह्मज्ञानाची प्राप्ती करून घेते. प्रपंचाइतकींच परमार्थाचीहि आवड असणारी ही तपस्विनी, 'केवळ संसार हेंच स्त्री–जन्माचें साफल्य नव्हे,' हेंच सिद्ध करीत नाहीं कां ?

दक्षकन्या **सती** ही शंकरांची प्रियपत्नी. पित्यानें आरंभलेला यज्ञ पाहण्यासाठीं, नातलगांना भेटण्यासाठीं, निमंत्रण नसूनहि मोहरच्या ओढीनें ती दक्षाच्या यज्ञस्थानीं आली. पण पित्यानें तिचें स्वागतसुद्धां केलें नाहीं. यज्ञांत शंकरांना हविर्भाग दिला नाहीं हें पहातांच पतीच्या अपमानानें सती संतप्त झाली. शंकरांशीं द्रोह करणारा दक्षच आपला पिता आहे या गोष्टीची तिला खंत वाटली, त्याच्याशीं संबंध दर्शविणारें दयाक्षणी हें आपलें नांव व त्याच्यापासून प्राप्त झालेला देह दोन्हीहि तिला अपवित्र, अमंगल व अप्रिय वाटूं लागली. योग-साधनेनें

अग्नी प्रज्वलित करून तत्क्षणींच तिनें स्वतःला जाळून घेतलें.

—सावत्र आईनें पित्याच्या मांडीवरून ढकलून दिलें म्हणून अपमानित होऊन आलेल्या ध्रुवबालकाला 'आराधयाऽधोक्षजपादपद्म'. ईश्वराच्या चरणकमलांचीच आराधना कर 'तमेव वत्साश्रय भृत्यवत्सलम्' 'त्या भक्तवत्सल प्रभूलाच तूं शरण जा' असें सांगणारी **सुनीति** माता !

—अत्यंत सुकुमार असूनहि पतिमागोमाग वनांत येऊन नैष्ठीक कर्मे आचरींत कंदमुळावर उपजीविका करणारी व अखेर पतीबरोबर सहगमन करणारी पृथुपत्नी **अर्ची**, इथेंच भेटतात.

"ज्याला तूं आज स्वप्नांत पाहशील तोच तुझा पति होईल" हा ईश्वरी आदेश ऐकल्यानें अनिरुद्धाचें स्वप्न-दर्शन होतांच त्यावर अनुरक्त होणारी बाणकन्या **उषा** यांतच दिसतें. आपला हा प्रियकर कोण, कुठला हेंहि तिला माहित नव्हतें पण तरीहि त्याच्या प्राप्तीसाठीं ती अतिशय आतुर झाली होती. अशा वेळीं आपल्या या विरह–व्याकुल सखीच्या साहाय्याला धांवून येणारी चतुर चित्रलेखा, आपल्या कुशल कुंचलीनें सारें त्रिभुवन उषेसमोर उभें करते किती अलौकिक कलाचातुरी ही !

श्रीकृष्णाचे गुणगान ऐकून त्याच्यावर अनुरक्त झालेली ही **रुक्मिणी** ! श्रीकृष्णाशीं आपला विवाह व्हावा ही तिची इच्छा. पण भावानें वडिलांचें मन वळवून तिचा शिशुपालाशीं विवाह ठरविला. एकावर प्रेम नि एकाशीं विवाह असल्या पेंचांत पडतांच सुदेव ब्राम्हणाच्या हातीं प्रियकराला प्रेमपत्र धाडण्याचें साहस हिनेंच केलें.

"त्वय्यच्युता विशति चित्तमपत्रप मे।' माझें मन तुझ्यावर जडलें आहे. तुझ्याशिवाय कुणालाहि मी वरणार नाहीं. माझें हृदय मी तुला अर्पण केलें असूनहि शिशुपालाशीं माझा विवाह ठरला आहे, म्हणून त्वरित ये, मला या संकटांतून सोडव व आपल्याबरोबर घेऊन जा, असें ती स्पष्टपणें लिहिते.

—'मां राक्षसेन विधिनोद्वह वीर्यशुल्काम्'—राक्षसविवाह विधीनें तूं माझें पाणीग्रहण कर असें ती सुचवते. व अखेर

**यर्ह्यम्बुजाक्ष न लभेय भवत्प्रसादम्।**
**जह्यामसून्व्रतकृशान्शतजन्मभिस्यात्॥ ४३॥**

"जर तूं प्रसन्न होऊन कृपा केली नाहींस तर तीव्र तपाचरणानें मी प्राण-त्याग, करीन" हा निर्धारहि व्यक्त करते.

भगवान कृष्णावर अनुरक्त झालेली...



...निश्चयी रुक्मिणी

प्रीतीच्या पावित्र्य-रक्षणासाठीं आर्यकन्या प्राणांचाहि त्याग करील पण प्रीतीची पायमल्ली मात्र कधींहि होऊं देणार नाहीं.

९५३५६
८।२।५८



## सती वैशालिनी

**भारतीय** स्त्रीच्या गुणविशेषांचा आणखी एक महान् आदर्श म्हणजे विदिशा नगरीचा राजा विशाल याची कन्या **वैशालिनी**. स्वयंवरासाठीं जमलेल्या राजामधून तिनें करंधमाचा पुत्र **अविक्षित** याला वरलें, पण त्याच्या शौर्याची परीक्षा पाहण्यासाठीं क्षणभर तेथेंच थबकून वरमाला न घालतांच ती मंडपांतून निघून गेली. जमलेल्या सर्वांनीं त्याच्याशी युद्ध आरंभलें. अनेकांशीं एकट्यानें युद्ध करीत असतां निःशस्त्र अवस्थेंत त्याला अटक करण्यांत आली. आणि 'प्रकृति ठीक नाहीं' असें सांगून वैशालिनीनें आपलें स्वयंवर रहित केलें.

पुत्राच्या अटकेची वार्ता कळतांच करंधम स्वतः सैन्य घेऊन आला. विदिशा नरेशाचा पराभव करून त्यानें अविक्षिताची सुटका केली. विशालानें दोघांचाहि सत्कार केला व विवाहाचें बोलणें काढलें. पण, "राजकन्येसमोर मी पराभूत होऊन बंदींत पडलो. माझ्या शौर्याला कमीपणा आला, तेव्हां मी तिच्याशीं विवाह करणार नाहीं" असें अविक्षितानें सांगितलें. वैशालिनी व विशाल यांनीं त्याला समजवण्याचा प्रयत्न केला, पण तो ऐकेना. राजकन्येची निराशा झाली. तिला जीवन व्यर्थ वाटूं लागलें. महाप्रयासानें पित्याची परवानगी मिळवून ती तपस्येसाठीं वनांत निघून गेली.

* * *

**राजा** करंधमानें पुत्राच्या विवाहाबद्दल पुन्हां प्रयत्न आरंभले पण वैशालिनीनें त्याला वरलें होतें याची अविक्षिताला जाणीव होती. त्याचें तिच्यावर प्रेम असल्यानें त्यानें विवाह करण्यास नकार दिला. त्याला कसें वळवावें हाच सर्वांना प्रश्न पडला. राणीनें युक्ति केली. पुत्र अविक्षिताजवळ तिनें किमिच्छक व्रत करण्याची इच्छा दर्शवली. हें व्रत म्हणजे याचकाची कोणतीहि इच्छा पुरी करणें. हें करण्याची अविक्षितानें कबुली दिली. त्याला भेटलेला पहिलाच याचक राजा करंधम. त्यानें

पौत्रमुख पाहण्याची इच्छा व्यक्त केली. अविक्षित उमजला. तो पेंचांत पडला. " वैशालिनीशिवाय कुणाशींच मी लग्न करणार नाहीं. " हें आपलें मनोगत अखेर त्यानें व्यक्त केलें. विशालीकडे संदेश धाडण्यांत आला. वैशालिनीचा शोध सुरुं झाला.

तपस्विनी वैशालिनी तपाचरणानें क्षीण होत चालली होती. " देहाचा असा नाश करणें उचित नव्हे, तुझ्या गर्भापासून दानवांचा निःपात करणारा पुत्र जन्माला येणार आहे. यासाठीं तरी देहाचें रक्षण कर " अशी देवदूतानें तिची समजूत घालीत तिला देहधारणेसाठीं उद्युक्त करण्याचा प्रयत्न केला.

" छेः ! हें कसें शक्य होईल ? ज्यांना मी माझें हृदय अर्पण केलें ते माझा स्वीकार करण्याला उत्सुक नाहींत, मग हें घडणार कसें ? " वैशालिनीनें साशंकता दर्शवली. " ईश्वरी लीला अगाध आहे, तिच्यावर विश्वास ठेव आणि देहाचा नाश करूं नकोस, " देवदूतानें पुन्हां बजाबलें. शरीरपोषणासाठीं आहार घेण्यास तिनें प्रारंभ केला.

*                *                *

वैशालिनीच्या पोटीं दानवांचा निःपात करणारा पुत्र जन्म घेणार असल्याची वार्ता ऐकून दृढकेश दानव तिचा शोध करीत आश्रमांत शिरला. " तुझा पुत्र दानवांचा नाश करणार तेव्हां तुलाच मी ठार मारतो " हे त्याचे उद्‌गार ऐकतांच वैशालिनीनें सुटकेसाठीं सहाय्यार्थ आरोळी ठोकली. शिकारीसाठीं याचवेळीं अविक्षित त्या वनांत हिंडत होता. ते दृश्य पाहून, संकटग्रस्त स्त्रीची सुटका करण्यासाठीं तो त्वरेनें धांवून आला. दृढकेश मरण पावला. वैशालिनीची सुटका झाली. " राजा ! या स्त्रीशीं विवाह कर. हिच्या पोटीं चक्रवर्ती पुत्र जन्मून दानवांचा निःपात करील, " असा देवतांनीं वर दिला.

राजा गोंधळला. वैशालिनीला ओळखलें नसल्यानें त्यानें आपल्या प्रतिज्ञेचा पुनरुच्चार केला. हर्षित झालेल्या वैशालिनीनें उत्तर दिलें, "नाथ, मीच वैशालिनी. आतां तरी मला या चरणांपासून दूर लोटूं नका." आणि तिनें त्याचें चरण घट्ट धरलें

याच वेळीं 'प्रथ' गंधर्व विमानांतून त्या ठिकाणीं आला. " राजकुमार ! ही माझी कन्या भामिनी ! अगस्तीच्या शापानें ती मानव योनींत जन्माला आली. आज तो शाप संपला आहे. मी आनंदानें ही कन्या आपल्या स्वाधीन करतो, तिचा प्रेमानें

स्वीकार करा." त्याची ही विनंति तात्काळ मान्य झाली. संतोषपूर्वक अविक्षितानें वैशालिनीचें पाणीग्रहण केलें. नव-दंपत्ति गंधर्वलोकीं गेली व विलास विहार करूं लागली.

**आश्रमांत एकाकी राहून तपःसाधना करणारी....**



**...निग्रही वैशालिनी**

दोन वर्षांनीं अयोध्येचा राजा करंधम चिंतेंत व्यग्र असतां दूतांनीं वार्ता आणली. "कुमार अविक्षित पत्नी व पुत्रासह भेटीला आले आहेत" त्यांची

भेट झाली. करंधमानें पौत्रमुख पाहिलें. त्याची इच्छा पूर्ण झाली. राणीचें किमिच्छक व्रत सिद्धीला गेलें. वैशालिनीची तपस्या सफल झाली. आपल्या सद्‌गुणांनीं व सद्वर्तनानें अल्पावधींतच ती सर्वांना फार प्रिय झाली.

* * *

निष्ठा, पावित्र्य, प्रेम हेंच या सतीचें सामर्थ्य. पातिव्रत्याच्या पालनासाठीं पतीच्या मृत्युनंतर जीवन असह्य होऊन त्या सहगमन करून स्वतःला जिवंत जाळून घेत असत. हीच सतीत्वाची परंपरा !

सतीत्वाची हीच तेजस्वी परंपरा पावित्र्याच्या रक्षणासाठीं जोहार करणाऱ्या रजपूत रमणींनीं पुढें चालवली. याच तेजस्वी परंपरेंत वाढलेल्या मर्द मराठ्यांच्या महिलांनीं मुसलमानांच्या अत्याचारांतूनहि स्वतःचें शील सुरक्षित राखलें. पेशव्यांच्या कालांतहि अनेकांनीं ही प्रथा पाळली. स्वतःला सुधारणेचे पुरस्कर्ते मानणाऱ्या इंग्रजांच्या आमदानींत सती जाण्याची कल्पना रानटी ठरवून त्याला बंदी करण्यांत आली असली तरीहि यामागील भूमिका जाणणाऱ्या कित्येक स्त्रियांनीं कायदा मोडूनहि सतीत्वाचें वाण घेतलेलें दिसतें. १९४६ सालीसुद्धां एका सतीनें पतीबरोबर सहगमन केलेलें आहे. हें वाचलें म्हणजे ही परंपरा अजूनहि कायम आहे याबद्दल खात्री पटते. विवाह, घटस्फोट, याबद्दलच्या नव्या कल्पना समाजांत मूळ धरून राहणें यामुळेंच कठीण आहे. या तेजस्वी परंपरेच्या विरुद्ध असणारी, भारतीय स्त्रीच्या सतीत्वाचें उच्चाटन करूं पाहणारी कोणतीहि सुधारणा भारतानें निकरानें हाणून पाडली पाहिजे हाच या समर्थ स्त्रियांचा संदेश. पाकिस्तानच्या निर्मितीनंतर अपहरण झालें असतां शेंकडो स्त्रियांनीं आपलें देह गंगार्पण केले व आपली परंपरा अविच्छिन्न राखली ती याचसाठीं ! सद्‌गुणांचा नाश करण्याचें सामर्थ्य जगांतील कोणत्याहि कायद्याला, साम्राज्याला वा सत्तेला नसतें. सत्याचा नाश करूं पहाणारेच अखेर नष्ट होतात हाच इतिहासाचा दाखला व हीच पुराणांचीहि साक्ष !

## : १८ : : शिवपुराणांतील स्त्रिया :

### सीमंतिनी, घुश्मा व मदालसा

**सती सीमंतिनी !** ‘ चौदाव्या वर्षी हिला वैधव्य येईल.’ अशी भविष्यवाणी होती. हें ऐकतांच सीमंतिनी समर्थ मैत्रेयीला शरण गेली. ‘ आतां आपणच मला वांचवा ’ म्हणून तिनें मैत्रेयीची करुणा भाकली. “ चिंता करूं नकोस. सारें ठीक होईल.” असें आश्वासन देऊन मैत्रेयीनें तिला पंचाक्षरी शिवमंत्राचा उपदेश दिला. या मंत्राचा जप व सोमवारचें व्रत करण्यास सांगितलें. “ कोणतेंहि संकट आलें तरी व्रत सोडूं नकोस.” हा तिचा आदेश सीमंतिनीनें तंतोतंत पाळला. पति एकाएकीं नाहींसा झाला. वैधव्याची शंका मनांत डोकावूं लागली. पण हें दुःख सोसूनहि श्रद्धापूर्वक तिनें आपलें व्रत अखंडपणें पुढें चालविलें. अखेर या व्रताच्या प्रभावानें संकट टळलें व तिचा नष्ट झालेला पति पुन्हां परत आला. हातीं घेतलेलें कार्य कसल्याहि संकटाला न जुमानतां नि कोणत्याहि दुःखानें खचून न जातां पूर्णतेला नेण्याचा हा निर्धार वाखाणण्याजोगा आहे खास.

“ मला पूजेचा विधी सांगा म्हणजे मीच या पिंडीची आराधना करीन ” असें विचारणाऱ्या भाबड्या **चंड** भिल्लाला “ अरे ! हें विधान काय इतकें सोपें आहे ? शंकरांच्या पूजेसाठीं रोज ताजें चिताभस्म मिळवावें लागतें.” असें थट्टेचें उत्तर देऊन राजा निघून गेला. भिल्लाला हें सांगणें खरें वाटलें. रोज स्मशानांतून ताजें चिता-भस्म आणून तो शंकराची पूजा करूं लागला.

पण एक दिवस मोठीच अडचण उत्पन्न झाली. चंड भिल्लानें पुष्कळ प्रयत्न केला पण त्याला नवी चिता आढळली नाहीं. पूजेला ताजें चिताभस्म मिळालें नाहीं. काय करावें हेंच त्याला कळेना. पतीच्या नियमांत खंड पडूं नये, ईश्वराचें पूजन राहूं नये म्हणून त्याच्या साध्वी पत्नीनें जिवंतपणीं स्वतःचीच चिता रचली. व त्याच्या चिता–भस्माची सोय लावली. ‘ भोळा भाव, सिद्धीस जाय ’ म्हणतात तसेंच झालें.

भाबड्या भक्ताच्या या दृढ भावनेनें भगवान् संतुष्ट झालें. चितेंत जळून भस्म झालेली चंड भिल्लाची पत्नी हांकेसरशी प्रसाद घेण्यासाठीं त्याच्यापुढें येऊन उभी राहिली.

शिवभक्ता **घुश्मा** ! देवगिरीनजीक राहणाऱ्या सुधर्मा ब्राह्मणाची ही द्वितीय पत्नी. पहिली पत्नी सुदेहा हिला मूल होत नव्हतें. अपत्यप्राप्तीसाठीं दुसरा विवाह करण्याबद्दल तिनें पतीला आग्रह चालवला. आपली धाकटी बहीण घुश्मा हिची वारंवार स्तुति करून तिनें पतीचें मन वळवलें व तिला आपली सवत करून घेतली.

घुश्मा ही सुशीला व धर्मपरायणा स्त्री होती. भक्तिपूर्वक ती शंकराची उपासना करी. दोघी बहिणी प्रेमानें राहात. पण घुश्मा पुत्रवती होतांच पतीचें तिजवरील प्रेम वाढीला लागलें. सुदेहाकडील त्याचा ओढा कमी कमी होऊं लागला. त्यामुळें हें प्रेम संपुष्टांत आलें. सुदेहा धाकट्या बहिणीचा द्वेष करूं लागली.

मुलगा वयांत आला. त्याचा विवाहहि झाला. बहिणीचा हा उत्कर्ष सुदेहाला सहन होईना. सून कामांत व बहिण पूजनांत गुंतल्याची संधि साधून तिनें झोपलेल्या सावत्र मुलाला ठार मारलें व सरोवरांत सोडून दिलें.

पार्थिव पूजा संपतांच तिचें विसर्जन करण्यासाठीं घुश्मा सरोवरावर आली. पूजा विसर्जित करून ती परत फिरणार तोंच मृत पुत्र जिवंत होऊन बाहेर आला. व त्यानें सर्व हकिकत तिला सांगितली. " सुदेहा तुझी माता आहे. तिला क्षमा कर व ही गोष्ट कुणालाहि सांगूं नकोस. ' असें सांगून ती पुत्रासह घरीं परत निघाली.

इतक्यांत शंकर तेथें प्रकट झाले. ' तूं बहिणीला क्षमा केली असलीस तरी मी मात्र तिला क्षमा करणार नाहीं." हे प्रभूचें उद्‌गार ऐकतांच घुश्मानें त्याची प्रार्थना करून बहिणीसाठीं स्वतःच क्षमायाचना केली. तिच्या या वृत्तीनें संतुष्ट होऊन शंकरांनीं तिला वरदान मागण्यास सांगितलें. " आपली पूजा करणारा निष्पाप होऊन शिवलोकीं जावो " हीच इच्छा त्या निष्काम श्रद्धामयीनें व्यक्त केली. हें स्थान म्हणजेच दौलताबादेपासून सहा मैलावर असणारें प्रसिद्ध घुमेश्वर क्षेत्र !

पुत्राचा घात करणाऱ्या भगिनीबद्दलहि प्रेमभावना बाळगणारी घुश्मा ' शिव होऊनि शिव यजिजे प्रथम स्वतः पवित्र व्हा नि मगच परमपवित्र प्रभूला आळवा ' हेंच तत्त्व आचरून दाखवीत नाहीं कां ?

ही ब्रह्मवादिनी **मदालसा !** विदुषी, माता, सती–सर्वच दृष्टींनीं ती आदर्श-भूत आहे. विश्वावसु गंधर्वाची ही कन्या. पाताळकेतूनें तिला पळवून नेलें असतां ती आत्मघाताला प्रवृत्त झाली. पण ' याच्यापासून तुला भय नाहीं, याला मारणाराशींच तुझा विवाह होईल.' असें सांगून कामधेनूनें तिला आत्मघातापासून परावृत्त केलें.

' राजा शत्रुजिताचा पुत्र ऋतुध्वज ' कुवलय ' अश्वावर बसून पातालकेतूला ठार करील ' ही आकाशवाणी ऐकून गालव मुनी घोडा घेऊन राजाकडे आले व त्यांनीं पुत्राची मागणी केली. घोड्यावर बसून राजकुमार निघाला. त्यानें सोडलेला बाण पातालकेतूला लागतांच तो पाताळांत निघून गेला. पाठलाग करीत ऋतुध्वजहि त्याच्या मागोमाग तेथें आला. पण पातालकेतुऐवजीं त्यानें पळवून आणलेली ही गंधर्वकन्याच त्याच्या दृष्टीस पडली. दोघें परस्परानुरक्त झाली. चतुर सखी कुण्डला हिनें त्यांचा परिचय करून दिला. तिच्याच चातुर्यानें दोघांचा विवाह झाला. मदाल-सेला घेऊन ऋतुध्वज राजधानीला परत आला.

ब्राह्मणांच्या रक्षणार्थ गेलेल्या ऋतुध्वजाची पातालकेतूचा भाऊ तालकेतु यानें कपटवेषानें गांठ घेतली. गरीब याज्ञिक बनून ब्राह्मणांना दक्षिणा देण्यासाठीं त्यानें त्याच्या गळ्यांतील अलंकार मागून घेतले व राजधानींत जाऊन त्याच्या मृत्यूची कंडी उठवली. ही वार्ता ऐकतांच मदालसेनें प्राणत्याग केला. पण लवकरच ऋतुध्वज परत आला. मदालसेच्या मृत्यूनें दुःखी होऊन त्यानें तिच्यावाचून इतर स्त्रीच्या सहवासांत न राहण्याची प्रतिज्ञा केली.

ही प्रतिज्ञा ऐकून नागराजा अश्वतरानें तपस्या आरंभली. देवीला संतुष्ट करून त्यानें संगीत विद्या मिळवली. व त्या विद्येनें शंकराला संतुष्ट करून ' मदालसा कन्या व्हावी ' हा वर मिळवला. तत्काल त्याच्या मध्यम फणीपासून मदालसा उत्पन्न झाली. पूर्वरूपानें व पूर्व वयांत असणारी ती कन्यका पाहतांच अश्वतरानें ऋतुध्वजाला सर्व हकिकत कळवली. दोघांचा पुन्हां संयोग झाला.

या दंपतीला क्रमानें विक्रांत, सुबाहु व शत्रुदमन हे तीन पुत्र झाले. राजानें मुलाचें नांव सांगितलें कीं मदालसा हंसूं लागे. या मुलांना खेळवतां खेळवतांच तिनें ब्रह्मज्ञानाचा उपदेश केला,

**शुद्धोऽसि रे तात न तेऽस्ति नाम।**
**कृतं हि ते कल्पनयाधुनैव॥**
**पंचात्मकं देहमिदं न तेऽस्ति।**
**नैवास्य त्वं रोदिषि कस्य हेतोः॥**
**नच तेऽस्ति वृद्धिर्नच तेऽस्ति हानिः।**

—बाळा! तूं शुद्धस्वरूप आहेस. तुला ना रूप ना नामें. केवळ कल्पनेनेंच नामरूप तुझ्यावर आरोपित झालें आहे. पंचमहाभूतांपासून निर्माण झालेला हा देह तुझा नव्हे, त्यासाठीं तूं कां शोक करतोस, तूं शुद्ध स्वरूप असल्यानें तुला वृद्धि नांहीं व क्षयहि नाहीं." हें बाळकडूच तिनें त्यांना पाजल्यामुळें हीं मुलें ममत्वशून्य विरागी व ज्ञानी बनली.

चौथा पुत्र जन्मला तेव्हां राजानें सांगितलें—'मी ठेवलेल्या नांवांना तूं हंसत होतीस आतां तूंच या पुत्राचें नांव ठेव. तिनें त्याचें नांव अलर्क ठेवलें. राजानें विचारलें-' या नांवाचा अर्थ काय?'

मदालसा उत्तरली-" नांवाचा व आत्म्याचा संबंध नाहीं. तें केवळ व्यवहारासाठीं कल्पनेनें ठेवावयाचें असतें. अलर्क ही अेक संज्ञा आहे व ती निरर्थक आहे. यानंतर विक्रांत, सुबाहु, शत्रुदमन या नांवांचीहि पारमार्थिकता सिद्ध करून तिनें त्याला ब्रह्मज्ञान सांगितलें.

राजाच्या सांगण्यावरून अलर्काला वंशरक्षणासाठीं तिनें व्यवहाराचा उपदेश केला. तो मोठा पंडित, नीतिशास्त्रज्ञ व व्यवहार-निपुण झाला. प्रसंग पाहून त्यालाहि तिनें आत्मोपदेश दिला.

स्वतः ब्रह्मवादिनी होऊन पतिपुत्रांसह सर्वांचा उद्धार करणारी मदालसा एकमेवाद्वितीयच ठरेल.

योगवासिष्ठयांतील लीलावती, कर्कटी राक्षसी, चूडाला या स्त्रिया अशाच आत्मज्ञानी आहेत. मदालसेप्रमाणेंच चूडालाहि इतरांना मार्गदर्शक ठरली आहे.

## : १९ : : कांहीं भक्त स्त्रिया :

### विंध्याचली, रत्नावती, कल्याणी वगैरे

**श्रद्धा** हा भारतीय जीवनाचा एक अविभाज्य घटक आहे. सतीत्वानें भूषित झालेल्या स्त्रियांप्रमाणेंच भक्तियोगाचें आचरण करणाऱ्या श्रेष्ठ अधिकारी स्त्रियाहि भारतीय इतिहासांत कितीतरी आढळतात. यांतील कांहीं विशेषांचा परिचय आपण आतां करून घेणार आहोंत. यांतील कांहीं स्त्रिया इतिहास-कालीन आहेत, पण विषयाच्या सोयीसाठीं त्यांचाहि यांतच समावेश केला आहे.

* * *

**विंध्याचली** ही राजा बलीची धर्मपत्नी! सात्विक वृत्ति, ईश्वरावरील अद्वितीय निष्ठा व अवर्णनीय प्रभुप्रेम हींच हिचीं वैशिष्ट्यें. वामनानें कपटानें बलीचें सर्वस्व हरण केलें व अखेर आपलें तिसरें पाऊल त्याच्या मस्तकावर ठेवून त्याला पाताळांत ढकललें. पण वामन म्हणजे साक्षात् श्रीविष्णु! बळीराजाचें व विंध्याचलीचें परम-प्रिय दैवत! हें जाणून याप्रसंगींहि तिनें या कृत्याबद्दल प्रभूची स्तुति केली आहे. ती म्हणते-" प्रभो! पतीचें सर्वस्व हरण करून आपण त्यांना बंदी बनवलें हें फार छान केलें. आपणच निर्माण केलेल्या या पृथ्वीचें आपल्याला दान करण्याचा आव आणून मी मोठा दानशूर म्हणून हे गर्व धरीत होते. आज तूं आपल्या कृपेनें हा गर्व हरण केलास. व त्यांना नम्र बनवलेंस. प्रभो! या तुझ्या अनुपम दयेनें मी अत्यंत हर्षित झालें आहे"

अंबरनरेश मानसिंहाचा बंधु माधवसिंह याची पत्नी **रत्नावती**. मधुर आवाजांत सदैव प्रभूचें भजन करणाऱ्या दासीच्या संगतीनें तिलाहि भक्तीभाव आवडूं लागला. भजन-पूजन करीत ती साधुसेवेंत रंगून जाऊं लागली. तिच्या शिकवणुकीनें राजकुमारहि भगवद्भक्त बनला.

सं. क्र. ५६३८



पण राजाच्या राणीनें सामान्य स्त्रीप्रमाणें साधुसंतांची सेवा करावी हें न पटून राजा संतापला. राणीचा नाद सुटत नाहीं हें पाहून तिचा नाश करण्यासाठीं तिच्या महालांत पिंजऱ्यांत कोंडलेला सिंह सोडण्यांत आला. रत्नावती या वेळीं पूजा करीत होती. सिंहाला पाहून ती घाबरली तर नाहींच पण उलट तिच्या भावपूर्ण मनानें आनंद मानला. "प्रल्हादाचें रक्षण करणारा कृपाळू नृसिंहच आज मला दर्शन देत आहे," असें मानून उत्साहानें व प्रसन्नतेनें तिनें पूजासामग्री घेतली आणि सिंहाचें पूजन आरंभलें. त्याच्या मस्तकीं चंदन लावलें. गळ्यांत पुष्पमाला घातली. त्याला नैवेद्यहि समर्पण केला. सारी पूजा संपली. व महालांतून बाहेर पडून महालांत सोडणाऱ्या माणसाचाच सिंहानें बळी घेतला.

या घटनेनें चकित व भयभीत झालेले राजा मानसिंह व माधवसिंह तेथें आले. 'सारें राज्य तुझें आहे' असें म्हणूं लागले. "राज्य तुमचें तुम्हींच सांभाळा, प्रियतम प्रभुवांचून दुसऱ्या कोणत्याहि गोष्टीकडे मी पाहूंच शकत नाहीं" रत्नावली उत्तरली.

वात्सल्यभक्तीनें भगवान् श्यामसुंदरांना खिचडी भरवणारी **कर्माबाई**, कृष्ण-भक्तीसाठीं घरदार सोडणारी **करमैतीबाई**, भगवद्भक्त रॉकाची सोन्यालाहि धूळ समजणारी विरागी पत्नी **बॉका**, बालकृष्णाला यशोदामातेनें उखळीशीं बांधल्याची कथा ऐकून दुःखानें प्राण सोडणारी कोमलहृदय **रतिवन्ती**, भक्तीच्या जोरावर मूर्तीला सचेतन बनवून बाल-कृष्णाला स्तनपान देणारी **लीलावती**, लोकापवाद सहन करूनहि वृद्ध जर्जर साधुची सेवा करणारी कृपामयी **दयाबाई**, प्रेम, श्रद्धा, सात्विकता नि सरलता या गुणांनीं खाष्ट सासूचा हृदयपालट घडविणारी हर्षदेवाची पत्नी **हरदेवी**, पातिव्रत्य, त्याग, शील व सेवा यांनीं प्रभूला प्रसन्न करून घेऊन सासु-सासरा व पति यांचा उद्धार करणारी संत **सखु**, अल्पवयांत मोक्षाची अधिकारी झालेली ज्ञानराजांची भगिनी **मुक्ताबाई**, जात्यावर बसून गाईलेल्या ओव्यांतून पांडुरंगाचें गुणगान करणारी '**नामयाची जनी**' एकांतिक भावनेचें सामर्थ्य नि निष्ठेचें प्रचंड बल दर्शविण्याला यांतलें एकेक उदाहरणहि पुरेसें होइल.

साने गुरुजींच्या सुप्रसिद्ध गोपाळाच्या गोष्टींतील आईजटिलांची श्रद्धामूर्ति माता **कल्याणी**-वनलक्ष्मी या नांवानें लोक तिला ओळखत. एकुलत्या एका बाळाला

घेऊन ही विधवा स्त्री एकटीच रानांत राहात होती. " आई! तुझ्याशिवाय मला कुणीच नाहीं कां ग? वर्गातील मुलें मला विचारतात, त्यांना भाऊसुद्धां आहे!" असें विचारणाऱ्या भोळ्या बालकाला 'तुलासुद्धां भाऊ आहे, जेव्हां जेव्हां तुला भय वाटेल तेव्हां तेव्हां मनापासून तूं हांक मार म्हणजे तुझा दीनबंधु भैय्या येईल व तुला सोबत करील" असें उत्तर तिनें दृढ विश्वासानें दिलें होतें. भक्तवत्सल प्रभूनेंहि या छोटया भक्ताचा अंगिकार करून या भोळ्या भावाचे लळे पुरवले होते, त्याला सोबतहि केली होती. आपल्या मुलाबरोबरच बालरूपधारी प्रभुलाहि मांडीवर बसवून घेण्याचें भाग्य या श्रद्धामयीनें अनुभवलें.

भक्त दामोदराची धर्मपत्नी आतिथ्यशील व धार्मिक होती. दारीं आलेल्या अतिथींचा सत्कार करण्याइतकी सामुग्री घरांत नव्हती म्हणून आपले लांबसडक सुंदर केस कापून त्यांची दोरी वळून ती विकून तिनें पतीकडून सामुग्री आणवली व अतिथींचा संतोषपूर्वक सत्कार केला. हें प्रेम पाहून 'सति तुला प्रणाम असोत' म्हणून प्रभूनें धन्यतापूर्वक उद्गार काढले.

* * *

**संत** तुलसादासांचें पत्नी **रत्नावली**वर फारच प्रेम होतें. तिच्यावांचून त्यांना क्षणभरहि करमत नसे. माहेरीं गेलेल्या पत्नीला भेटण्यासाठीं ते इतके अधीर झाले होते कीं खिडकींतून लोंबणाऱ्या सर्पाचीच दोरी करून ते वर चढले. ही आत्यंतिक ओढ पाहून रत्नावली एवढेंच म्हणाली, 'या हाडा मांसाच्या गोळ्यावर इतकें प्रेम केलेंत तेंच जर प्रभु रामचंद्रावर केलेंत तर उभयकुलांना साकेत-लोकीं पोहोंचवाल' झालें. क्षणभर चमकणारी वीज गगनाला उजळून टाकते ना! पत्नीच्या या उद्गारांनीं पतीचें मनहि उजळलें गेलें. आसक्तींतून भक्ति उद्भवली. तितकीच उत्कट, असीम आणि उज्ज्वल!

अंबरीषाच्या भगवद्भक्तीवर राजकन्या लुब्ध झाली होती. राजानें अंबरीषाला पत्रें लिहून कन्येची इच्छा कळवली. त्यानें उत्तर दिलें—राज्यकारभार व भगवद्भजन यांतून राण्यांकडे लक्ष देण्यासाठीं मला फुरसत मिळत नाहीं. शिवाय मला पुष्कळ स्त्रिया आहेत, अशा स्थितींत कुणा राजकुमारीचें नव्यानें पाणिग्रहण करणें मला

उचित दिसत नाहीं. भगवद्भक्तीनें राजाला प्राप्त झालेल्या या विरक्तीनें राजकन्या अधिकच हर्षित झाली, नकार घेऊन आलेले ब्राह्मण पुन्हा राजाकडे गेले. "पत्नी म्हणून स्त्रीकार केला नाहीं तर राजकन्या आत्मघात करील" हें कळतांच स्त्रीवधाचा दोष टाळण्यासाठीं अंबरीषानें विवाहाला मान्यता दर्शवली व आपलें खड्ग त्यांच्या-बरोबर पाठवलें. खड्गाशीं लग्न लावून राजकुमारी पतिगृहीं आली. भगवद्भक्त अंबरीषाची शांत मूर्ति दिसतांच तिनें स्वतःला कृतार्थ मानलें.

यानंतर प्रतिदिनीं राणी स्वहस्तानें राजाची पूजासामग्री सिद्ध ठेवूं लागली. स्वतःच्या हातानें प्रभु-सेवा करूं इच्छिणारा राजा यामुळें चकित झाला. हें कोण करतें याचा त्यानें छपून राहून शोध घेतला. छोटी राणी मनःपूर्वक प्रभुसेवेंत गर्क झालेली पाहून त्यानें देवाची मूर्ति तिच्या महालांत नेण्याला तिला अनुज्ञा दिली. आनंदित होऊन राणीनें ती अंमलांत आणली. राणी अहर्निश भजन, पूजन, कीर्तन यांत रंगूं लागली. एका सकाळीं राजा राणीच्या महालांत गेला. तिची श्रद्धा, तन्मयता पाहून त्याला धन्यता वाटली. राजाच्या आगमनाची चाहूल लागतांच राणी उठणार तोंच राजानें सांगितलें, "प्रिये थांब ! उठूं नकोस पुन्हां एकदां तें मधुर-भजन ऐकव." राणी पुन्हां भजनांत तल्लीन झाली. राजाहि रंगून गेला. आणि यानंतर नेहमींच असें घडूं लागलें. श्रद्धामयी राणी राजाला अधिकाधिक प्रिय होऊं लागली

राजाला भगवद्भक्ति प्रिय आहे हें कळतांच इतर राण्या व प्रजाजनहि भक्ति करूं लागलीं. साऱ्या राज्यांत भक्तिभावाचा प्रसार झाला.

* * *

**गुजराथच्या** रामभक्त पंडित विश्वनाथांची तपपूर्ण जीवन कंठणारी विधवा कन्या **निर्मला**, गोवर्धनधारी प्रभुला पाहतांच देहभान विसरून नृत्य-गायनांत प्राण ओतणारी, प्रभुपुढें गातां नाचतां प्राणत्याग करणारी **रामजनी**, जालंधरनाथांचें शिष्यत्व पत्करून जीवनाचें सार्थक करणारी राजा गोपीचंदाची माता राणी **मैनावती**, गौरांगप्रभु चैतन्यदेव यांची पत्नी **श्रीविष्णुप्रियादेवी** अशा कितीतरी ज्ञात नि अज्ञात व्यक्ति यांत आहेत.

## : २० : : जैन व बौद्ध संन्यासिनी :

### तत्त्वमालिनी, सुनंदा, यशोधरा वगैरे

भारतीय जीवनांत प्रपंचाइतकेंच परमार्थालाहि महत्त्व आहे हें आपण पाहिलेंच आहे. आपल्या धर्म व संस्कृतीचा जगभर प्रसार करून भारतानें जग जिंकल्याची इतिहासाची साक्ष आहे. या धर्मप्रसारांत जैन आणि बौद्ध संन्यासिनी–ज्यांना भिक्षुणी म्हणत–त्यांनीं फारच मोठा वांटा उचललेला दिसतो. या स्त्रिया वस्तुतः इतिहासकालीन आहेत पण त्यांचें कार्य धर्माशीं संलग्न असल्यानें त्यांची माहिती '**थेरीगाथे**'सारख्या धार्मिक ग्रंथांतूनच मिळवावी लागते. त्यांच्या जीवन–प्रवाहाचें हें विशिष्ट वळण पाहूनच त्यांचाहि समावेश पौराणिक दर्शनांत करणें मला उचित वाटलें. सर्व जीवन गृहिणीच्या कर्तव्यांत व्यतीत केल्यानंतर अखेर संन्यास घेऊन संसारनिवृत्त होणाऱ्या या स्त्रियांनीं धर्मप्रसाराचें कार्य केलें आहे.

* * *

**वसन्तपुरचा** राजा **जितशत्रु** याचा **जिनदास** नांवाचा एक मंत्री होता. त्याची पत्नी **तत्त्वमालिनी**. दोघेहि जैनधर्मीय असल्यानें आपली कन्या **सुभद्रा** हिलाहि त्यांनीं जैन धर्माची दीक्षा दिली होती. या सुशीला व भक्तिमति कन्येची धार्मिक वृत्ति पाहून अनुरूप जैन युवकाशींच तिचा विवाह करण्याचें माता-पितरांनीं ठरविलें होतें.

चम्पानगरींत त्यावेळीं **बुद्धदास** नांवाचा बौद्धधर्मीय वाणी रहात होता. सुभद्रेच्या गुणसौंदर्यानें मुग्ध होऊन तिच्याशीं विवाह करण्यासाठीं त्यानें जैन धर्म स्वीकारला. तेव्हां या रूपगुणसंपन्न युवकाशीं जीनदासानें तिचा विवाह करून दिला. सुभद्रा सासरीं आली. पण सासरच्या सर्वांचें आचरण बुद्धधर्मानुसार. त्यांत एकटी सुभद्रा जैनधर्मानुसार वागत आहे हें सासूला योग्य वाटेना! तिनें सुनेला बौद्धधर्मांत खेंचण्याचा प्रयत्न केला. पण तो फोल ठरला. तेव्हां तिनें सुनेला छळण्यास प्रारंभ केला

आपल्या सद्वर्तनानें सासूनें पतीच्या मनांत भरविलेल्या सर्व संशयांचें निराकरण करून तिनें आपल्या सतीत्वाबद्दल सर्वांची खात्री पटविली. पश्चात्तापदग्ध होऊन क्षमायाचना करणाऱ्या सासूला जैनधर्माचें महत्त्व पटवून दिलें. एक आदर्श गृहिणी, सती पतिव्रता म्हणून संसारकार्य संपवून अखेर ती संन्यासिनी झाली व आपल्या दुःखी व अज्ञानी भगिनींना धर्ममार्गाचा उपदेश करण्यांत तिनें आपलें उर्वरित आयुष्य खर्च केलें.

*   *   *

**वेन्नातट** नगरीच्या **धनपति** शेठची **सुनंदा** नांवाची एक कन्या होती. राजगृहचा राजपुत्र श्रेणिक याच्याशीं परिचय होऊन दोघे परस्परानुरक्त झालीं. धनपतीनें त्यांचा विवाह करण्याचें ठरविलें हें कळतांच श्रेणिकानें सुनंदेची भेट घेतली व " माझ्यासारख्या भटक्या पुरुषाशीं विवाह करणें योग्य नाहीं " असें सांगण्यास प्रारंभ केला. " मला व्यर्थ भय दाखवूं नका. माझा निश्चय ढळणार नाहीं. विवाह करीन तर आपणाशींच नाहीं तर आजन्म कुमारी राहीन. आपण परदेशी आहां. विवाह होतांच मला सोडून जाल तर पातिव्रत्याचें पालन करीत मी रात्रंदिवस आपल्याच चिंतनांत काल कंठीन " असें सुनंदा निग्रहपूर्वक उत्तरली.

हा निर्धार पाहून श्रेणिकानें तिच्याशीं विवाह केला. कांहीं कालानंतर सुनंदा गर्भवती झाली. तिची आई तिच्या साऱ्या आवडी पुरविण्यांत दक्ष असे, तरीहि सुनंदा दुर्बल होऊं लागली. अंतःकरणांत उत्पन्न होणारी इच्छा पुरी होणार नाहीं या कल्पनेंनेंच ती दुर्बल होत आहे हें जाणून आईनें वारंवार विचारल्यावर सुनंदा उत्तरली. " हत्तीवर बसून वाजत गाजत निघावें व मार्गांत जो जो दीन दुःखी भेटेल त्याची इच्छा पुरवून त्याला तृप्त नि दुःखमुक्त करावें, ही माझी इच्छा ! सद्धर्माचें, अहिंसाव्रताचें पालन करून धर्मप्रचारार्थ जीवन व्यतीत करणेंच मला प्रिय वाटतें."

ही इच्छा ऐकून मातेला फार आनंद झाला, पण ती पुरवणें त्यांच्या सामर्थ्याबाहेर असल्यानें तिनें श्रेणिकाला ही इच्छा कळवली. पत्नीची इच्छा ऐकून त्यालाहि संतोष वाटला. आपल्या जवळील अमूल्य रत्न देऊन त्यानें सासऱ्याला राजाकडे पाठवलें. रत्नाच्या प्रभावानें राजकन्या सुलोचनेच्या निस्तेज नेत्रांना तेज लाभतांच प्रसन्न होऊन राजानें धनपतिला मागेल तें इनाम देण्याची तयारी दर्शवली. धनपतीनें

आपल्या एकुलत्या एक गर्भवती कन्येची इच्छा राजाच्या कानीं घातली, व ती पुरी करण्याची विनंति केली. राजानें आनंदानें आपल्या खजिन्यांतील द्रव्य वेंचून ही इच्छा पुरी केली.

श्रेणिक आपल्या राज्यांत गेला. पुत्राला घेऊन सुनंदाहि त्याच्या मागोमाग सासरीं आली. दीन-दरिद्री जनांची सेवा. ईश्वरी भजन, धर्मोपदेश व धर्माचरणानें तिनें आपलें आयुष्य सार्थकी लावलें. सुभद्रेप्रमाणें तिनेंहि अखेर संन्यास घेतला व ती मोक्षाची अधिकारिणी बनली.

*　　　*　　　*

**कपिलवस्तूचा** राजा **शुद्धोदन** याची पत्नी **मायादेवी**—गौतम बुद्धाची जन्मदात्री माता – प्रजेवर मातृवत् प्रेम करी. ही अत्यंत दयाळु व सद्‌गुणी स्त्री होती. सिद्धार्थाच्या जन्मानंतर सातव्याच दिवशीं ती मरण पावली. यानंतर सिद्धार्थाचें पालन–पोषण मायावतीची धाकटी बहीण महा-प्राजापती किंवा **गौतमीनें** केलें. उत्तर वयांत गौतमानें प्रकट केलेली ज्ञानलालसा, दया, उत्साह, तीव्र, बुद्धिमत्ता, उद्योग, नेतृत्व या गुणांचें बीजारोपण हिच्याच शिकवणींतून झालें. गौतम बुद्धाच्या उपदेशानें हिनें समाधि-योगाचा अधिकार प्राप्त करून घेतला. पांचशें शाक्य स्त्रियांसह बुद्धाकडे जाऊन तिनें त्यांचा भिक्षुणी–संघ बनवला व बुद्धाच्या धर्मप्रसारांत भाग घेतला.

याच गौतमीची कन्या **नंदा** अत्यंत रूपवती होती. कुटुंबांतील एक एक जण बुद्धसंघांत प्रविष्ट होत गेल्यानें तिचेंहि मन संसाराबद्दल उदास होऊं लागलें. राजमहाल तिला स्मशानाप्रमाणें वाटूं लागला. व घराचा त्याग करून ती भिक्षुणी - संघांत जाऊन राहिली. बुद्धाच्या उपदेशानें तिची देहममता सुटली. धर्मसाधनेंत चित्त घालून तिनें अध्यात्मज्ञान मिळविलें व लोकसेवेस प्रारंभ केला. प्राणिमात्रांवरील अलौकिक प्रेमभावनेमुळें लोक तिला जनपद - कल्याणी म्हणूं लागले.

गौतम बुद्धाची पत्नी **गोपा** तथा **यशोधरा** ही एक पतिव्रता स्त्री होती. पुत्रजन्मानंतर सिद्धार्थ तरूण पत्नी व पुत्राचा त्याग करून निघून गेला असतां या साध्वीनें संन्यासिनीप्रमाणें साधा वेष व कठीण व्रताचरण आरंभलें. पतीची योग्यता जाणून बुद्धत्व प्राप्त करून देऊन धर्मप्रचार करणाऱ्या बुद्धाच्या चरणीं तिनें आपला

पुत्र राहूल याला समर्पित केला. लोककल्याणार्थ जिज्ञासु पतीनें तिचा पूर्वीच त्याग केला होता. पुत्राचा त्याग करून तिनें आपली संसार-निवृत्त वृत्ति प्रकट केली व बुद्धाची अर्धांगिनी होण्याची आपली योग्यताच सिद्ध केली.

*  *  *

'**धर्माचें** रहस्य काय?' या गौतम बुद्धाच्या प्रश्नाला उरुवेला-नरेश राजा सेनानीची कन्या **सुजाता** हिनें उत्तर दिलें-" चांगल्या कृत्याचें फळ चांगलेंच आणि वाईटाचें वाईटच मिळणार. प्रेमानें प्रेम वाढतें तर द्वेषानें द्वेष बळावतो. धैर्य व सहनशीलता यामुळेंच शांति मिळते. यासाठीं जो मार्ग आपल्याला पवित्र वाटेल तोच धरावा." हें उत्तर ऐकून "तुझ्याप्रमाणेंच माझी मनःकामना पूर्ण व्हावी असा मला आशिर्वाद दे." म्हणून तपस्वी सिद्धार्थानें आशिर्वाद मागितला. 'तथास्तु' सुजाता उत्तरली. सिद्धार्थानें आदरपूर्वक तिला निरोप दिला. यानंतर अल्पावकाशांतच त्याला सत्यज्ञानाची प्राप्ति झाली.

पतीनें संन्यास घेतांच तारुण्यांतच स्वतःहि संन्यस्त होऊन गौतमीच्या भिक्षुणी-संघांत प्रविष्ट होणारी भद्रा **कापिला** संघांत सर्वश्रेष्ठ संन्यासिनी झाली. अपाल्या लोकसेवेनें ती सर्वश्रुत झाली आहे. बौद्धयुगांतील सर्वश्रेष्ठ स्त्रियांत तिची गणना केली जाते.

पुत्रजन्मानें व्याकुल होऊन मृत-संजीवनीच्या शोधार्थ भटकणारी किसा (कृश) **गौतमी**-' जन्म मरण हा जगताचाच न्याय आहे, ही जाणीव होतांच विरक्त बनली व बुद्धाला शरण गेली. 'साधूच्या संगतीनें मूर्खहि ज्ञानी होतो म्हणून सत्संग धरावा" असे स्वानुभवाचें बोल तिनें थेरीगाथेंत लिहून ठेवले आहेत.

वाराणसीच्या राजाची कन्या **ब्रह्मदत्ता** एकनिष्ठ ब्रह्मचारिणी होती. बौद्धशास्त्राचें अध्ययन व तत्वज्ञानाचा अभ्यास करण्यांत तिनें जीवन वेंचलें. महात्मा कश्यपांकडून धर्मोपदेश घेऊन तिनें तपश्चर्या आरंभली. या तपांत पाणिग्रहण करूं पाहणाऱ्या अनेक राजकुमारांनीं वेळोवेळीं उपस्थित केलेलीं विघ्नें आपल्या तप सामर्थ्यानेंच निवारून तिनें महासिद्धी प्राप्त करून घेतली. "श्रद्धा, शील व साधना यांच्या जोरावर कुमारिका सुद्धां ब्रह्मचर्याच्या बळानें सिद्धि मिळवूं शकते" हें तिनें आपल्या चारित्र्यानेंच सिद्ध करून दाखविलें आहे.

७९४८

वयाच्या सातव्या वर्षी गौतमीकडून दीक्षा मिळवून तत्त्वज्ञानी बनलेली अनाथपिंडदाची कन्या **सुप्रिया**, तत्त्वज्ञानाप्रमाणेंच रोग्यांना व दुर्बलांना साहाय्य करण्याबद्दल दक्ष असे. बुद्धकालीं श्रावस्ती नगरींत मोठा दुष्काळ पडला होता. बुद्धानें शिष्यांना विचारलें–' या दुष्काळापासून आपल्या देश–बांधवांना वांचविणारा कुणींच नाहीं काय ? ' यावर कुणीच बोलेना पण सुप्रिया तात्काल उठली.–' भगवन् ! आपली ही सेविका आज्ञा पाळण्याला सदैव सज्ज आहे. जनसेवेसाठीं प्राण खर्ची पडणें ही तर मोठी भाग्याची गोष्ट आहे.' "तूं इतक्या लोकांची भूक कशी भागवूं शकशील ? " भगवान बुद्धांनीं प्रश्न केला. " आपल्या कृपेनें माझें हें भिक्षा–पात्र सदैव भरलेलें राहील व त्यांतूनच या भुकेल्यांना जीवन देऊन मी श्रावस्तीचा दुष्काळ दूर करूं शकेन. " सुप्रिया श्रद्धापूर्वक उत्तरली. ' भगवान् अमिताभ तुझी इच्छा पूर्ण करो." सिद्धार्थानें आशीर्वाद दिला. घरोघर फिरून आपल्या भिक्षान्नांतून सुप्रिया दुष्काळग्रस्तांना मदत करूं लागली. जनतेवरहि या भावनेचा पगडा बसला. अनेकजण तिला मदत करूं लागले. सर्वांच्या सहकार्यानें संकट दूर झालें व सुप्रियेची कीर्ति चहूंकडे पसरली.

आपल्या बुद्धिबलानें सासऱ्याच्या वृत्तींत पालट घडवून त्याला मार्गदर्शन घडविल्यानें **मिगार–माता** म्हणून प्रसिद्धीला आलेली **विशाखा**, आपल्या प्रभावी वक्तृत्वानें हजारों स्त्रियांना बौद्धधर्माकडे वळविणारी पटाचारा, विलासमय जीवनाचा त्याग करून भिक्षुणी बनणारी विशाखपत्नी धर्मदिन्ना, रूपलावण्य संपन्न असूनहि " अनेक राजकुमार तुझ्या प्राप्तीची इच्छा करीत आहेत. एकाला संतुष्ट करीन तर इतर अनेकजण माझ्याशीं वैर धरतील, त्यापेक्षां तूं संन्यास–दीक्षा घेऊन या संसारांतून मुक्त होण्याच्या मार्गाला लाग " ही पित्याची आज्ञा प्रमाण मानून पित्याच्या कल्याणार्थ संसार सोडून भिक्षुणी बनणारी **नीलोत्पला** किंवा **उत्पलवर्णा**, राजा बिम्बसारची पत्नी असूनहि ज्ञानप्राप्तीसाठीं वैभवाचा त्याग करून संन्यासिनी होणारी महाबुद्धिमति राणी **खेमा**, सारें ऐश्वर्य बुद्धचरणीं समर्पित करणारी **अंबपाली** गणिका, धर्मप्रसारार्थ परदेशांत प्रयाण करणारी दिग्विजयी सम्राट अशोकाची कन्या **संघमित्रा**, हर्षवर्धनाची भगिनी **राज्यश्री**– कितीतरी स्त्रियांनीं धर्मसाधना करून आपलें जीवन सार्थकी लावलें आहे.

सं. नं. ६३८

# शुद्धिपत्र

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ५ | २ | त्वमुद्दीश्य | त्वामुद्दिश्य |
| ५ | ३ | वितन्वन्ते | वितन्वत |
| १६ | ३ | भर्तृः | भर्तुः |
| १६ | ३ | पुन्हा | पुनः |
| १६ | ४ | शुश्रुषया | शुश्रूषया |
| १७ | १४ | नोपलक्षते | नोपलक्षये |
| १८ | ४ | दोषेणावगन्तव्यः | दोषेणावगन्तव्या |
| २५ | १ | कष्टकिनो | कण्टकिनो |
| २५ | २ | स्पर्शो | स्पर्शा |
| २७ | ४ | राघवं | रावणं |
| ३१ | ८ | नारीश्च | नार्यःश्च |
| ३१ | २० | अवसद्रजीनेकां | अवसद्रजनीमेकां |
| ३६ | १४ | आत्मेवात्मनो | आत्मनेवात्मनो |
| ३७ | १० | पतिव्रतो | पतिर्व्रतो |
| ३७ | १० | दुष्यंत | दुष्यंतः |
| ४३ | १२ | द्रोहो | द्रोहं |
| ४६ | १५ | उदगस्तस्य | उदर्कं तस्य |
| ५७ | २१ | कृताम् | कताम् |
| ५९ | ६ | पतिव्रता | पतिव्रताः |
| ६७ | २० | तन्वंगी | तन्वांगि |
| ७१ | १५ | प्रतिष्ठानपुरांणाताल | प्रतिष्ठान पुरांतील, |
| ७२ | ६ | उपैव्यति | उपैत्विति |
| ७६ | १२ | त्वं | त्वां |

# भारतीय स्त्री - दर्शन

## सहाय्यभूत ग्रंथ


१) श्रुतिबोध ( ऋग्वेदाचें मराठी भाषांतर )
२) मराठी उपनिषदें
३) वाल्मिकी रामायणम् । ( मूळ संस्कृत )
४) आनंदरामायणम् । ,,
५) श्रीमहाभारत ,,
६) श्रीमद्महाभागवत ,,
७) मार्कंडेय पुराण ,,
८) शिवलीलामृत
९) कल्याण ( नारी अंक )


REFBK-0007948